# दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई.

# ६३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे मसुदा इतिवृत्त

# (draft minutes)

**दिनांक: 25 ऑगस्ट 2024 आणि**

**तहकूब सभा 29 ऑगस्ट 2024 रोजी झाली.**

**स्थळ: डिएई कन्व्हेंशन सेंटर**

**अणुशक्तीनगर, मुंबई- 400 094**

**63व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दि.25 ऑगस्ट 2024**

दि बी.ए.आर.सी. एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबईच्या अधिमंडळाची 63वी वार्षिक सर्वसाधारण सभा डी.ए.ई.कन्व्हेन्शन सेंटर, अणुशक्तीनगर येथे रविवार दि.25 ऑगस्ट 2024 रोजी दु.2.00 वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेची विषयपत्रिका:-

1. 62 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. 1 एप्रिल 2023 ते31 मार्च 2024 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटापत्रक स्वीकारुन त्यास मान्यता देणे.
3. सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.
4. सन 2023-24 या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी घेणे व  सन 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाजपत्रकास मंजुरीदेणे.
5. शासकीय लेखापरीक्षक यांच्या सन 2023-2024 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.
6. सन2024-2025 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.
7. सन 2022-2023 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोषांचे वाचन करून त्यासंबंधीच्या दोषदुरुस्ती अहवालाची (compliance report)  नोंदघेणे.
8. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधीदुरुस्तीस (परिशिष्ट 'अ' प्रमाणे )मंजुरीदेणे.
9. सभासदांना वर्गणी खात्यातील अंशत: रक्कम काढणेसाठी सुविधा देणेबाबत विचार करणे.
10. विक्रम कर्ज संरक्षण निधी योजनेच्या धोरणातील नियमात अंतर्भूत करावयाच्या बदलाबाबत निर्णय घेणे.
11. अधिमंडळाच्या 63व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
12. माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.

संस्थेचे मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: दि बीएआरसी एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्हक्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित सर्वसभासदांचे मी येथे स्वागत करतो.

माननीय चेअरमन यांनी पतसंस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई साहेब यांना तसेच पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम साहेब यांना मंचावर घेऊन यावे. सोबतच संचालक मंडळ यांनीही व्यासपीठावर येऊन स्थान ग्रहण करावे अशी मी विनंती करीत आहे.

नमस्कार.हॉलच्या बाहेर उपस्थित असलेले सर्व सन्माननीय सभासद बंधू-भगिनींना विनंतीकरतो की त्यांनी कृपया सभागृहामध्ये यावयाचे आहे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई साहेब यांना मी विनंती करतो की त्यांनी आजच्या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष पद स्वीकारावे. यानंतर मी त्यांना विनंती करतो हिंदुस्थानाचे आराध्य दैवत स्वराज्य संस्थापक धर्मश्रेष्ठ श्री शिवाजीमहाराज यांच्या प्रतिमेस त्यांनी पुष्पहार अर्पण करावा. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम साहेब यांनी पुष्पहार अर्पण करावा. भारतीय अणुऊर्जाचे जनक डॉक्टर होमी जहांगीर भाभा यांच्या प्रतिमेस चेअरमन कोळी साहेब यांनी पुष्पहार अर्पण करावा.

पदसिद्ध अध्यक्ष, उपाध्यक्ष, चेअरमन यांनी दीप प्रज्वलन करून सभेच्या कामकाजाची  सुरुवात करावी.

यानंतर मी विनंती करतो की पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करावे.

श्रीअरुण कोळी (सीडीएम):  संस्थेच्या सभासदांची उपस्थिती ही, ज्यांनी कुपन घेऊन गेलेले आहेत, ती आहे. उपविधीनुसार सभासदांची उपस्थिती ही वीस पंचवीस सभासदांची आहे. जर संचालक मंडळाला वाटलं की ही सभा सुरू करावी तर सभा सुरू करता येईल. नियमानुसार जर 25 सभासद सभेस उपस्थित असतील तर ते सभा सुरू करू शकतात नाहीतर अशी सभा अर्धा तासतहकूब करू शकतात. हे संचालक मंडळावर अवलंबून आहे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश  शेणई: नमस्कार. मी सर्व प्रथम आजच्या सभेस उपस्थित असलेल्या आपणां सर्वांचे स्वागत करीत आहे. त्याचप्रमाणे पतसंस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष श्री एस. श्रीराम, संस्थेचे अध्यक्ष श्री हेमंत कोळी, उपाध्यक्ष श्री हांडे, मानद सचिव श्री शिवाजी हगवणे  व खजिनदार श्री शिबु रॉय तसेच संचालक सदस्य आणि आस्थापनेचे कर्मचारी जे या सभेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सहभाग घेत आहेत त्यांचेही मी स्वागत करीत आहे.

पतसंस्थेच्या अहवाल कालावधीतील पदसिद्ध अध्यक्ष डॉ. मुकुंद कुलकर्णी हे बीएआरसी आस्थापनेच्या सेवेतून दि. 31 मे 2024 रोजी सेवामुक्त झाले. या रिक्त असलेल्या पदावर आस्थापनाने मला नियुक्त केल्याबद्दल मी आस्थापनेचा आभारी आहे.

माझे कर्तव्य बजावण्यासाठी मला आपल्या सर्वांचे पूर्ण सहकार्य लाभावे अशी माझी नम्र विनंती आहे.

पतसंस्थेने 31 मार्च 2024 रोजीची आर्थिक पत्रके तयार झाल्यानंतर माझी  नियुक्ती झाली आहे. तरीसुद्धा मी आजच्या सभेचे संचालन आपणा सर्वांच्या सहकार्याने व्यवस्थितपणे पार पाडणार आहे. एकंदर आर्थिक पत्रके, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक पाहिल्यानंतर पतसंस्थेची समाधानकारक प्रगती झाली आहे. हे केवळ आपल्या सर्वांच्या सहयोगामुळेच.

आपण सर्वानी दर्शविलेल्या विश्वासामुळेच विद्यमान संचालक मंडळाने पतसंस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पुढील कामे केली आहेत-

1. स्टेट बँकेच्या सीएमपी पोर्टलवरून सभासदांची देय रक्कम त्वरित देण्याची व्यवस्था केली.
2. सभासदांना मिळणाऱ्या ठेवीवरील व्याज रु.40,000/- व त्यापेक्षा जास्त रकमेवरील टीडीएसची रक्कम 10% दराने आयकर  विभागाकडे वेळोवेळी भरणा करणे.
3. सभासदांची कर्ज परतफेडीची क्षमता तपासून त्यांचा आर्थिक  विकास करण्यासाठी वेतनानुसार जास्तीत जास्त कर्ज रक्कम रु. 50 लाख मंजूर करणे.
4. दि.05.02.2024 या तारखेपासून सभासदांच्या देय ठेवींचे ऑटोरिन्युअल करणे.
5. एसएमएस मेसेजद्वारे सभासदांना त्यांच्या व्यवहाराच्या नोंदीची माहिती देणे.
6. वेबसाईट अपडेशनद्वारे सभासदांना त्यांची वैयक्तिक माहिती उपलब्ध करून देणे.

त्याचप्रमाणे आपणां सर्वांची  मागणी लक्षात घेता आपल्या सभासद वर्गणीची रु.2 लाखावरील अंशीक रक्कम काढून घेण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांचे कार्यालयातून परवानगी घेऊन रक्कम परत करण्याचा प्रयत्न करणार आहोत.

आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे संस्थेची दि.31मार्च 2024 अखेर वार्षिक उलाढाल रु.925.66 कोटी झालेली असून थोड्याच कालावधीत रु.1000 कोटीचा टप्पा पार केला जाईल.

अहवाल वर्षात एकूण आपल्या सर्वांच्या ठेवी रु.521.77 कोटी इतक्या जमा आहेत तर पतसंस्थेने अहवाल वर्षात रु.828.84 कोटीचे कर्ज वाटप केले आहे. पतसंस्थेचा स्वनिधी रु. 66.31

कोटी इतका असून संस्थेने रु.78 कोटीच्या रकमा गुंतवणूक केल्या आहेत. संस्थेने आपल्या वर्गणीवर 10% व्याज देऊन भागधारण केलेल्या भाग रकमेवर 15% प्रमाणे लाभांश जाहीर करीत आहे.

दि. 31 मार्च 2024 रोजी सादर केलेले ताळेबंद पत्रक पाहिल्यानंतर असे दिसून येते की, संस्थेला रु. 4,98,76,524/- इतका निव्वळ नफा झाला असून त्यातील रु.4,25,94,258/- इतकी रक्कम सभासदांना 15% लाभांश म्हणून वाटपासाठी तरतूद केली आहे.

संस्थेने मांडलेल्या ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तसेच नफा विभागणीस व सन 2024-25 च्या अंदाज पत्रकास आपणा सर्वांच्या मंजुरीची आवश्यकता आहे. सभेपुढील उर्वरित कामकाज सुरळीत चालू करून आजच पूर्ण करायचे आहे. आपण सर्वांनी कृपया एक एक करून प्रश्न, शंका विचारण्यात याव्यात. त्याचे निरसन संचालक मंडळ करेल. आपण सर्वजण या पतसंस्थेचे फक्त सभासद नसून बीएआरसी सारख्या एका जगप्रसिद्ध संशोधन संस्थेचे अभिमानी कर्मचारी आहोत. त्यामुळे आपणा सर्वांची वागणूक त्या अनुरूप असेल अशी माझी खात्री आहे. कुठेही गडबड, गोंधळ होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यायची आहे. माझी विनंती आहे की आजचा जो अजेंडा आहे तो संपूर्णपणे पूर्ण करावा. सभेचे कामकाज सुरू करावे. मी आता संस्थेचे अध्यक्ष श्री हेमंत कोळी यांना आजच्या सभेचे कामकाज विषय पत्रिकेनुसार चालू करण्यास सुचीत करीत आहे. धन्यवाद ! जय हिंद! जय महाराष्ट्र!

चेअरमन श्री हेमंत कोळी: महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बीएआरसी आस्थापनाचे जनक डॉ. होमी जहांगीर भाभा यांना अभिवादन करून व्यासपीठावर उपस्थित संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आदरणीय गिरीश शेणई सर, संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष आदरणीय श्रीराम सर, यांचे संस्थेच्या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत स्वागत करतो. तसेच संस्थेचे उपाध्यक्ष श्री पांडुरंग हांडे, मानद सचिव श्री शिवाजी हगवणे, खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय, सह सचिव श्री विवेक भागडिया, सह खजिनदार श्री राजेश चौधरी, सर्व संचालक आणि उपस्थित सभासद बंधु भगिनी यांचेही स्वागत करतो.

सर्वप्रथम मी या आर्थिक वर्षात दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, शास्त्रज्ञ, सुरक्षा व पोलीस दलातील जवान, डॉक्टर, नर्सेस, साहित्यिक यांना संस्थेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करतो.

संचालक मंडळाच्या वतीने सन्माननीय भागधारक सभासदांच्या समोर संस्थेचा 63 वा वार्षिक अहवाल मांडताना मला अतिशय आनंद होत आहे.

आमच्या संचालक मंडळाने सभासदांच्या हितासाठी अनेक निर्णय घेतले व ते अंमलात आणले त्यापैकी एक म्हणजे विक्रम कर्ज संरक्षण योजना ज्यामध्ये मृत सभासदाचे संपूर्ण कर्ज निरस्त केले जाते.

गेल्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आम्ही 50 लाख रुपयांपर्यंतचे दीर्घकालीन कर्ज व 80 हजाराचे आपत्कालीन कर्ज याबाबतची उपविधी दुरुस्ती आणली. त्यास आपण सर्वांनी मान्यता दिल्यानंतर माननीय जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था पुणे यांच्या मंजुरीने दिनांक 25 जानेवारी 2024 पासून सदर कर्ज धोरण राबविण्यात आले.

संस्थेची वेबसाईट अपडेट केली असून सभासदांना आता संस्थेत न येता त्यांच्या खात्याची संपूर्ण माहिती संस्थेच्या वेबसाईटवर लॉगिन करून मिळू शकते.

सभासदांनी त्यांच्या खात्यावर केलेल्या व्यवहाराची माहिती तसेच त्यांच्या इन्व्हेस्टमेंटच्या मॅच्युरिटी बाबत एस एम एस अलर्ट मेसेज द्वारे त्यांना अवगत केले जात आहे.

सभासदांच्या ठेवीचे ऑटो रिन्यूअल होत आहे.

वरील सर्व ऐतिहासिक निर्णय आम्ही, आपण आमच्यावर टाकलेल्या विश्वासामुळे घेऊ शकलो व त्याची अंमलबजावणी करू शकलो.

या व्यतिरिक्त आम्ही आपणासाठी केलेल्या कामांचा आढावा व संस्थेने आपल्या सर्वांच्या सहकार्याने केलेली प्रगती आपणास या अहवालावरून समजेल.

आजच्या सभेत आमच्या संचालक मंडळाने सुचविलेली उपविधी दुरुस्ती तसेच सभासद वर्गणीची रक्कम अंशतः काढणे आदी विषयांवर चर्चा करून आपण ती मंजूर कराल अशी आशा बाळगतो.

संस्थेच्या प्रगतीसाठी आम्ही वचनबद्ध आहोत. संचालक मंडळ, कर्मचारी, सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांनी दिलेल्या सहकार्यामुळे व प्रोत्साहनामुळे संस्थेने अप्रतिम यशस्वी वाटचाल केली आहे. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

आपल्या सर्वांना उदंड आयुष्य, आरोग्य, सौख्य व समृद्धी लाभो ही मनोभावे प्रार्थना करून मी माझे मनोगत पूर्ण करतो. आणि पुढील कामकाज सुरू करण्यासाठी मी संस्थेचे मानद सचिव श्री शिवाजी यांना विनंती करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र ! जय सहकार !

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: धन्यवाद कोळी साहेब. विषय पत्रिकेनुसार सभासुरू करण्यापूर्वी देशातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा, सांस्कृतिक, विज्ञान,

तंत्रज्ञान, सहकार व संरक्षण क्षेत्रातील ज्ञात-अज्ञातव्यक्ती तसेच देशाचे संरक्षण करत असलेले जवान तसेच अहवाल वर्षात ज्या सभासदांचे दुःखद निधन झाले अशा सर्वांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आपण दोन मिनिटेस्तब्ध उभे राहावे अशी मी विनंती करतो.

संस्थेच्या 62 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तात पान क्र.55 "ठराव पास करण्यात आला की सभेची वेळ संपल्यामुळे खालील उर्वरित विषयांवर सविस्तर चर्चा न झाल्यामुळे सभा तहकूब करून सात दिवसांच्या आत घेण्यात यावी असा ठराव पास करण्यात आला" असे वाचण्यात यावे. यानंतर मी संस्थेचे व्यवस्थापक अहवालात ज्या दोन-तीन प्रिंटिंग मिस्टेक आहेत त्या वाचून दाखवण्यास व्यवस्थापक श्री मोरे यांना सूचित करतो.

व्यवस्थापक श्री आर के मोरे: अहवालामध्ये करावयाच्या करेक्शन्स पुढील प्रमाणे आहे. पानक्रमांक 45 वर आदर ॲसेटस या ठिकाणी AY झाले आहे त्याला FY वाचावे. त्यानंतर पान क्रमांक 53 शेड्युल 6 F -SLF डिपॉझिट कॉसमॉस बँक दहिसर यामध्ये रक्कम जी आहे ती रक्कम लेस झालेली आहे. ती विथ इंट्रेस्ट डिलीट करण्यात आली. पान क्रमांक 53 शेड्युल 6 G-SLF डिपॉझिट कॉसमॉस बँक बांद्रा आहे सर्वात शेवटी लेस withdrawals during the year असे वाचावे. त्याच्याखाली H - SLF कॉसमॉस बँक ठाणे लेस withdrawals during the year असे वाचावे. पान क्रमांक 54 वर सेमशेड्युलमध्ये Lनंबर आहे एमडीसीसी बँक शोर्ट टर्म डीपोझीट लास्ट वर्षांमध्ये पण कॅरीफोरवर्ड झालेले आहे फक्त ते बॅलन्स शीटमध्ये आले नाही. या इतक्या करेक्शन कन्सिडर करून घ्याव्यात. धन्यवाद! जय हिंद!

सचिव श्री शिवाजी हगवणे: अजेंडाला सुरुवात करीत असताना आपल्या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष डॉक्टर मुकुंद कुलकर्णी सेवानिवृत्त झाल्यामुळे यावर्षी नवीन पदसिद्ध अध्यक्ष डॉक्टर गिरीश शेणई साहेब यांची नियुक्ती झालेली आहे. मी विद्यमान चेअरमन हेमंत कोळी साहेबांना विनंती करतो की आपण पदसिद्ध

अध्यक्ष साहेबांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करावे. संस्थेचे उपाध्यक्ष श्री बालाजी साहेब यांची ट्रान्सफर झाल्यामुळे पदसिद्ध उपाध्यक्ष म्हणून श्री श्रीराम सर यांची नियुक्ती झाली आहे. मी संस्थेचे विद्यमान व्हाईस चेअरमन श्री हांडे साहेबांना विनंती करतो की त्यांनी पुष्पगुच्छ देऊन सरांचे स्वागत करावे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: विषय क्रमांक एक वाचून दाखवला.

**विषय क्र.1: 63व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

इतिवृत्तावर जर कोणाची काही शंका असतील तर त्या मांडाव्यात. आपल्या शंकांचे निरसन केले जाईल.

श्रीप्रकाश पाटील (एस आय आर डी): या संचालक मंडळावर अध्यक्ष साहेब व उपाध्यक्ष साहेब, तुमच्यासारखे कडक शासकीय अधिकारी आवर्जून दिलेले आहेत याचा मला अभिमान आहे. मागची 62 वी वार्षिक सर्वसाधारण सभा 16 सप्टेंबर 2023 रोजी याच ठिकाणी झाली असताना त्यामीटिंगमध्ये तरुण कुमार श्रीवास्तव यांच्या विषयावरून तीन तास गोंधळ सुरू होता. त्यावेळी आमच्या सेक्रेटरी महोदयांनी आमसभेसमोर सांगितलं होतं हे जे निरस्त केलेले कर्ज आहे ते मी स्वतः संचालक मंडळाच्या वतीने संस्थेत भरीन. ते तुम्ही भरले आहे का ते सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आपल्या सर्वांना माहीत आहे की, मागच्या एजीएम मध्ये सुद्धा सांगितलं होतं की, या विषयाची कंप्लेंट सहकार खात्याकडे झालेली आहे. गेल्या वर्षाचा सभागृहाचा निर्णय मला मान्य आहे. यामध्ये दुमत नाही.सहकार खात्याला रिमाइंडर पण गेलं होतं. माननीय सहकार खात्याची जी सूचना येईल त्याप्रमाणे कार्यवाही करू.

श्री प्रकाश पाटील (एस आय आर डी): हा विषय तुम्ही आमसभेमध्ये कबूल केला. व्हिडिओ रेकॉर्डिंग आहे. हाऊसमध्ये ठराव मांडल्याची नोंद आहे. या ठरावाची नोंद या इतिवृत्तामध्ये नाही. संचालक मंडळाच्यावतीने मी शिवाजी हगवणे, श्री तरुणकुमार श्रीवास्तव यांचे जे काही पैसे असतील, ते सर्व भरण्यास मी तयार आहे असं त्यांनी मान्य केलं होतं आमसभेमध्ये. आज या गोष्टीला वर्ष झालं. तुम्ही चुकीची कामे केली त्याला माफी नाही. साहेब, मी 1 ऑक्टोबर 2023 ला मिनिट्सची प्रत मागितली. मीटिंग झाली 16 सप्टेंबर 2023 ला. उपविधीप्रमाणे त्यांनी ती प्रत दिली नाही. त्यामध्ये बरीच तफावत आढळून आली. आमसभेमध्ये झालेल्या बऱ्याच गोष्टी ह्या मिनिट्समधून सर्व वगळण्यात आलेल्या आहेत. अशा गोष्टी होत असतील तर त्यामध्ये यांचा मनमानी कारभार कसा आहे ते बघा. संचालक मंडळाकडे मी मिनिट्स रेकॉर्डिंग मागितली. ती मला मिळाली आहे. त्यामध्ये स्पष्ट कर्ज भरून काढण्याचा उल्लेख आहे. सहकार खात्याकडे तक्रार केली त्यानुसार जे उत्तर येईल त्याप्रमाणे केले जाईल परंतु सहकार खाते हे नंतर आहे. सहकार खात्याकडे तक्रारदार कोण आहे, मी प्रकाश पाटील आणि मुकुंद वैराळकर. आम्ही सांगितलं की आम्ही तक्रार मागे घ्यायला तयार आहोत. चुकीच्या पद्धतीने जे पैसे तुम्ही वे ऑफ केले आहेत ते भरा, आम्ही तक्रार मागे घेतो. हे मागच्या एजीएमला झाले आहे तुम्ही हे मान्य करा. पैसे का भरले नाही याचे उत्तर द्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मी त्यावेळेस पण सांगितलं होतं की सहकार खात्याकडे या विषयाची तक्रार आधीच झालेली आहे.

श्री प्रकाश पाटील (एस आय आर डी): मागच्या वेळे सारखी दोन दिवस एजीएम चालवायची आहे का? तुम्ही अशी चुकीची कामे करता, चुकीचे उत्तर देता, चुकीचे मिनिट्स लिहिता, आमच्याकडे पुरावे आहेत.तुम्ही मिनिट्स मध्ये काय लिहिलं आहे पान क्रमांक ४९ वर "सचिव श्री शिवाजी हगवणे हा निर्णय संचालक मंडळाला विश्वासात घेण्यासाठी मी एवढा वेळ घेतला. हा निर्णय माझ्या एकट्याचा नाही सर्व संचालक मंडळाचा आहे.आत्ता मी वैयक्तिकरित्या याची जबाबदारी घेऊन सभागृहांमधून आलेला दबाव लक्षात घेता सभेपुढील कामकाज पूर्वत चालू राहण्यासाठी मी सेक्रेटरी शिवाजी हगवणे या ठिकाणी जे कर्ज माफ केला आहे ते भरायला तयार आहे परंतु सहकार विभागाच्या मार्गदर्शनानुसार. " मिनिट्समध्ये हे असं फिरवून फिरवून लिहिलं आहे. आता रेकॉर्डिंगमध्ये खरं काय आहे ते वाचून दाखवतो. "सचिव:हा निर्णय संचालक मंडळाला विश्वासात घेण्यासाठी मी एवढा वेळ घेतला. हा निर्णय माझ्या एकट्याचा नाही पूर्ण संचालक मंडळाचा आहे. आत्ता या ठिकाणी मी वैयक्तिकरित्या या गोष्टीची जबाबदारी घेतो आणि सगळेच्या सगळे पैसे जी रक्कम असेल ती रक्कम मी सेक्रेटरी शिवाजी हगवणे या ठिकाणी, जी रक्कम माफ झालेली आहे ती भरायला तयार आहे." हे खरं मिनिट्स आहे.

श्री विलास घोरपडे (एएफडी): आता जे मिनिट्स वाचून दाखवले हे खरे मिनिट्स. ते करेक्शन या मिनिट्समध्ये करा आणि हा ठराव झाला होता त्याची पण यामध्ये नोंद नाही. हा ठरावआहे,याची दिशाभूल केली आहे. या ठरावाची नोंद करावी आणि प्रकाश पाटील यांनी जे वाचून दाखवलं त्याची नोंद इतिवृत्तामध्ये करावी.

श्री प्रकाश पाटील (एस आय आर डी): तुम्ही संचालक मंडळाने जो घोळ केला आहे, तुम्ही संचालक मंडळाच्या सभेत हा ठराव घेऊन किती दिवसात हे भरणार ते सांगा. साहेब, मागच्या वर्षी याच विषयावर यांनी अडीच तास वाया घालवला. पण जे चुकीचं काम आहे ते चुकीचं आहे. तुम्ही चांगले कामे करा, पूर्ण हाऊस तुमच्या पाठीशी आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: ज्या पद्धतीने सहकार खात्याकडे तक्रार झाली आहे त्यानुसार सर्वच निर्णय होतील.

श्रीप्रकाश पाटील (एस आय आर डी): सेक्रेटरी, सभागृह मोठं की नियम मोठा? सहकार खातं मोठं की हाऊस मोठं? मला याचे उत्तर द्या. नियम सभागृहाने केलेला आहे. सभागृह हे सर्वोच्च न्यायालय आहे. अहो साहेब, तक्रार मी मागे घ्यायला तयार आहे असं सांगितले आहे. तुम्ही पैसे

भरले का? तुम्ही पैसे भरल्याशिवाय तक्रार मागे घेणार नाही. सहकार खात्याला सांगितलं होतं आम्ही. या सभागृहामध्ये तक्रार मागे घेतो तुम्ही पैसे भरा तसा ठराव केला पण त्याची इतिवृत्तात नोंद नाही.

श्री राजेश कळके (सीडीएम): शिवाजी साहेब, तुम्ही लोन माफ करताना सहकार खात्याची परवानगी घेतली होती का? की तुम्ही मनमानी केली? तुम्हाला ऐकावं लागेल. जनरल बॉडी झाल्यानंतर त्याचे मिनिट्स किती वेळेत मिळाले पाहिजे? एक महिना, दोन महिने, आठ महिने लागतात. जर अगोदर मिनिट्स मिळाले असते तर मी सहकार खात्यावर आरटीआय टाकला असता की कंप्लेंटचं काय झालं म्हणून? पण यांनी वेळच दिला नाही. आम्हाला कळत नाही मिनिट्स लिहायला एवढे आठ महिने लागतात का?

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी): अध्यक्ष साहेब, हा जो विषय आहे हा गेल्या 62 व्या एजीएम मध्ये विषय तीन तास गाजला होता. सर्वांच्या हाती इतिवृत्तांत आहे. सर्वसाधारण सभा कशाकरता असते? सर्व सभासदांचे म्हणणे ऐकण्याकरिता आणि त्यांचे विचार घेऊन संचालक मंडळाने पढे जायचं असतं. गेल्या वेळेस 62 व्या एजीएममध्ये या सभागृहाने आणि या सर्व जनतेने तुम्हाला एक ठराव दिला होता. सर्व सभासदांनी जागेवर उभे राहून संचालक मंडळाने व्यासपीठावरून हात उभे करून हा ठराव मंजूर झाला असं जाहीर केलं. स्वतः सेक्रेटरी बोलले आहेत. राहिला विषय तक्रारीचा या विषयाच्या संदर्भात दिलेलं स्पष्टीकरण काय आहे हे सांगा. तुम्ही पूर्ण सभागृहाची दिशाभूल करू नका. डीएइचे युनियन सेक्रेटरी, नाफीचे सेक्रेटरी श्रीधरन साहेब यांच्या नावाची तुम्ही बदनामी केलीआहे. तुम्ही कोणाच्या तरी माथ्यावर हे पाप मारत आहात.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी): अध्यक्ष महोदय, या विषयावर पूर्ण संचालक मंडळाने सोसायटी ऑफिसमध्ये ठरवून दिलेल्या वेळेत आमच्या सोबत संचालक मंडळाची एक मीटिंग घेतली. यांनी सर्वांसमोर माफी मागितली आहे आणि माझे जे वक्तव्य आहे ते चुकून केलेलं आहे असं पण त्यांनी मान्य केलेलं आहे. एका सभासदाची यांनी बदनामी केली आहे. हे तुमचं पाप दुसऱ्याच्या माथ्यावर मारण्यासाठी हे सर्व केलं आहे.

सभागृहाने जो ठराव संमत केला त्या ठरावाला अधीन राहून आजच्या या सभागृहामध्ये जो ठराव मंजूर झाला त्या ठरावाला आज तुम्ही मान्यता देऊन पैसे कधी भरणार त्याची तारीख डिक्लेअर करा आणि चुकीचे उत्तर देऊ नका. उपनिबंधकांबाबत इथे काहीही विचारले नाही. त्या दिवशी मी सभागृहामध्ये उभे राहून सर्वांच्या साक्षीने स्पष्ट सांगितलेलं आहे की, आम्ही कंप्लेंट केलेली आहे

आणि ज्या दिवशी हे पैसे भरतील तेव्हा कंप्लेंट मागे घेऊ. हे सभागृह जो निर्णय घेईल त्याप्रमाणे करा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तरुण कुमार श्रीवास्तव यांचे पैसे कुठल्याही चालक मंडळाच्या खिशात गेलेले नाहीत.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): तुम्ही मला सांगा हे संचालक मंडळाने खिशात घातले नाही म्हणजे? हे आम सभासदांचे पैसे आहेत. आम सभासदांचे पैसे तुम्ही हवे तसे वेव ऑफ करू शकता का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: 'हे पैसे संचालक मंडळाच्या खिशात गेले नाही' हे बोललो. याचा अर्थ आम्ही घेतले नाहीत. तरुण कुमार श्रीवास्तव यांच्या फॅमिलीकडून या कर्जाची वसुली चालू आहे. त्यांच्याकडून दोन-तीन चेक आले आहेत.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):हगवणे साहेब, त्याचा या सभागृहाची काय संबंध?

श्री राजापुरे (डी आर एच आर): मला पदसिद्ध अध्यक्ष आणि पदसिद्ध उपाध्यक्ष यांना विचारायचे आहे की तुम्हाला माहिती आहे का या केसबद्दल ?

पदसिद्धअध्यक्ष श्री गिरीश शेणई: पदसिद्ध अध्यक्ष आणि पदसिद्ध उपाध्यक्ष म्हणून आमची नेमणूक 8 ऑगस्टला झाली आहे. त्यामुळे आम्हाला या प्रकरणाबद्दल काहीही माहिती नाही.

श्री राजापुरे (डीआरएचआय): सर्वांनी लक्ष द्या. 31मे 2022 यादिवशी श्री तरुण कुमार श्रीवास्तव त्यांनी आपल्या नोकरीमधून व्होलंटरि रिटायरमेंट घेतली. डिपार्टमेंटने संस्थेला एक पत्र पाठवलं त्यांचे ड्यूज एक ते दीड महिना उशिरा मिळाले. त्यामधल्या काळात ऑगस्ट 2022 मध्ये तरुणकुमार श्रीवास्तव हे मरण पावले. जर तरुणकुमार श्रीवास्तव हे आपल्या डिपार्टमेंटचे एम्प्लॉयी नाही,एम्प्लॉयी नाही म्हणजे सोसायटीचे सभासदही नाहीत, सोसायटीचे सभासद नाही म्हणजे या कर्ज संरक्षण योजनेसाठी पात्र नाहीत. ते पात्र नसताना त्यांचे कर्ज अधिक 1 लाख अधिक 15 हजार असे एकूण 11 लाख 15 हजार संस्थेने नियमबाह्य त्यांना दिले. त्यामुळे संस्थेचे 21 लाख 75000 चे नुकसान झाले आहे. त्यांनी 11 लाख तर दिलेच, कर्ज संरक्षण निधीचे 10 लाख प्लस हे त्यांच्याकडून येणारे 11 लाख असे एकूण 21 लाखाचे नुकसान झालेले आहे. यावर चर्चा होत नाही, फायनल होत नाही तोपर्यंत कामकाज पुढे चालणार नाही.जो पर्यंत यावर फायनल होत नाही तोपर्यंत मिनिट्स पास होणार नाहीत.

श्री रामपरब (युईडी): अध्यक्ष साहेब, त्यांनी काय चुका केल्या आहेत त्याचा अभ्यास करता कारण तुमच्याकडे पण रूपरेषा असली पाहिजेत तुम्हाला आमच्याकडून पूर्ण सहकार्य भेटेल. तुमच्याकडून खूप अपेक्षा आहेत आमच्या. एवढ्या मोठ्या सोसायटीच्या पदावर बसताना तुम्ही यांची मीटिंग का घेतली नाही याचे उत्तर द्या.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: परब साहेब, मला वाटतं तुम्हाला सर्वांना याची जाणीव ठेवायला पाहिजे. आम्हाला मान्य आहे ही मोठी जबाबदारी आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य लागेल.पंधरा दिवसात, मागे काय झालं या सर्व गोष्टी जाणून घेऊन विचार करून आपलं मन बनवणं खूपच मोठी जबाबदारी आहे. मला सांगायचं आहे तुम्हाला ही जी तुमची अपेक्षा आहे ती आम्ही निश्चितच पूर्ण करू. पण मला वाटतं तुम्ही जरी येथे बसला असतात तरी पंधरा दिवसात तुम्ही सुद्धा हे करू शकला नसता.

श्री रामपरब (युईडी):साहेब, आमचा हा प्रश्न आहे की या गोष्टीचा निर्णय तुम्हाला आत्ता घ्यायचा आहे. पाच मिनिटात निर्णय झाला पाहिजे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: परब साहेब, तुम्हाला प्रश्नाचे उत्तर मिळालं ना ?

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): साहेब, माझे सहकाऱ्याकडून चुकून काही बोलणं झालं असेल तर माफी असावी. साहेब, या आमच्या भावना आहेत.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: आपण सर्व एक आहोत हे लक्षात असावं.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): साहेब, मी आधीच सांगितलं, तुम्ही आणि श्रीराम सर आस्थापनातील एक कडक शासक आहात. या केसची संपूर्ण माहिती आमच्या राजापुरे साहेबांनी सांगितली आहे. वर्षभर आम्ही या गोष्टीचा  पाठपुरावा करत होतो. मागच्या एजीएममध्ये तीन तास असाच गोंधळ झाला. यांनी कबूल केलेलं, या मिनिट्समध्ये नाही.  त्यांनी कबूल केले आहे याचे पुरावे आहेत. ते पैसे भरतील हे त्यांनी सांगावं. यावर जास्त चर्चा नको कारण विषय खूप आहेत. आपल्याला पुढे जायचे आहे. निर्णय घ्या. हे पैसे किती दिवसात भरणार? तरुण कुमार श्रीवास्तवयांची रिकवरी चालू आहे याच्याशी आम्हाला घेणे देणे नाही.

श्री राजापुरे (डीआरएचआर): पाटील साहेब बोलले त्यात करेक्शन करायचे आहे. हे आमच्या ‘कर्जसंरक्षण निधी’ मधून गेलेले पैसे आलेच पाहिजेत.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तुम्ही हा सर्व इतिहास सांगितला. ते सहकारखात्याचे आर्टिकल 85 आणि बायलॉज हे तुमच्याकडे देतो. कुठल्या नियमात, कलमात ही केस बसते ते कलम फक्त मला या ठिकाणी सांगा.

श्री राजापुरे (डीआरएचआर):मी पदसिद्ध अध्यक्ष आणि पदसिद्ध उपाध्यक्ष यांना विचारतो जर एखादा एम्पलोयी व्हॉलंटरी रिटायरमेंट घेतो जर त्याची रिटायरमेंट पास होते, तर तो डीएईचा एम्प्लॉयी राहतो का?

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम: एखाद्या एम्पलॉईने व्हॉलंटरी रिटायरमेंट घेतली तर रिटायरमेंट रिलीज झाल्यानंतर तो एम्प्लॉई रहात नाही.

श्री राजापुरे (डीआरएचआर):सोसायटीचा मेंबर तोच राहू शकतो जो डीएईचा एम्प्लॉई आहे. जर तो एम्प्लॉई नाही तर तो सोसायटीचा मेंबर नाही. तर त्याला बेनिफिट कसं दिलं? याचा निर्णय द्या. मी रुल प्रमाणे बोलतोय. जर तुम्हाला असंच करायचं आहे तर आपले असे बरेच सभासद मरण पावले मग ते पण माफ करा.

श्री प्रकाश पाटील(एसआयआरडी): जे आर्टिकल तुम्ही सांगितलं ते तुम्ही आत्ता सांगताय. जी व्यक्ती डिफॉल्टर आहे त्याचं लोन माफ होतं का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: ही योजना मृत झालेल्या सभासदासाठी आहे डिफॉल्टरसाठी नाही.

श्री राजापुरे (डीआरएचआर): तुम्ही बोललात ते बरोबर आहे. डिफॉल्टरसाठी नाही मृत सभासदासाठी आहे. फक्त एक्सपायर्ड होऊन नाही चालत तो सोसायटीचा मेंबर पाहिजे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हा पतसंस्थेच्या बायलॉज आहे. यामध्ये कुठल्या कलमांनुसार मध्ये तो पतसंस्थेचा सभासद होत नाही.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): तुम्ही सर्व नियमाप्रमाणे बोलता, तर मला मिनिट्सची कॉपी बायलॉज प्रमाणे किती दिवसांनी दिली ?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: एक महिन्यांमध्ये तुम्हाला मिनिट्स द्यायला पाहिजे होते.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): चार-पाच महिन्यांनी दिले. कशासाठी? जेवढा वेळ घेता येईल तेवढा या मिनिटमध्ये फेरफार करण्यासाठी. आमसभे पुढे मिनिट्स पास होतील यासाठी एवढा वेळ घेतला. मागच्या मीटिंगमध्ये ठराव पास झाला आहे.

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम :पाटील साहेब, प्लीज मेंटेन सायलेन्स. सर्वांनी शांत रहा.

एक सभासद: तुम्ही गेल्यावेळी हे सर्व सांगितलं नाही आणि आता हे सर्व बायलॉजचे नियम सांगत आहात.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: सर्वांनी शांत रहा. त्यांचं बोलणं ऐकून घेऊ त्यांना पण बोलायला वेळ देऊ. हा प्रश्न लवकरात लवकर सोडवायचा आहे.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): साहेब, मी तुमच्या मताशी संपूर्ण सहमत आहे. पण साहेब, गेल्या वेळेस याच विषयावर यांनी तीन तास गोंधळ घातला. मागच्या मिटींगचे मिनिट्स वाचून दाखवतो. रेकॉर्डिंग दाखवतो, त्यांनी मान्य केले आहे ते दाखवतो. मग त्यावर का वेळ घालवायचा यांनी?

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: हे बघा, असं सर्व चालणार नाही. असा गोंधळ करायचा असेल तर मी मीटिंग बंद करतो. ही पद्धत नाही मिटींग घ्यायची. त्यांना बोलायला वेळ द्या. दोन मिनिट वेळ द्या.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):अध्यक्ष साहेब, आम्ही तुम्हाला विनंती करतो हे असं कुठल्या आर्टिकलमध्ये आहे की निर्णय दिल्यानंतर हे पुन्हा बदलू  शकतात? ते वाचून दाखवायला सांगा. साहेब, त्यांना आम्ही पाच मिनिट देतो. परंतु सर, खोटं बोलणं मान्य नाही. खोटं बोलणं खपवून घेणार नाही.

श्री संतोष कांबळे (ईआरएमएस): हे जोपर्यंत हे मान्य करत नाहीत, तो पर्यंत मीटिंग पुढे जाणार नाही.  तुम्ही म्हणताय मीटिंग बंद करा, तर बंद करा.  चालेल.

श्री राजेश कळके (सीडीएम): जोपर्यंत ते ठराव मान्य करत नाहीत आणि पैसे भरत नाहीत तोपर्यंत मीटिंग बंद करा. हे आधीच ठरलेलं आहे. आता त्यांचं काहीच ऐकायचं नाही. ठराव झाल्यानंतर पुन्हा ठराव बदलता येतो का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यावर जे काही दुमत असेल त्यावर मत मांडायला नको आहे का?

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):तुम्ही कबूल केलेले आहे. आता तुम्हाला मत मांडण्याचा अधिकार नाही.

श्री राजेश कळके (सीडीएम):तुम्ही आत्ता आर्टिकल शोधून आणलं का? एक वर्ष कुठे गेले होते तुम्ही? अध्यक्ष साहेब, यांनी मागे मान्य केलं आहे. आता पुन्हा त्यावर  जाता येणार नाही.

श्री पावस्कर : तुम्हाला कर्ज माफ करायचं होतं त्यावेळी हे आर्टिकल शोधून आम्हाला दाखवायचं होतं. सभेत मांडायचं होतं. त्यावेळी तुमच्याकडे काही नव्हतं.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: ज्यावेळी संचालक मंडळामध्ये हा विषय आला त्यावेळी याच आर्टिकलवर आणि या कलमावर खूप मोठी चर्चा झाली. त्यामध्ये सभासदत्व बायलॉज क्रमांक 25 प्रमाणे संपुष्टात येईल ते असे

1. मृत्यू झाल्यास

2. कायमचे वेड लागल्यास

3.राजीनामा दिल्यानंतर तो संचालक मंडळाच्या मीटिंगमध्ये मंजूर झाल्यास राजीनामा संस्थेच्या सभासदत्वाचा.

4. सर्व भाग हस्तांतर केल्यास

5. क्रियाशील सभासद म स कायदा अधिनियम 1960 कलम अंतर्गत काढून टाकण्यात येईल.

6. म स अधिनियम 1960 कलम 35 व त्याखालील नियम 28/ 29 या तीन तरतुदीनुसार जर त्याच्याकडे ड्युज असतील अशा सभासदाने राजीनामा दिला तरी तो मंजूर होत नाही.

श्री राजापुरे (डी आर एच आर):क्रियाशील सभासदाची व्याख्या सांगण्यात यावी.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):आपली सोसायटी ही पगारदार सभासदांची सोसायटी आहे तुम्ही दुसऱ्या सोसायटीचा बायलॉज इथे वाचून दाखवत आहात. आपली पगारदार पतसंस्था आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हा आपला बायलॉज आहे.

<u>क्रियाशिल सभासद</u>

क्रियाशिल सभासद म्हणजे जो सभासद संस्थेच्या खालील बाबी पूर्ण करीत असलेले सभासद हे क्रियाशील सभासद असतील

अ) सदर सभासदाची संस्थेच्या मागील 5 वर्षातील एका सर्वसाधारण सभेस उपस्थिती असली पाहिजे किंवा सर्वसाधारण सभेने सभासदाची अनुपस्थिती क्षमापित केली असली पाहिजे.

ब) संस्थेबरोबर सदर सभासदाची मागील सलग 5 वर्षामध्ये किमान एकदा संस्थेकडून कर्ज घेतलेले असले पाहिजे किंवा संस्थेत ठेव ठेवलेली असली पाहिजे. ठेव व्यवहार/वर्गणी (भागभांडवल)

यामध्ये मागील सलग पाच वर्षामध्ये सलग एक वर्षाकरिता संस्थेच्या खेळत्या भांडवलाप्रमाणे खालील प्रमाणे असणे आवश्यक राहील.

| संस्थेचेखेळतेभांडवल | किमानठेवी / वर्गणी (भागभांडवल) अथवादोन्हीमिळून |
|---|---|
| रु.**10** लाखापर्यंत | रु.**1000/-** |
| रु.**10** लाखापेक्षाजास्तआणि रु.**1** कोटीपर्यंत | रु.**2500/-** |
| रु.**1** कोटी व त्यापेक्षाजास्तआणि रु.**10** कोटीपर्यंत | रु.**5000/-** |
| रु.**10** कोटीआणित्यापेक्षाजास्तआणि रु.**100** कोटीपर्यंत | रु.**10000/-** |
| रु.**100** कोटीपेक्षाजास्त | रु.**25000/-** |

ब- क्रियाशील नसलेला व थकबाकीदार सभासदास संस्थेच्या व्यवहारात मतदानाचा अधिकार असणार नाही.

किंवा

नाममात्र सभासद –संस्थेच्या सभासदास सेवानिवृत्त झालेनंतर संस्थेचे नाममात्र सभासदत्व देता येईल. सदर नाममात्र सभासदास संस्थेत ठेवी ठेवता येतील. मात्र कर्ज घेता येणार नाही व त्याला मतदानाचा अधिकार असणार नाही.

श्री विलास घोरपडे (एएफडी):सेवानिवृत्त झालेला सभासद हा नाममात्र असतो हे तुम्ही मान्यकरा अगर न करा, तो नाममात्र आहे. नाममात्र सभासदाला कोणतेही अधिकार नाहीत हे बायलॉज सांगत आहे.

श्री राजापुरे (डीआरएचआर): जर सभासद मयत झाले तर तुम्ही आपले जे आता पाच कोटी ओव्हर ड्युज आहेत ते माफ करणार का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे. ओव्हर ड्युज हे सर्व सर्विसमध्ये असलेल्या सर्व सभासदांचे आहेत.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):अध्यक्ष साहेब, सन्माननीय उपाध्यक्ष श्री श्रीराम साहेब आपण पूर्ण बीएआरसीचे ऍडमिनिस्ट्रेशन सांभाळता.आपल्याला सर्व विषयाची खडानखडा माहिती आहे. तुमच्याकडून एवढेच उत्तर अपेक्षित आहे की जो काही ठराव झाला तो सर्व तुम्हाला कळला असेल. सभागृहाने दिलेला ठराव मंजूर केलेला आहे आणि नाममात्र सभासदाचे सभासदत्व जाणून

बुजून त्याचा एक वर्ष राजीनामा मंजूर केलेला नाही. हा सर्व गोंधळ थांबवण्याकरिता, एजीएममध्ये झालेला ठराव आहे आणि आपल्या बायलॉजनुसार या मुद्द्याचा यापूर्वीच मंजूर झालेला ठराव पुन्हा मांडता येणार नाही. साहेब, हे तुम्हाला फिरवतील कारण तुम्हाला काही माहिती नाही. ते तुम्हाला काहीही उत्तर देतील, परंतु येथे असलेल्या सर्व सभासदांकडून तुम्ही उत्तर जाणून घ्या. या सर्वसाधारण सभेचा सर्वात मोठा केंद्रबिंदू हे सभासद आहेत आणि या सभागृहाचे सर्व कर्मचारी आहेत. तुम्ही त्यांना विचारा, ठराव संमत झालेला आहे किंवा नाही. आता संचालक मंडळ तुम्हाला सांगत असेल की हा ठराव संमत झालेला नाही तर आमच्याकडे त्याची ऑडिओ क्लिप आहे, व्हिडिओ क्लिप आहे.त्यांनी तुम्हाला दिले नाही तर ते आम्ही तुम्हाला देऊ पण एवढ्या दूर न जाता सन्माननीय श्रीराम साहेब हे एडमिन सांभाळतात तुम्ही पण एक महत्वाचे डिपार्टमेंट सांभाळता. माझी तुमच्याकडे हात जोडून विनंती आहे की हा विषय खेळवत न ठेवता जर विषय संपवायचा असेल तर सभागृहामध्ये असलेल्या सर्व सभासदांबरोबर तुम्ही चर्चा करा. जर का तुम्हाला वाटतं की हा ठराव मंजूर झालेला नाही तर येथे बसलेले सर्वजण हे काय दोनशे तीनशे रुपयांचे कुपन घ्यायला आलेले नाहीत. सोसायटीमध्ये भरलेला पैसा यांच्या कष्टाचा आहे. त्याचा जर दुरुपयोग होत असेल तर हे कर्मचारी कदापि सहन करणार नाहीत. माझी या सभागृहातर्फे तुम्हाला एकच विनंती आहे की तुम्ही सभागृहाला विचारा आणि जो काही निर्णय आहे तो निर्णय घ्या. कारण संचालक मंडळावर आमचा विश्वास नाही. प्रत्येक सभासदाने जागेवर उभे राहून हा ठराव पास केलेला आहे आणि अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासमोर संचालक मंडळाने हात उंच करून ठराव संमत केला याची नोंद केलेली आहे. हे सर्व होत असताना अशा चुकीच्या गोष्टी पुढे येत असतील तर हे सर्व चुकीचे आहे. तुम्ही निर्णय घ्या एवढी सभागृहाच्या वतीने मी विनंती करतो. धन्यवाद.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी):सर्वांनी ऐका. ज्यासाठी सर्वजण आपण उपस्थित आहोत हे सर्व होईपर्यंत, याचा सर्व छडा  लावल्याशिवाय, आपण राहाणार नाही आहोत. अध्यक्ष साहेब, तुम्ही विचार करा.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: या सभेमध्ये जे काही रिझोल्यूशन पास होतात त्याला आपण पूर्णपणे ॲक्सेप्ट केलं पाहिजे. त्याच्यात कोणत्याही कुठल्याही प्रकारची सूट आम्ही अध्यक्ष, उपाध्यक्ष म्हणून देणार नाही. त्याचप्रमाणे मी सचिवांना सांगितलं की जे काही रिझोल्युशन पास झालं, यात जी काही चूक आहे ती पण त्यांनी करेक्ट करायची आहे. मला कुठलेही कॉमेंट्स नको. मी बोलणं बंद करू का? आम्ही पण नवीन आहोत. तुमच्यासारखे जुने जाणते नाहीत.तुमची पण मदत पाहिजे. तुम्ही मदत केलीत तर मदत मिळेल, नाहीतर आम्ही पण काम बंद करू. त्यांना सांगितलं आहे मागच्या वेळेला जे रिझोल्युशन पास झालं त्यानुसार. त्यांना पण तुम्ही मदत करा

आणि आपण सर्वांनी मिळून यावर तोडगा काढलेला आहे. त्या ठरावा प्रमाणेच होणार. जी चूक झालेली आहे या मिनिट्समध्ये त्यात करेक्शन करण्यात येईल.  हे मान्य आहे का सगळ्यांना?

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): अध्यक्ष साहेब, मी जे वाचून दाखवतो त्याप्रमाणे जर ते मान्य करत असतील तर नक्कीच मान्य करू साहेब.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मागच्या मीटिंगमध्ये जे रिझोल्युशन पास झालं होतं त्याला अनुसरून 31 डिसेंबर 2024 पर्यंत  हे संचालक मंडळ ती रक्कम त्या ठिकाणी भरतील.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: मला वाटतं यावर तोडगा निघालेला आहे. यावर आता जास्त फाटे फोडू नयेत असं माझं मत आहे. 31 डिसेंबर 2024 पर्यंत जी रक्कम आहे ती संचालक मंडळ जमा करेल हा ठराव आपण पास करू.

श्री अरुण कोळी (सीडीएम): आजचा विषय आहे त्यामध्ये जी चूक आहे ती चूक दुरुस्त केलेली पुढच्या मिटिंगच्या मिनिट्समध्ये येणे गरजेचे आहे. कारण मागील सभेमध्ये ज्या अहवालामध्ये मला आमसभा रत्न पुरस्कार दिला होता त्यावेळी मी असा विषय नमूद केला होता की मागील मिनिट्समध्ये मी काहीच बोललो नाही तरी तुम्ही मला आमसभा रत्न दिले आहे. माझं वक्तव्यच नव्हतं. मी तर खूप विषय मांडले होते तरीही नोंद या मिनिट्स मध्ये नाही. मी जे काही विषय मांडले होते मागच्या मिनिट्समध्ये ते विषय इथे नाहीत मग मी मिनिट्स पास होऊ नाही देणार. आता जो ठराव होईल तो ठराव संचालक मंडळाकडून आला पाहिजे. संचालक मंडळाकडून सूचक आणि अनुमोदक आलं पाहिजे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई:  माझी सर्वांना विनंती आहे मागच्या मिनिट्स ऑफ मीटिंगमध्ये जी चूक झालेली आहे ते रिझोल्यूशन पास करा. ही चूक झालेली आहे ती दुरुस्त करतोय त्याला अनुमोदन द्या. हे सर्वांना मान्य आहे का? आणि दुसरं म्हणजे सर्वांना विनंती आहे की जी रक्कम ठरावानुसार द्यायची आहे ती रक्कम 31 डिसेंबर 2024 पर्यंत संचालक मंडळ जमा करेल त्याचा एक ठराव आला पाहिजे.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): याला संचालक मंडळाकडून सूचक आणि अनुमोदक आलं पाहिजे.  धन्यवाद.

श्री राम परब (युईडी): मला एवढंच बोलायचं होतं की तुम्ही पुढच्या एजेमला बसल्यावर पुन्हा गडबड व्हायला नाही पाहिजे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: मी माझ्याकडून प्रयत्न करीन पण येणारच नाही याची खात्री देणार नाही. उगाच बोलायला मिळते म्हणून बोलायचं नाही कोणीही. येथे येऊन बसा ना मग तुम्ही.

श्री राम परब (युईडी): आम्ही तुम्हाला बोलत नाही. जी घटना घडली आहे त्याबद्दल बोलत आहोत. एवढा वेळ वाया गेला तरीही तिथून काहीच आलं नाही. संचालक मंडळाकडून सूचक अनुमोदक आलेलं नाही.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): अध्यक्ष साहेब, मी तुमचं मनापासून स्वागत करतो की तुम्ही खूप चांगल्या पद्धतीने हा विषय हँडल केला. एकच सांगू इच्छितो की ज्यांनी याला विरोध केला होता त्या संचालकांना यामधून वगळण्यात यावे.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी):आधी ठराव वाचा मग पुढे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तरुणकुमार श्रीवास्तव यांचे कर्ज निरस्त झालं होतं ते 31 डिसेंबर 2024 पर्यंत भरलं जाईल.

श्री राजेश कळके (सीडीएम): नाही. ठरावात स्पष्टता नाही.

श्री राजापुरे (डी आर एच आर): ठरावात रक्कम व स्पष्टता आली पाहिजे. तुम्ही सर्व नका बोलू. रक्कम बोला. आपुलकी सभासद निधी आणि मृत्यू सहाय्य निधी दिलं असेल तर त्याचं काय?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: राजापुरे साहेब, जे कर्ज निरस्त झालं ती रक्कम.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): 31 डिसेंबर 2024 पर्यंत उपस्थित असलेल्या संचालक मंडळाने जी रक्कम असेल ती भरण्यास संचालक मंडळ तयार आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: 31 डिसेंबर 2024 पर्यंत तरुण कुमार श्रीवास्तव यांची कर्जाची जी काही रक्कम असेल ती निरस्त केलेली रक्कम.

श्री राजापुरे (डी आर एच आर):आपुलकी निधी आणि मृत्यू सहाय्य निधी याचं काय? जर तुम्ही ते दिले असतील तर? म्हणून उर्वरित रक्कम हे नको आहे. मला स्पष्टता हवी पूर्ण रक्कम काय आहे ते बोला.

श्री संतोष कांबळे (ईआरएमएस): सेक्रेटरी साहेब, तुम्ही आकडे सांगा. हे सगळं तुमचं कर्तव्य आहे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: सर्वांनी शांत बसा. एकाने बोला. पुन्हा मागे जाण्याची गरज नाही.

**ठराव: मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: ठराव पास करण्यात येत आहे की तरुण कुमार श्रीवास्तवा यांची कर्ज निरस्त झालेली रक्कम म्हणजे रु.10,24,741/- , रु.1लाख आपुलकी सभासद निधी आणि रु.15,000/- मृत्यू सहाय्य निधी असे एकूण रु.11,39,749/- ही रक्कम 31 डिसेंबर 2024 पर्यंत संचालक मंडळ भरेल.**

**सूचक : श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय, खजिनदार**

**अनुमोदक : श्री हेमंत कोळी, चेअरमन**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): खूप खूप धन्यवाद.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: आणखी एक रिझोल्युशन पास करूया आपण येथे. मागच्या मिटींगच्या मिनिट्स मध्ये जे करेक्शन करायचे आहे ते सुद्धा करून घ्यावे मला पुन्हा मागच्या गोष्टीवर बोलायचं नाही. आय ॲम ॲक्शन मॅन. आता ॲक्शन झाली आहे. विषय बंद.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): अध्यक्ष साहेब, या प्रकरणाची रीतसर मी जी काही सहकार

आयुक्तांकडे तक्रार केलेली आहे ती 31 डिसेंबर 2024 नंतर यांनी रक्कम भरल्यानंतर, आमच्या निदर्शनास आणल्यानंतर, ती तक्रार मागे घेऊ.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: धन्यवाद. संचालक मंडळ ती रक्कम भरल्यानंतर ते तुम्हाला माहिती पाठवतील त्यानंतर तुम्ही ती तक्रार मागे घ्या.

श्री प्रवीण सावंत(सीडीएम): अध्यक्ष साहेब, हा विषय जवळजवळ दीड तास चालू आहे. सभा किती वाजता संपवायची? आपल्याला मला सांगायचं आहे आपण मिनिट्स पास करतोय या मिनिट्समध्ये यांनी हे बोललं, ते बोललं 117 पानांचे मिनिट्स आहे, जे महत्त्वाचे मुद्दे आहेत आम्ही त्या मुद्द्यांमध्ये या या व्यक्तीची चर्चा केली आणि यामध्ये हा निर्णय झाला इथपर्यंत ठीक आहे. पण प्रत्येक नाव आलं पाहिजे, मी काय बोललो याची गरज नाही याची नोंद घ्यावी.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: मला सर्वांना विचारायचं आहे हा जो अजेंडा आहे जो दीड तास चालत आहे यावर आपण तोडगा काढलेला आहे. याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो.

श्री राजेश कळके (सीडीएम):सर्वांनी ऐकून घ्या. मागे पुन्हा पाच दिवसांनी जी स्थगित झालेली एजीएम झाली होती त्यात शेवटी बालाजी साहेबांनी कबूल केलं होतं जी नोकरभरती झाली बारा जणांची त्यात चार जण असे आहेत जे नोकरीसाठी अर्ज करतात पण त्यावर त्यांच्या सह्याच नाहीत. यासाठी कमिटी नेमू असं मिनिट्समध्ये आहे. आपल्याला ती सुद्धा कमिटी नेमली पाहिजे. जर लोन फॉर्मवर बॉरोअरची सही नसेल तर त्याचं लोन मंजूर होऊ शकतं का? मग जर त्यांच्या नोकरीच्या अर्जावर त्यांच्या सह्याच नाहीत तर ते कर्मचारी कसे? त्यांनी कर्मचारीच नाही तर बीएआरसी आस्थापनालाही फसवलं आहे. कारण त्यांना एन्ट्री परमिट सोसायटीमुळे मिळाले. कारण त्यांनी सांगितलं हे आमचे कर्मचारी आहेत. हा तर मोठा गुन्हा आहे यावर समिती नेमली पाहिजे चर्चा झाली पाहिजे. हे लंगडं समर्थन काय करतात की राजेश कळके तुम्ही त्या कमिटीचे चेअरमन बना. मी 8 वी पास, चेअरमन बनू शकतो का? जे या मिनिट्स मध्ये लिहिले आहे ते मान्य करावे लागेल.

श्री प्रभात सिंग (सीडीएम): अध्यक्ष साहेब, मी तुमच्याकडे विनंती करतो की काहीजण उगाच पर्सनल गोष्टी बोलत वेळ वाया घालवत आहेत. तर हे सर्व तुम्ही थांबवा.

श्री राजेश कळके (सीडीएम): साहेब, तुम्ही मिनिट्स वाचा. यासाठी कमिटी आता नेमायची आहे. एक वर्ष झालं आहे या विषयाला. तुम्ही म्हणाले मिनिट्समध्ये जे काही आहे ते आपण लागू करू. नंतर नाही साहेब. मग तुम्ही का विषय टाळता?

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: जर समिती नेमायची असेल तर तो डिसिजन घेतला जाईल पण आता लगेच होणार नाही.

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम: ऐका. तुम्ही आमच्यावर अशी बंदूक लावून आत्ता लगेच करा असं नाही बोलू शकत. जे मिनिट्समध्ये आहे ते सर्व होणारच. तुम्ही असं बोलू नका की आत्ता पंधरा मिनिटात लगेच हे करून द्या. तसं होणार नाही. जे मिनिट्समध्ये आहे त्याप्रमाणे डिसिजन होणार ते पण लवकरात लवकर होईल. सोसायटीचा अजेंडा आहे. प्रश्न विचारण्याचा तुम्हाला अधिकार आहे. पण तुमच्या म्हणण्याप्रमाणे मी उत्तर देणार असं नाही.

पदसिद्ध अध्यक्ष गिरीश शेणई: कळके साहेब, त्यांनी सांगितलं आहे ना लवकरात लवकर होईल. मग तुम्ही समजून घ्या.

श्री सारंग (एएफडी): मी तुमच्या अनुमतीने बोलतो सर. मिनिट्समध्ये पान क्रमांक 34 वर संचालक मंडळाचे सेक्रेटरी बोलले आहेत कर्जावरचा व्याजदर कमी करणार. आम्ही त्यावेळी सर्व सभागृहासमोर मांडले होते आणि आम्हाला खात्री देण्यात आली होती आम्ही व्याजदर कमी करू. पण या वर्षभरात व्याजदर कमी झालेला नाही. मला वाटतं या सभागृहामध्ये मिनिट्स होऊन जर

संचालक मंडळ ते पाळत नसेल तर मग या मीटिंग हव्यात कशाला? आमचे तृतीय श्रेणी कर्मचारी आहेत आता चतुर्थ श्रेणी कर्मचारी नाही आहेत पण जे तृतीय श्रेणी कर्मचारी आहेत ते कर्ज घेण्याच्या बाबतीत खूप जास्त आहेत. हे सभागृह मान्य करते का जवळजवळ 80% हा वर्ग लोन घेतो. तो वर्ग लेवल पे-2 पासून सुरू होतो. मुद्दा हाच आहे जर वर्षभरामध्ये व्याजदर कमी झालेला नाही, सेक्रेटरी साहेबांनी सांगितलं होतं  तरी सुद्धा त्यांनी ते नाही केलं. सेक्रेटरी यांचे शब्द आहेत फायनान्शियल तज्ञांचे मत घेऊन, यावर विचार करून व्याजदर कमी करू. कोणत्या फायनान्शिअल तज्ञांशी चर्चा केली ते सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: व्याजदर ठरवण्याचा अधिकार संचालक मंडळाला आहे. पण  आपल्या कर्जाचे स्ट्रक्चर 25 जानेवारी 2024 नंतर बदलले. त्यामध्ये प्रत्येक कर्जदाराला 18 ते 50 लाखाचं कर्ज मिळत आहे.

श्री श्रीधरन (सीडीएम): हे तुम्ही मिनिट्सवर बोलत नाही रिपोर्टबद्दल बोलत आहात. तुम्ही प्लीज मिनिट्स बद्दल बोला.

पदसिद्ध अध्यक्ष गिरीश शेणई: हे मिनिट्स मध्ये आहे का ते सांगा. हे पान क्रमांक 34 वर आहे. त्यांचा प्रश्न आहे व्याजदर कमी केला आहे का?

श्री श्रीधरन (सीडीएम): जर का हे मिनिट्समध्ये रेकॉर्ड नाही झालं तर ते रेकॉर्ड करा आणि पास करा. त्यावर चर्चा करू नका.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हो व्याजदर कमी केला आहे.

श्री सारंग (एएफडी): व्याजदर  10.35 % आहे. कमी झालेला नाही.

मानदसचिव शिवाजी हगवणे: मी तेच सांगतोय. गेल्या वेळेस मी सांगितलं होतं की जे नवीन कर्जाचे स्ट्रक्चर आले आहे त्यात 5 लाखापर्यंतचे कर्ज 8.5% ने देतआहोत आणि जे जुनं कर्ज होतं स्पेशल लोन 10 लाखापर्यंत त्यांनतर 12 लाखापर्यंत या सर्वांना एकत्र कन्सिडर करून जे 5  लाखाचे वरील कर्ज 10.35%  दराने देत आहोत. 27 लाखाचं कर्ज काढलेला जो माणूस आहे त्याला जवळजवळ 608 रुपयाचा फायदा होत आहे.

श्रीसारंग (एएफडी): आपल्या बायलॉजमध्ये व्याजदर 6 ते 12% आहे. तुम्ही हायर साईडला का  जात आहात? 6,7, 8 % व्याजदर अशा साईडला का येत नाही? जे आपलं कर्ज 10.35% गेले आहे त्याचं कारण कर्ज सुरक्षा योजना असेच आहे का?

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: तुम्ही एकदा मुद्दा मांडला ना, आता पुन्हा नाही.

श्री राजापुरे (डीआरएचआर):पान क्रमांक 70 आपल्या फ्रँकिंग मशीन मध्ये जो कॅरीफोरवर्ड 24,000/-  लिहिले आहे आणि आणि आधीच्या वर्षाला रु.4,95,000/- आहे आणि त्यामध्ये 10 लाखाची रक्कम लोड केली आणि यावर्षी 10 लाखाची रक्कम लोडच केली नाही,  तर तुम्ही मिनिट्समध्ये कसं लिहिलं. बॅलन्सशीटमध्ये तुम्ही लिहिलं नाही. बॅलन्सशीट मध्ये 5 लाखफक्त तुम्ही लिहिलंय.पुढल्या वर्षीच्या मिनिट्समध्ये हे आलं पाहिजे. पान नंबर 70 वर  10 लाखा ऐवजी 5 लाख करा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: पान क्रमांक 70 पहिल्या दोन ओळींमध्ये 10 लाखाऐवजी 5 लाख ही दुरुस्ती करून घेतली. पुढे 15 लाख लिहिले त्याऐवजी ते 9 लाख 95 हजार येतील ही पूर्ण दुरुस्ती करून घेतली.

श्री राजापुरे (डीआरएचआर):गेल्या वर्षी बालाजी साहेबांनी तुम्हाला सांगितलं होतं राजापुरे यांच्या प्रश्नाला उत्तर देता येत नाही तर त्यांना सोसायटीमध्ये डॉक्युमेंट दाखवा. मला फ्रँकिंग मशीनची फाईल दाखवणार होते पण मला कालपर्यंत ती फ्रँकिंग मशीनची फाईल दाखवली नाही. त्यांनी दाखवतो म्हणून आम्ही बॅलन्सशीट पास केली पण त्यांनी दाखवलं नाही. सर, हा मिनिट्सचा  विषय आहे.  मी सोसायटीला पत्र पण दिलं की मला एक्सपेंडीचर व्हाऊचर दाखवा पण त्यांनी दाखवले नाही. मग तुम्ही म्हणता मिनिट पास करा.

मानदसचिव श्री शिवाजी हगवणे: राजापुरे साहेब, तुम्ही गेले पंधरा दिवस सोसायटीमध्ये येत आहात. मी व्यवस्थापकांना सांगितले होते की तुम्हाला जी काही फाईल बघायची असेल त्या सर्व गोष्टी दाखवा.

श्री राजापुरे (डीआरएचआर):तुम्ही मला दहा पंधरा दिवस फाईल्स दाखवल्या हे मान्य आहे पण मी जीफाईल मागितली, 25- 30 वेळा मी मॅनेजरना रिमाइंड केलं, बाहुबली साहेबांना रिमाइंड केलं पण मला कालपर्यंत ती फाईल दाखवली नाही. ती जर फाईल बघितली असती तर त्याबद्दल मी बोललो असतो  गेल्या वर्षी 10.35 लाखाच्या रिबन कशा लागल्या? मग यावेळी का नाही लागल्या?

एक सभासद: अध्यक्ष साहेब, विषय क्रमांक 1 घेतला आहे. खूप साधा विषय आहे सहकारकायद्यानुसार तुमच्या मिटींगचे मिनिट्स एक महिन्याच्या आत तुम्ही डिस्प्ले करायचे असतात, त्यावर जे काही करेक्शन असतात ते करायचे असतात. कारण सभागृहाचा वेळ वाया जाऊ नये म्हणून ते मिनिट्स या रिपोर्टमध्ये द्यायचे असतात. पण येथे गेल्या तीन-चार वर्षांपासून हेच सुरू

आहे.त्यापेक्षा ही संचालक मंडळाची जी जबाबदारी आहे जी त्यांनी आधी पासून पूर्णपणे पार पाडली पाहिजे आणि हे पुढच्या वर्षी मीटिंगमध्ये येऊ नये.

श्री श्रीधरन (सीडीएम): अध्यक्ष साहेब,जे मिनिट्समध्ये नाही आहे ते आले पाहिजे. हे मिनिट्स मध्ये नाही जसं प्रवीण सावंत बोलले फक्त मुद्देसूद मिनिट्स पाहिजे. हे रामायण सारखं झालं प्रत्येक व्यक्ती जे बोलले ते पण आहे. असं मिनिट्स नाही. रिपोर्ट्सवर चर्चा करा. मिनिट्समध्ये रेकॉर्डिंग नाही आहे त्यामध्ये रेकॉर्ड करा आणि बस करा.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी):मी मिनिट्स पास करत आहे.

**ठराव क्र.1:ठराव पास करण्यात आला की, 62व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये श्री अरुण कोळी त्यांनी आमसभारत्न पुरस्कार न घेणे व कर्मचारी भरतीबाबत तसेच 62वी वार्षिक सर्वसाधारण सभा तहकूब करणेत येत असलेबाबत न घेतलेले ठराव यांच्या नोंदी इतिवृत्तात सर्वानुमते घेण्यात आल्या.**

**पुन्हा ठराव पास करण्यात आला की दि. 31 डिसेंबर 2024 पर्यंत. श्रीवास्तव यांच्या निरस्त केलेल्या कर्जाची पूर्ण रक्कम संचालक मंडळ भरेल असा ठराव कायम करण्यात आला.**

**पुन्हा ठराव पास करण्यात आला की, 62व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त केलेल्या नोंदीसह सर्वानुमते स्विकारून ते कायम करण्यात आले.**

**सूचक श्री प्रकाश पाटील (अस. आय .आर.डी )**

**अनुमोदक श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी)**

**ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: सर्वांचे धन्यवाद. अजेंडा नंबर एक, दोन तासाने पास झाला आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: विषय क्रमांक दोन वाचून दाखविला.

**विषय क्र.2: 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मंजुरी देणे.**

श्री विलास घोरपडे (एएफडी): 63 वा वार्षिक अहवाल आहे. तुम्ही गंगाजळी 10% आणली त्यासाठी तुमचे धन्यवाद मानतो. त्यामुळे आपले 15% वाचले पण त्याचा उपयोग आपल्या सभासदांना होत आहे असं वाटत नाही. तुम्ही जे बजेट पास करून घेता त्या बजेटमध्ये काही जास्त

पास करून घेता. उदाहरणार्थ या बजेटमध्ये गेल्यावेळी विक्रम कर्ज सरक्षण योजनेमध्ये 1 कोटी कव्हर केले होते. बजेटमध्ये 2 कोटीची तरतूद होती. पण तिथे दोन कोटी न करता तिथे तुम्ही फक्त 50 लाख टाकले. यामुळे काय झालं विक्रम कर्ज संरक्षण योजनेमध्ये सभासदांचा जो पैसा जातो तो 0.50% ऐवजी 0.25% गेला असता त्यांचं बर्डन कमी झालं असतं. त्याचा विचार न करता तुम्ही 1 कोटीची तरतूद सभासद सहाय्य निधीमध्ये करता. जिथे 1 कोटी आहे तिथे 2 कोटी 20 लाख  टाकले आणि जिथे 2 कोटी आहेत तिथे 50 लाख टाकले असं का केलं?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: जी विक्रम कर्ज संरक्षण निधी योजना आहे त्यामध्ये 0.5% घेतो. गेल्या वर्षी हा फंड कमी होता त्यामध्ये 1 कोटी वर्ग केले. गेल्या दोन वर्षाचा अहवाल बघितला तर आपले स्वतःच्या ज्या ठेवी आहेत त्या 61 वर्षांमध्ये 53 कोटी पर्यंत गेल्या होत्या. त्या गेल्या दोन वर्षांमध्ये आपल्या ठेवी 78 कोटी वाढल्या म्हणजे 25 कोटी रुपये वाढले या असेट्स मधून संस्थेला जो येणारा  इंट्रेस्ट आहे, त्यावरून आपले व्याजदर कमी करण्याचा मानस या संचालक मंडळाने ठेवला आहे. त्यामुळे पुढच्या आर्थिक वर्षांमध्ये जे व्याजदर कमी होतील ते त्यामध्ये बाकीच्या प्रोव्हिजन करण्यास अडचण होईल म्हणून यावेळी आपण जे मोठे फंड आहेत त्यामध्ये प्रोव्हिजन केली. 0.5% ने पैसे आहेत त्यामध्ये 50 लाख टाकले.

श्री विलास घोरपडे (एएफडी): ठीक आहे मला तुमचे उत्तर समजलं. जिथे आपण 1 कोटीची तरतूद करतो तिथे 2  कोटी 20 लाखाची तरतूद करतो . त्या वाढीमागील  कारण,  तुमचाहेतू काय ते सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: त्या पाठीमागचा हेतू म्हणजे ज्या गोष्टी सभासदांना देता येतात त्या या निधीमधून देता येतात. त्यामध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या सभासदांना प्रतिवर्षी रु.500/- या गोष्टी किंवा विद्यार्थी गुणगौरव किंवा भविष्यामध्ये सभासदांना इतर गोष्टी द्यायच्या असतील तर त्या तिथून देऊ शकतो.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): अध्यक्ष साहेब, मी माजी  संचालक. खरंतर आर्थिक वर्षाचा अहवाल बघितला तर सर सेम प्रश्न बॅलन्सशीट वरच आहे.

श्री विलास घोरपडे (एएफडी):तुम्ही सांगताय की जे रिटायर होत आहेत त्यांना तुम्ही बेनिफिट देत आहे तो मिळाला पाहिजे पण संस्था ही कोणामुळे चालते.

मानद  सचिव श्री शिवाजी हगवणे : संस्था ही सभासदांमुळे चालते.

श्री विलास घोरपडे (एएफडी):सभासदांमध्ये, कोणत्या सभासदांमुळे संस्था चालते. मी फक्त 500/- रुपये संस्थेत भरले म्हणून संस्था चालते का.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कर्जदारांमुळे संस्था चालते.

श्री विलास घोरपडे (एएफडी):मग त्यांचेच प्रश्न तुम्ही कुठे लक्षात घेता? या 2 कोटी 20 लाखांमध्ये.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: माझं मत सांगतोय.

श्री विलास घोरपडे (एएफडी):तुमचं मत नको. तुम्ही सेक्रेटरी आहात. तुमच्या 15 जणांचे मत सांगा काय झालं मिटिंग मध्ये?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: विक्रम कर्ज संरक्षण योजनेचा फंड हळूहळू वाढत आहे म्हणूनच 2 कोटी टाकले तर तो आणखी वाढेल.

श्री विलास घोरपडे (एएफडी):तुम्ही 0.5% ने घेत आहात ते तुम्ही 0.25%ने घेतले असते आणिहे 2 कोटी तिकडे टाकले असते तर आमचे कर्जदारांचे बर्डन वाचले असते हेच मला तुम्हाला सांगायचं आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आपण कर्जदारांना जो व्याजदर लावतो तो 9.85% आहे.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): माननीय अध्यक्ष साहेब, याच प्रश्नाचे अनेक पैलू असू शकतात. म्हणून आपण कृपया सभासद काय म्हणतात ते ऐकून घ्या.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: सर्वांनी ऐकून घ्या. एकावेळी एकच प्रश्न मांडा. घोरपडे यांच्या प्रश्नाचं उत्तर त्यांना मिळालं पाहिजे एवढेच माझे म्हणणे आहे.

श्री अरुण कोळी (सीडीएम): व्याजदर ठरवण्याचा अधिकार संचालक मंडळाला आहे पण उपविधीत असं लिहिलं आहे की जो व्याजदर आहे त्यापेक्षा 0.5% जास्त व्याजदर आकारता येईल. यांना व्याजदर ठरवण्याचा अधिकार आहे का? मुंबई बँकेकडून हे कर्ज घेतात मग सभासदांचे व्याजदर आम्ही सभेमध्ये सांगितलं म्हणून आम्ही आश्वस्त होतो की पुढच्या वर्षी 0.5% आहे ते 0.25% होईल. काहीतरी कमी होईल म्हणून आम्ही मंजुरी दिली. पण मंजुरी घेऊन सुद्धा त्यांनी सभासद कल्याण निधीमध्ये वर्ग केले. म्हणजे हा 2 कोटी 20 लाख फंड पूर्णपणे संचालक मंडळाला वापरण्यासाठी फंड आहे. माझं म्हणणं आहे जेव्हा प्रोव्हिजन करता तेव्हा मागील दोन वर्षाचे बॅलन्सशीट समोर ठेवून ती प्रोव्हिजन करा. त्यामध्ये खूप तफावत आहे. सभासद कल्याण निधीमध्ये दोन कोटींनी वाढवण्याची गरज काय आहे. हे तुम्ही खर्च करणार. तुमचा अधिकार आहे. विक्रम कर्ज

संरक्षण योजनेमध्ये 0.25%, 0.35% करा. हा मुद्दा महत्त्वाचा आहे. या बॅलन्सशीटमध्ये 4 कोटी 20 लाखाची प्रोव्हिजन पूर्णपणे राईटअप करून उरलेली रक्कम ही विक्रम कर्ज संरक्षण योजनेला वळवावी ही विनंती.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कोळी साहेब ही सभासद कल्याण निधीमधली जी रक्कम आहे ती ह्या पाच वर्षातील या संचालक मंडळाची शेवटची तरतूद असेल. आता बॅलन्सशीट झाल्यानंतर ती राईटअप करता येणे शक्य नाही. जर टेक्निकली काही प्रॉब्लेम येत नसेल तर त्यामध्ये 1 कोटी काढून आपण विक्रम कर्ज संरक्षणमध्ये टाकू.

श्री अरुण कोळी (सीडीएम): प्रोव्हिजन आहे त्यामध्ये विक्रम कर्ज संरक्षण योजनेला पन्नास लाख दिलेले आहेत आणि सभासद कल्याण निधीला 2 कोटी 20 लाख दिले आहेत. तुम्ही सभागृहामधून ठराव घ्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: गेल्या वर्षी आपण विक्रम कर्ज संरक्षण योजनेमध्ये 1 कोटी टाकले यावर्षी आपण दीड कोटी टाकू.

श्री अरुण कोळी (सीडीएम): गेल्या वर्षी जी प्रोव्हिजन होती ती यामध्ये टाका आणि उर्वरित सभासद कल्याण निधीमध्ये टाका प्रॉब्लेम काहीच नाही यावर ठराव घ्या.

श्री सारंग (एएफडी):मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो आपण कर्ज घेणे ही माझी जबाबदारी आहे तसेच कर्ज फेडणे सुद्धा माझी जबाबदारी आहे. आपली जी योजना आहे त्याचं नाव बदलून विक्रम कर्ज संरक्षण योजना असं केलं त्यामध्ये 0.5% तरतूद करण्यात आली म्हणजे जो व्याजदर घेतो त्यापेक्षा 0.5% जास्त जमा होणार. मग हा जो विक्रम कर्ज संरक्षण योजनेचा फंड आहे तो सर्व सभासदांचा आहे. मग त्या सभासदांसोबत न्याय होतोय का? म्हणून तो फंड फक्त कर्ज निरस्त करण्यासाठी वापरण्यात यावा. नाहीतर हा फंड भविष्यामध्ये फुग्यासारखा फुगेल आणि तो या संस्थेच्या डोक्यावर येऊन आपटेल. आपण जो काही निर्णय घेतो त्यामध्ये संचालक मंडळ, पदसिद्ध अध्यक्ष, पदसिद्ध उपाध्यक्ष हे असतात. यामध्ये सीए असावेत आणि तशा पद्धतीने एक संचालक मंडळ असावं. पण आता तशा पद्धतीचं संचालक मंडळ नाही. आपण कोणच इथे अर्थतज्ञ नाही आहोत. मी सुद्धा नाही आणि हाउस सुद्धा नाही. म्हणून हे जे म्हणताय हेड बदलायचं, राईट अप करायचं हे एवढं सोपं नाही. तिथे मोठा टेक्निकल इशू येऊ शकतो. आपल्याला काम कसं करायचं आहे की सोसायटीवर कायदेशीर काहीच नाही आलं पाहिजे. जर आपले मागील दहा वर्षाचे अहवाल सेंट्रल फायनान्शियल ब्युरोने बघितले तर खूप अडचण होईल. पुढच्या अहवालामध्ये विक्रम कर्ज संरक्षण योजनेमध्ये ही तरतूद शून्य असली पाहिजे. आणि पुढे सुद्धा नसली पाहिजे. जर

काही महामारी आली तर त्याची पूर्ण काळजी घेण्यासाठी हा फंड आहे. आपला रिझर्व फंड पण खूप आहे त्यातून जर तरतूद करून देत असेल तर बघा. आता हा फंड आहे त्यामधून तुम्ही 0.5% घेत आहात 0.2% वर येऊ शकतो याची मला खात्री आहे. आपल्याकडे जवळजवळ 5 कोटी रक्कम झालेली आहे. मी पण काही एकटा बोलत नाही चर्चा करूनच बोलत आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कोळी साहेब, या पुढच्या वर्षांमध्ये सन 2024-25 आणि 2025-26 मध्ये सभासद रिटायर होणार आहेत आणि त्यामध्ये आपण सभासदांना जे 500 रुपये पूर्ण सभासदत्वासाठी देतो ती या वर्षाची रक्कम 1 कोटी 18 लाखआहे. त्यामुळे ही रक्कम पुढे पण वाढणार आहे म्हणून मी विनंती करतो तुम्हाला कारण रिटायरमेंट जास्त आहेत.

श्री सारंग (एएफडी): 0.3% कमी करा. मग बघा तुम्हाला समजेल. जर सोसायटीचे नुकसान होणार असेल तर पुन्हा 0.5% करा. करून बघा. सर्व सभासदांना फायदा होईल आणि करणारच म्हणून सांगा.

एक सभासद: तुम्ही व्याजदर कमी करणार असे मागे मीटिंगमध्ये चर्चा झाली होती. जे पण कोण रिटायर होतात त्यांच्यासाठी का तुम्ही पैसा वाया घालवता? जे रिटायर होतात त्यांना भरपूर पैसे मिळतात. प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी सर्व काही मिळतं मग कशाला आपण त्या ठिकाणी पैसा वापरायचा?

श्री सारंग (एएफडी): तुम्ही 0.2% कमी करा. सभासदांचा फायदा करा. जर सोसायटी डबघाईला जात असेल तर मी माझ्या रिटायरमेंटचे पैसे पण सोसायटीला देईन.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आपल्या सोसायटीचं कर्ज वाटप हे 1000 कोटीचं झालेलं आहे आणि त्याला प्रोटेक्ट करण्यासाठी फक्त पाच कोटी रुपये आहेत.

श्री सारंग (एएफडी): तुम्ही सरासरी सांगा. तुम्ही तो आकडा सांगा जे तुम्ही लोन निरस्त केलं आहे. किती रक्कम गेली आहे ते सांगा. 1.59 कोटी गेले आहेत. 0.5% मध्ये दर महिन्याला किती फंड येतो सोसायटीला?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: 24 जानेवारी 2024 मध्ये आपण नवीन कर्ज चालू केले आहे. आता कर्जाची मर्यादा वाढत वाढत जाणार आहे. आपल्याकडे अशी कोणतीही सरासरी नाही की या वर्षांमध्ये किती सभासद मृत होतील. गेल्या वर्षी 1.60 कोटी रक्कम निरस्त केली गेली. या वर्षी किती असेल ते माहित नाही. म्हणून जर काही अडचण निर्माण झाली पुढील कर्ज निरस्त करायला म्हणून माझी विनंती आहे सभागृहाला, जो सभासद मृत झाला त्याचा जामीनदार रिलीज

होतो. सभागृहात बसलेला प्रत्येक सभासद कोणालातरी जामीनदार राहिला आहे म्हणून हा फंड थोडा रेज होण्यासाठी विचार करू.

श्री विलास घोरपडे (एएफडी): तुम्ही पन्नास लाख टाकले, फंड रेज झाला ना? तुम्ही दोन कोटी तिथे टाकले. यामध्ये टाकले असते तर इथे फंड वाढला असता. तुम्ही दोन उत्तर देत आहात.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आपण जो सभासदांना रिटायरमेंटला देतो ते बंद करायचं आहे का?

श्री राम परब (युईडी):बंद करायचं नाही, मला त्यावर बोलायचं आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मी सर्वांना रिक्वेस्ट करतोय पुढच्या वर्षी मेंबर वेल्फेअर फंड मध्ये प्रोविजन करायला आपल्याकडे फंड नसणार आहे म्हणून हे बोलतोय. मी या ठिकाणी कमीट करतो की 1 एप्रिल 2025 ला आपले व्याजदर कमी झालेले दिसतील. आपण 10.35% हे व्याजदर सभासदांकडून घेतो ते 1 एप्रिल 2025 ला कमी झालेले दिसेल. त्यासाठीच हे संचालक मंडळ प्रयत्न करत आहे.

श्री अरुण कोळी (सीडीएम): तुम्ही भविष्यवाणी केली. आनंदाची गोष्ट आहे. कोणत्या बेसवर तुम्ही हे बोलत आहात. तुम्ही प्रयत्न करताय पण त्यासाठी रस्ता तरी पाहिजे. तुमच्याकडे फंड काय, प्रोव्हिजन काय आहे ते सांगा. मुंबई बँक व्याजदर कमी करणार आहे का? तुम्ही करू शकणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. बायलॉज म्हणतो आणि जे कमी केले 0.5% ते पण नियमबाह्य आहे. तुम्हाला अधिकार आहे का? तुम्ही उपविधी दुरुस्त करायला आणली आहे. तुम्हाला अधिकार आहे 6% ते 12% ठेवायला, पण कधी? जर तुम्ही मुंबई बँकेकडून कर्ज घेत नसाल तर. 225 कोटी कर्ज मुंबई बँकेचे आहे तर ते तुम्ही देऊ शकणार आहात का? सीसीएल नील करणार आहात का तुम्ही?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तेच सांगतोय मी. यामध्ये तुम्ही बोलता ते चुकीच आहे.

श्री अरुण कोळी (सीडीएम): मला उत्तर देताना सरळ उत्तर द्यायचं. कोणत्या नियमाने देताय 8.5% ते सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: गेल्या वर्षी एजीएमला ठरलं होतं आपण जी अमेंडमेंट केली होती

श्री अरुण कोळी (सीडीएम): ते मिनिट्समध्ये आहे का? असेल तर वाचून दाखवा. तुम्हाला अधिकार नाही. मी स्वतः तुम्हाला सोसायटीमध्ये येऊन सांगितलं तुम्ही एकदा उपविधी दुरुस्ती केली तर प्रश्नच येत नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मला आठवते की श्रीधरन साहेबांनी सांगितलं होतं सभागृहाला आश्वस्त करा.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: इंग्लिश मध्ये पान क्रमांक 66 वर आहे लोन इंटरेस्ट 8.5% त्यासाठी राजापुरे यांचे वक्तव्य आहे तुम्ही वाचू शकता.

श्री अरुण कोळी (सीडीएम): ते 8.5% आहे हे मला माहिती आहे.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: मला थोडं सर्वांना सांगू द्या. आधी आपलं जे लोन होतं ते तीन प्रकारचे होते. आता दोन प्रकारचे आहे. बायलॉजमध्ये काय आहे? ऑर्डिनरी लोन पाच लाख आहे म्हणजे सोसायटी फंड सभासदांचे जे डिपॉझिट आहेत तो ऑर्डीनरी लोन देण्यासाठी वापरू शकतो. त्यातून जो फंड वाचतो तो स्पेशल लोनसाठी वापरतो. त्यानंतर जर फंड कमी पडत असेल तर मुंबई बँकेचे सीसीएल अप्रूव्ह करून वापरायचे. 2024 मध्ये सर्व लोन एकत्र झालं. जे स्वतःच्या फंड वर लोन देतो ते स्वत:च्या फंडवर म्हणजे शेअर्स, एफ डी इंटरेस्ट हे आहे जर आपल्या बायलॉज बरोबर जाऊ तर आपलं  लोन एकत्र आहे. आपला उद्देश काय आहे आपलं टार्गेट काय आहे हे सभागृहाला सांगतो. सर्वांचे टार्गेट हेच आहे आणि आमचेही टार्गेट सेमच आहे की लोन कमी व्याज दराने मिळावं. आम्ही सीसीएल घेतो एमडीसीसी बँकेकडून 8.9% आणि आमचा लॉन्ग टर्म लोनचा इंटरेस्ट दर आहे 8.5% . त्यावर लोन प्रोटेक्शन 0.5% म्हणजे 9% झाले.  0.5% हे वेगळ आहे याचा अर्थ 0.4% मायनस मध्ये हाऊस मान्य करेल. हे मी 8.9% च्या खाली लोन देऊ शकत नाही जरी आम्ही 8.5% देतोय आणि आपल्याला अमेंडमेंट करायची असेल मी हाऊसला विचारतो याआधी या हाऊसमध्ये बायलॉजचं उल्लंघन झालं आहे की नाही? ऑडिनरी लोन 3 लाख होते. किती जणांना 5 लाख लोन देण्यात आलं? त्यामध्ये बायलॉजचं उल्लंघन झालं आहे की नाही? तुम्ही सांगा. कोणासाठी झालं फक्त मेंबर्सच्या फायद्यासाठी झालं. ऑर्डीनरी लोन जे आहे ते आपल्या सेल्फ फंडवर आहे त्यावर देऊ शकतो. 25 लाखाच्या खाली किती लोन दिले आहे. जास्त नाही आहे. 8.5% च्या खाली दिलेले आहे ते सेल्फ फंड आहे. हेच उत्तर आम्ही को-ऑपरेटिव्ह कमिशनरला पण दिलं. मला मेंबरच नाव घ्यायचं नाही त्या मेंबरने कंप्लेंट केली की बायलॉजचे उल्लंघन झालं आहे. ते आम्ही केला आहे पण कंप्लेंट म्हणून आम्हाला को-ऑपरेटिव्ह कमिशनर कडून लेटर आलं की तुम्ही बायलॉजचं उलघन केलं आहे. म्हणून आम्ही शुअरीटी वाढवण्यासाठी

अमेंडमेंट घेऊन आलो आहोत. मान्य आहे, एवढ्या वर्षांमध्ये पण उल्लंघन झाले आहे. अरुण कोळी साहेब तुमच्या काळात उल्लंघन झालं नाही का? झालं आहे. वर्षानुवर्ष झालं आहे. सभागृहाला समजलं पाहिजे हे उल्लंघन सभासदांना फायदा देण्यासाठी झाले आहे. थोड्या वेळापूर्वी रूल, नियमबाबत सेक्रेटरी सांगत होते. सेक्रेटरींचे उत्तर मी देऊ शकत नाही. पण हाऊसला समजले पाहिजे त्यांनी विचारलं दोन करोडचा मुद्दा. त्यावर मी बोललो या हाऊसमध्ये गॅरंटी घेऊन सांगतो की डायरी डिस्ट्रीब्यूशन केलं आहे. हाऊस बोलले की पुढच्या वर्षी नाही करायचं तर त्यातला एकही पैसा जाणार नाही हे संचालक मंडळ तुम्हाला गॅरंटी देत आहे. हाऊसला सांगायचं आहे सारंग साहेबांनी सांगितलं 0.5% ते प्रोटेक्शन फंड म्हणून जे येतं ते बोलतात की प्रोविजन कमी का केली तर त्याचे उत्तर आहे आम्ही प्रोव्हिजन लागू केली होती की जो फंड जाईल किती राहील हे आम्हाला माहिती नाही. आमचं टार्गेट काय आहे सभासदांना बेनिफिट द्यायचा आहे. मला पाठीमागे जाऊन बोलायचं नाही आहे. स्पेशल एजीएम घेऊन केलेलं आहे. त्यावर बोलणं झालं आहे. यामध्ये दोन कोटी टाकले. सेक्रेटरीनी सांगितलं की खूप सभासदांची आता रिटायरमेंट आहे, एक सभासद बोलून गेले की खूप पैसा मिळतो रिटायर झाल्यावर. मी मानतो जो सभासद सोसायटीमध्ये सभासदत्व बंद करतो तेव्हा त्या सभासदाकडे लायबिलिटी पण खूप असते. या सोसायटीला 100 करोड पासून 1000 करोडवर घेऊन येणारे हेच सभासद आहेत जे रिटायर्ड होत आहेत. ते माझ्यासमोर बसले आहेत आमच्या जाहीरनाम्यामध्ये होतं सभासदांचा सन्मान केला जाणार. लोकांनी ते मान्य केलं. हाऊसला विचारलं. एजीएममध्ये विचारलं पाहिजे का पाचशे रुपये प्रतिवर्षाला. जे सभासद रु.2500, 3000 घेऊन जात होते त्यांना जास्त मोबदला मिळतो हे कोणासाठी? ज्यांनी 15%, 18% व्याज सोसायटीला दिलं आहे. आणि सोसायटीला इथपर्यंत घेऊन आले आहेत. त्या सभासदांचे बेनिफिट त्यांना द्यायचं नाही असं तुम्ही बोललात तर नाही द्यायचं. आम्हाला काही अडचण नाही. आम्ही बंद करतो. पण जेवढ्या पण स्कीम घेऊन आलो ते सर्व सभासदांसाठीच. डायरी डिस्ट्रीब्यूशन केलं, मला माहिती आहे खूप सभासद आज याच मुद्द्यासाठी बसले आहेत की आम्ही डायरी डीस्ट्रीब्यूशन केलं, करप्शन केलं, त्यावरसेक्रेटरी उत्तर देणार. या जागी उभे रहायला सर्वांना अडचण होतेच. अरुण कोळी,सेक्रेटरी होते त्यांना सर्व माहिती आहे मागे काय काय झालं होतं.

श्री सारंग (एएफडी): सेक्रेटरीशिवाय इथे कोणीही बोलायचं नाही.

श्री विलास घोरपडे (एएफडी):अध्यक्ष साहेब, जर यांना आपल्या जाहीरनाम्याबद्दल बोलायचं असेल तर माझ्याकडे यांचा जाहीरनामा आहे. त्यावर मी खूप बोलू शकतो. यांचा जाहीरनामा ऐकायला आम्ही इथे आलेलो नाही.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): तुमच्या जाहीरनाम्याचे बोलता त्या जाहीरनाम्याप्रमाणे एक तरी चांगलं काम तुम्ही केलं का ते सांगा. आता त्यांना जाहीरनाम्यावर बोलायला कोण सांगत आहे. आमच्याकडे पण बोलायला बरच काही आहे. यांचा जाहीरनामा खूप मोठा आहे जर आम्ही बोलायला सुरुवात केली तर हे इथे बसू शकत नाही.

श्री सारंग (एएफडी): माझा प्रश्न अजून पण अनुत्तरीत आहे. तुम्ही म्हणालात की पुढे किती सभासद मृत पावतील हे माहिती नाही. तुमच्याकडे मागच्या दहा वर्षाची सरासरीआहे तो मृत्यूदर काढून आता इथे तुम्ही मृत्यूदर सांगू शकता. दहा वर्षात किती सभासद मरण पावले, वीस-पंचवीस किती? महामारी पकडून सांगा. अध्यक्ष साहेब मागच्या मीटिंगमध्ये तुम्ही नव्हता आणि यांनी तुम्हाला काही सांगितलं पण नसणार या योजनेबद्दल. या फंडाला आपण वाढवायचा पण जेव्हा फंड संपत येईल तेव्हा आणि जर फंड संपला तर पुढच्या वर्षामध्ये त्या केसेस निरस्त करायच्या हे तुम्हाला माहिती आहे. तुम्ही सर्वांनी ऐकलं आहे. हे तुम्हाला कॅरीफॉरवर्ड करायचे आहे. त्या केसेस जर कर्ज या वर्षामध्ये निरस्त नाही झाल्या तर शुरिटी कटिंग थांबवावी. कर्ज निरस्त आपण करणारच आहोत. त्यावेळी पण मी हेच सांगत होतो आता पण मी हेच सांगत आहे. तुम्ही फायनान्शियल इन्स्टिट्यूट चालवत आहात. यामध्ये तुम्ही गैरव्यवहार करू शकत नाही. जर आपल्याकडे आता नवीन कर्जाचा मुद्दा आला आहे त्यात फक्त दोनच हेड आहेत लॉन्ग टर्म लोन आणि दुसरं इमर्जन्सी लोन.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: सारंग साहेब, बस झालं खूप वेळ दिला तुम्हाला.

श्री विलास घोरपडे (एएफडी):अध्यक्ष साहेब, यांचे मित्र शिबु यांनी जे सांगितलं की आम्ही उपविधीचे उल्लंघन केलं आहे, तुम्ही या डायसवरून सभागृहाला सांगा की आम्ही उपविधीचे उल्लंघन करत आहोत हे फक्त तुमच्या तोंडाने तुम्ही बोला.

श्री प्रवीण सावंत (सीडीएम): अध्यक्ष साहेब,व्यासपीठावरून सेक्रेटरीनी असं चुकीचं वक्तव्य करायला नको. तुम्ही सभासदांच्या फायद्यासाठी उपविधीचे उल्लंघन करता याची वाच्यता करण्याची गरज नव्हती.

श्री अरुण कोळी (सीडीएम): अध्यक्ष साहेब, मी जवळजवळ 12 वर्षे सोसायटीचा संचालक राहिलो आहे आणि आठ वर्ष सेक्रेटरी राहिलो आहे. माझा एवढाच प्रश्न आहे जे आम्ही केलं, मागच्या संचालक मंडळाने केलं ते तुम्ही करू नका. या दृष्टिकोनातून उचललेलं हे पाऊल आहे. तुम्हाला वाटतं की ही उपविधी पायधूळी मिळवू आणि पुढे जाऊ तर ठीक आहे. जो निर्णय येईल सहकार खात्याकडून तो तुम्ही मान्य करा. मी तुम्हाला सांगितलं उपविधीमध्ये प्रोव्हीजन नाही. तुम्ही सांगा प्रोव्हीजन आहे, 5 लाख 8.5% ने देऊ शकतो, प्रश्न संपला. तुम्ही देता त्याला आम्ही नाकारत नाही पण ज्या गोष्टी करू शकत नाही ते तुम्हाला दाखवायचं आहे. तुम्हाला लोकांनी निवडून दिले आहे. मागच्याकमिटीने 3 लाखावर होतं 5 लाख दिले. कोणी त्यांना ऑब्जेक्शन घेतलं? कोणीच नाही. तसं तुम्ही करा. प्रॉब्लेम काय आहे? पण या डायसवरून अशा पद्धतीचे वक्तव्य आलं नाही पाहिजे की, 'जी चूक तुम्ही केली आम्ही पण तेच करणार'.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मागच्या एजीएममध्ये आपण अमेंडमेंट घेऊन आलो होतो ऑर्डीनरी लोन हे 9%ने देत होतो. स्पेशल लोनचा व्याजदर ठरवण्याचा अधिकार संचालक मंडळाला असतो. 12 लाखापर्यंत 10%टक्के आणि त्यापुढे 11% हे सर्व बदलून सहकार खात्याच्या परिपत्रकानुसार एक लॉन्ग टर्म लोन आणि दुसरं इमर्जन्सी लोन असे दोन पद्धतीचे लोन चालू आहेत. 450 कोटीचे कर्ज हे लॉंग टर्ममध्ये आहे. त्यामध्ये 100 करोडचे ऑर्डीनरी लोन वर्ग झाले आहे जवळजवळ 350 ते 400 करोडचे कर्ज आहे ते आपण 8.5% देतआहोत. ते आपल्या सेल्फ फंडातून देत आहोत. त्याचा सभासदांना फायदा होत आहे. 50 लाखापर्यंतच कर्ज जे 9.85% ने देत आहोत त्यावर संचालक मंडळ काम करत आहे आणि त्याचा व्याजदर पुढे नक्कीच कमी होईल.

श्री यदुवीर सिंग (एच एल यु): अध्यक्ष साहेब, सेक्रेटरी साहेबांना विचारतो कीआपले 521 कोटीचे कर्ज 8.5% ने आहे ते तुम्हीपाच लाखावरून सात लाख करू शकता. माझं 22 लाखाचे जे लोन आहे त्यासाठी 2700 जास्त जात आहेत, तुम्ही डिव्हीडंट 2250 देता, मग माझा काय फायदा होतो?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तुम्ही कॅल्क्युलेशन करा. तुम्हाला फायदा झालेला आहे.

श्री यदुवीर सिंग (एचएलयु): ठीक आहे. आत्ता करा इथे कॅल्क्युलेशन.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: हे सर्व कॅल्क्युलेशन करण्याची ही जागा नाही. ही एजीएम आहे. इथे हे सर्व होऊ शकत नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मी आधीच सांगितले आहे ज्यांनी लॉन्ग टर्म लोन घेतले आहे त्यांचं लोन यामध्ये मर्ज केल्यावर सर्व सभासदांना 608 रुपयांचा फायदा झाला आहे. तुम्ही सोसायटीमध्ये या, मी तुम्हाला सर्व कॅल्क्युलेशन दाखवतो.

श्री श्रीधरन (सीडीएम) : तुम्ही हे लोन केले आहे त्यामध्ये मॉडिफाय करणार आहात, तो वेगळा प्रश्न आहे तुम्ही सांगितलं होतं तसं जेव्हा मी 40 लाख साठी कर्ज घेणार तेव्हा पहिले पाच लाख 8.5% होणार मागच्या लोकांना पण त्यामध्ये कंटिन्यू करणार. लोन घेतल्यानंतर एक वर्षानंतर अशा सभासदाचा मृत्यू झाल्यास कर्ज माफ होणार का? असा माझा डाऊट आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यावर आपण स्पेशल एजीएम घेतली होती त्यामध्ये या विषयावर चर्चा केली होती. जर एखादा सभासद लोन घेतो चार वाजता आणि देव न करो, लोन घेतल्यानंतर त्याच टायमावर त्याचा मृत्यू होतो तरी त्याचं पूर्णलोन माफ होईल.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): अध्यक्ष साहेब, माझी अशी विनंती आहे की मी प्रश्न विचारीन त्याची सर्व उत्तरे सेक्रेटरी देतील मला ती त्यांच्याकडून हवी आहेत ना शिबूकडून ना दुसऱ्या कोणाकडून. सर इतर लोक मध्ये येतील बोलायला आणि मग विषयाचं विषयांतर होतं. म्हणून मी हे बोलत आहे.

पदसिद्ध अध्यक्ष गिरीश शेणई: वाडेकर, समजून घ्या. फायनान्स ही अशी गोष्ट आहे जी सर्वांना समजत नाही. मलाही समजत नाही म्हणून जर फायनान्स रिलेटेड असेल तर त्यावर खजिनदार चांगलं उत्तर देऊ शकतो. हे असं सर्व फिरवून उत्तर देण्यात का वेळ वाया घालवायचा?

श्री मनोज वाडेकर (आरइडी): मला विचारायचं आहे की मेंबर वेल्फेअर फंड मधून जे डायरी छापण्याचं काम केलं त्याला रु.35,37,972/- इतका खर्च आला. मी यांना पत्र लिहिलं होतं. यांनी 18600 डायरी छापली.ज्यांना काम दिले त्या क्यूब पार्टनरला त्याची किंमत आहे रु.184.50 फक्त. याला जर 18600ने गुणले तर येतात रु.34,57,280/- फक्त. तर यामध्ये मला चूक दिसून येते जे त्यांनी रिपोर्टमध्ये दाखवले आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: याचे उत्तर लगेच देतो. चूक नाही आहे. त्यामध्ये डायरी प्रिंटिंग आणि डायरी डिस्ट्रीब्यूशनचा खर्च आहे.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): म्हणजे कुरिअर चार्जेस पण आहेत. अजून एक प्रश्न विचारतो की त्यांनी रु.184.50 ची डायरी दाखवली आहे त्या 18600 मध्ये 35 वेगळ्या छापल्या आहेत. ह्या 35 डायऱ्या वेगळ्या का छापल्या? त्याचं कारण काय आणि त्याची किंमत काय त्याचेउत्तर मला देण्यात यावं.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे:35 नाही 32 डायऱ्या वेगळ्या छापल्या. बऱ्याचश्या एजन्सीजकडून वेळोवेळी सोसायटीला मदत होत असते. त्यांच्याकडून मागणी केली नव्हती. मला त्यांचं नाव घ्यायचं नाही. त्यांची नावे घेऊन मला अपमान करायचा नाही. आस्थापनेच्या ज्या ज्या एजन्सी आहेत त्यांना एक 'टोकन ऑफ लव्ह' म्हणून डायरी दिली आहे. याच वर्षी नाही गेल्या वर्षी पण आपण त्यांना डायरी दिली आहे.

श्री मनोज वाडेकर (आर इ डी): असा भेदभाव का करायचा? असं तुम्ही करू नका.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: पुढे आपण डायरी छापणारच नाही तर पुढे असं होणारच नाही. वाडेकर साहेब, भविष्यामध्ये तुम्हालाही या पदावर काम करावं लागलं तर आपल्याला वेगवेगळ्या एजन्सीजकडून कामे करून घ्यावी लागतात ही परंपरा आहे.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): ही जी कोटेशन तुम्ही घेतली आहेत ती कशा पद्धतीने घेण्यात आली ते सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: जे ठरलं त्याप्रमाणे कोटेशन घेण्यात आले कोटेशन वेबसाईटवर टाकण्यात आले होते.

श्री मनोज वाडेकर (आर इ डी): कोणत्या वेबसाईटवर ते सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: पतसंस्थेच्या वेबसाईटवर.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): संस्थेच्या वेबसाईटवर हे कोटेशन नाही. माझ्याकडे प्रत्येक दिवसाचे प्रिंटआऊट आहेत जे तुम्हाला मी दाखवू शकतो. यामध्ये ते नमूद नाही. तुम्ही उत्तर द्या. तुम्हाला माहिती नाही का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: वाडेकर साहेब डायरीचे सर्व काही बाहुबली चौगुले यांनी हँडल केलं होतं म्हणून ते सर्व सांगतील. सर्व माहिती देतील. अध्यक्षांच्या परवानगीने मी विनंती करतो बाहुबली चौगुले साहेब बोलतील.

श्री बाहुबली चौगुले: संस्थेच्या संचालक मंडळाच्या मीटिंगमध्ये डायरी छापण्याचा जो विषय झाला तो एकमताने मान्य झाला त्यानंतर आम्ही कॉस्ट कोटेशन काढले.

श्री मनोज वाडेकर (आरइडी) तुम्हाला जे विचारलं ते बोला. वेबसाईटवर कोटेशन आहे का ते सांगा.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: चौगुले, त्यांनी जे विचारलं तेवढंच उत्तर द्या. हो किंवा नाही तेच बोला.

श्रीबाहुबली चौगुले: हो, टेंडर कोटेशन संस्थेच्या वेबसाईटवर आहे. नोटीस काढली होती ती वेबसाईटवर पण आहे. आम्ही संस्थेच्या नोटीस बोर्डवर तीन ठिकाणी संस्थेमध्ये दोन नोटीस बोर्डवर आणि एक मंदाकिनी ऑफिसच्या नोटीस बोर्डवर जवळजवळ पंधरा दिवस हे टेंडर सर्व ठिकाणी डिस्प्ले केले होते.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): अध्यक्ष साहेब, यांनी उत्तर दिलं की संस्थेच्या वेबसाईटवर टेंडर आहे तर वेबसाईटचे मी प्रिंट आऊट आणले आहेत पंधरा ते अठरा दिवसांचे. वेबसाईटवर प्रिंट डेट विथ टाईम आहे. टेंडर कुठेच नाही. कदाचित या टायमाला सर्व्हर डाऊन असेल म्हणून तुम्ही हे प्रिंट आऊट बघू शकता. आता माझ्याकडे कलर झेरॉक्स आहेत ते पण बघा. यांनी सांगितले की ही वेबसाईटवर लावली. यांनी कधी लावली ते आम्हाला माहिती नाही. कारण की हे काय करतात दुपारी टेंडर लावतात आणि संध्याकाळी काढतात. या हाउसमध्ये सर्वांना विचारा. कोणीतरी या निविदा बघितल्या का? यांनी डायरी आमच्यावर थोपवली आहे.

श्री राजेश कळके (सीडीएम): मुळात कॅलेंडर छापणार नव्हते तर मग डायरी हा विषय आला कुठून.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): या विषयावर 500 सभासदांनी सह्या करून लेटर दिलं होतं संचालक मंडळाला की आम्हाला डायरी नको. तरी यांनी हट्ट धरला.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): जर का पाचशेहून जास्त सभासदांनी सह्या केल्या होत्या की आम्हाला डायरी नको, जेवढे डायरी वाटप झाले ते खूप आहे पुढे करू नका.तरीपण यांनी मनमानी

केली. यापुढे जाऊन मी आणखी काही गोष्टी विचारतो हे जे बोलतात की कोटेशन काढलं होतं ते साफ खोटं आहे ही पहिली स्टेज ह्यांची.

श्री बाहुबली चौगुले: टेंडर वेबसाईटवर टाकले हे खोटं आहे! अस म्हणायच आहे का?

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):तुम्ही सेक्रेटरींना बोलू द्या. आम्हाला डिस्टर्ब करू नका. दमदाटी करायची नाही.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): सर, यांनी पहिल्या प्रश्नाचे उत्तर चुकीचे दिले आहे.माझ्याकडे प्रूफ आहे. 18 ते 20 दिवसांचे कलरमध्ये स्क्रीनशॉट आहेत. हे पूर्ण हाऊसला मला दाखवायचं होतं. हे चूक आहे ते मी दाखवलं. पुढची स्टेप.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: हगवणे तुमच्याकडे काय प्रूफ आहेत ते दाखवा.

श्री राजेश कळके (सीडीएम): हे दोन्ही प्रुफ तुम्ही बघा नाहीतर सायबर तपासणी करा.त्यांचा हा प्रकार खोटा असेल तर सायबर इन्वेस्टीगेशनला द्या. वाडेकर यांना त्यांचं म्हणणं मांडू द्या. त्यांनी यावर अभ्यास केला आहे त्यांना बोलू द्या.

श्री मनोज वाडेकर (आरइडी): पुढच्या स्टेपवर जाऊ.

श्री राजेश कळके (सीडीएम): अध्यक्ष साहेब, त्यांच्याकडे आहेत का बघा नाहीतर पुढे चला. मनोज वाडेकरांनी एक मिनिटात प्रूफ दाखवला. तुम्हाला एवढा वेळ का लागतो.

श्री डी. ए. माने: मला पण अधिकार आहे बोलण्याचा. मला तुम्ही थांबवू शकत नाही. माझी 22 वर्षे सर्विस झालेली आहे. मलाही बरंच काही बोलता येतं. पाटील साहेब, मला एकच बोलायचं आहे तुमच्या मुद्द्यावर. तुम्ही मघापासून बोलता की पाचशे लोकांनी सह्या करून 'डायरी नको' म्हणून सांगितलं त्या पाचशे जणांनी डायरी घेतली की परत केली हे तपासून बघा.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): माने, मी तुम्हाला विचारले नाही. पदसिद्ध अध्यक्षांना विचारले आहे. माझं नाव घ्यायचं नाही यामध्ये. संचालक मंडळाने तुम्हाला बाहुलं म्हणून बसवलं असेल तर ते हाऊसला आधी सांगा.पूर्ण सभागृहाच्या वतीने आम्ही बोलतो.

पदसिद्ध अध्यक्ष गिरीश शेणई: टेंडर नोटीस काढलेली आहे तो पुरावा दाखवावा लागेल.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेबांना दाखवा. इथे सर्वांकडे मोबाईल आहे प्रोजेक्टर लावा आणि दाखवा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सोसायटीच्या वेबसाईटवर हे टेंडर आहे आणि संस्थेच्या नोटीस बोर्ड पण लावलं होतं.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: वाडेकर, जे मोबाईलमध्ये दिसत आहे ते मी वाचतो. बीएआरसी सोसायटीची वेबसाईट आहे त्यामध्ये 'टेंडर नोटीस' म्हणून आयकॉन आहे. त्या आयकॉनमध्ये' ए4 साईज प्रीमियम नोट बुक'असं आहे.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेब, मी तुम्हाला आत्ता सर्व तारखांचे स्क्रीनशॉट दाखवले. त्यामध्ये एकाही दिवशी हे अवेलेबल नव्हते. ते त्यांनी आत्ता कसं मॅनेज केलं माहित नाही. याचा अर्थ ते मॅनेज करतात.

श्री राजेश कळके (सीडीएम): साहेब, डायरी की प्रीमियम नोट बुक? प्रीमियम नोटबुक आणि डायरी या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: डायरी आणि प्रीमियम नोटबुकपैकी डायरीला जीएसटी जास्त लागतो आणि प्रीमियम नोटबुक हा शब्द टाकला तर त्या ठिकाणी जीएसटी 12% लागतो यामध्ये 6% जीएसटी वाचणार होता म्हणून तिथे प्रीमियम नोटबुक टाकले.

श्री राजेश कळके (सीडीएम): 6% जीएसटी वाचवल्याबद्दल तुमचं अभिनंदन.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेब, तुम्हाला डायरीचं जे टेंडर दाखवलं गेलं ते आत्ता फ्रेश दिसतंय. डॉक्युमेंट मेनेज केलं हा आमचा आक्षेप आहे. पण मी पुढच्या गोष्टीवर येतो ती खूप महत्त्वाची आहे.आपण यामध्ये टेंडरिंग करतो त्यामध्ये तीन कोटेशन मागवले गेले L1, L2, L3

L1 आहे रु.184.80 +12% जीएसटी

L2 आहे रु.380 +18 % जीएसटी

L3 आहे रु.420 +18 % जीएसटी

यामध्ये पुढे मी बघितलं जे L3च कोटेशन होतं ते साई इंटरप्राईजेसचे होते त्याच्यापुढे जाऊन पाहिलं तर त्यांचे लेटर हेडवर तुर्भे गावठाण, मुंबई -86 आहे.आता तुर्भे गावठाण कुठे आलं आणि मुंबई 86 कुठे आलं? मुंबई -86 हा पिनकोड घाटकोपरचा आहे. म्हणजे ही कंपनी हे बिल पाहताक्षणीच सर्वांच्या लक्षात येईल, मी ही गोष्ट मान्य करतो की कधी कधी माणसाकडून चुकून पिनकोड टाकला गेला असेल पण जर लेटरहेडवर 86 हा पिन कोड आला याचा अर्थ ते लेटरहेड फेक आहे. म्हणजे हे जाणून-बुजून केलेलं काम आहे. कृपया ही एक गोष्ट नोंद करा. दुसरी गोष्ट L3 मध्ये जीएसटी नंबर दिला नाही,यांचा ई-मेल दिला नाही, यांचा फोन नंबर नाही आणि यांचा ऍड्रेस तर फेकच आहे. ही कंपनी फेक आहे.अस्तित्वातच नाही आहे. आता L2 वर येतो. काय गोष्टी घडल्या आहेत ते मी तुमच्या निदर्शनास आणून देतो. जेव्हा आम्ही ह्यांचा जीएसटी नंबर बघितला त्यानंतर त्यांचा एड्रेस बघितला. या ऍड्रेसवर आम्ही व्हिजीट दिली. तो एक रेसिडेन्शियल एरिया आहे आणि ते एक घर आहे. चौकशी करायला मी आणि राजेश कळके आम्ही दोघे गेलो होतो. चौकशीअंती असं समजलं तिथे या नावाची कुठलीही कंपनी नाही. तिथे आजूबाजूला जेव्हा विचारलं या घराविषयी त्यांनी आम्हाला सांगितलं की चार-पाच वर्षा पासून या घरात कोणीही राहत नाही. पुढची गोष्ट L2आणि L3 यांचं कोटेशन टाकण्यात आलं ते L1ला टेंडर देण्यासाठी. त्यासाठी केलेला हाखेळ आहे. मला माझं म्हणणं मांडू द्या. तुमचं मी नंतर ऐकतो.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: आत्तापर्यंत यांनी जे सांगितलं यावर तुम्ही उत्तर द्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मी या ठिकाणी हे सर्व आरोप खोडून काढतो. जेव्हा एखादी संस्था टेंडर काढते तेव्हा सर्व बाबी तपासूनच काढते. कळके साहेब, सहा वर्षे तुम्ही देखील संचालक होता.

श्री राजेश कळके (सीडीएम): तुम्ही मागच्या गोष्टी काढू नका. नाहीतर मागच्या बऱ्याच काही गोष्टी निघतील.

मानद सचिव शिवाजी हगवणे: टेंडर नोटीस निघाली त्यानंतर टेंडर्स आले. संचालक मंडळाच्या मीटिंगमध्ये टेंडर्स ओपन झालं. आजपर्यंत हीच पद्धत आहे की जे L1 आहे त्यालाच टेंडर देण्यात येत.

श्री राजेश कळके (सीडीएम): तुमचं कर्तव्य आहे की नाही कोटेशन चेक करण्याची.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: जर L1 वर सर्व कंडिशन फुलफिल होत असतील तर L2,L3वर कशाला जायचं.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): जर L2,L3फेक कोटेशन होते तर तुम्ही पुन्हा टेंडर मागवले पाहिजे होते.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): तीन व्हॅलिड कोटेशन आल्याशिवाय ते टेंडर मान्य होत नाही. संपूर्ण निविदा रद्द होते आणि पुन्हा नव्याने रीटेंडरिंग करायचं असतं हे तुमच्या लक्षात असू द्या. जर दोन निविदा फेक आल्या तर निविदा पुन्हा नव्याने काढायची जबाबदारी ही संचालक मंडळाची असते ती तुम्ही पार पाडली नाही.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेब, याचा अर्थ काय झाला? यांनी सर्व कटकारस्थान केलेले आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तुम्ही जे बोलताय त्याचं मी खंडन करतो आणि तुम्ही जे बोलताय ते ऑलरेडी व्हाट्सअपवर फिरत आहे. तुम्ही जी माहिती दिली आहे त्यामुळे तुम्हाला निविदा निघत आहेत हे माहीत होतं. आता जे कोटेशन तुम्ही सभागृहाला दाखवलं तसं त्यांनी आधी का नाही दाखवलं.

श्री विलास घोरपडे (एएफडी):कोटेशन आधी कसे टाकणार कोटेशन तुम्ही आता दाखवलं आहे कारण वेबसाईटवर कोटेशन दिसत नव्हतं. तुम्ही आत्ता मॅनेज केले आहे आणि हे कोटेशन एक नंबरला कसं दिसत आहे. तुम्ही त्यामध्ये चेंजेस केले म्हणून ते एक नंबरला दिसत आहे.

श्री राजापुरे (डीआरएचआर):अध्यक्ष साहेब, मला विचारायचे आहे हे  कोटेशन एक नंबरला कसं ? म्हणजे यावर्षी जे अहवाल छापले ते विदाऊट कोटेशन छापले का? हो किंवा नाही. त्याचं कोटेशन वेबसाईटवर दिसत नाही.

श्री प्रभात सिंग: अध्यक्ष साहेब, एवढा वेळ ही चर्चा सुरू आहे . ते बोलत आहेत की हे फेक आहे तर तुम्ही संचालक मंडळावर केस करा.

श्री राजेश कळके (सीडीएम):अध्यक्ष साहेब, ज्यांनी डायरी छापली, त्यांनाच आता पुन्हा ह्यांनी अहवाल प्रिंटिंगचं काम दिलं.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): अध्यक्ष साहेब, मी आधीच बोललो हे मिनिट्समध्ये फेरफार करू शकतात, वेबसाईटवर कोटेशन टाकलेलं नसताना आता ते टाकतात याचा अर्थ हे काहीही करू शकतात.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): पुढे सांगतो. यांनी सांगितलं L1 बघितलं, L2 मध्ये सरळ दिसते की एड्रेस फेक आहे मुंबई 86 घाटकोपरचा पिनकोड आहे. अजून डीपमध्ये सांगतो तुम्हाला. L2 ही इलेक्ट्रॉनिक आणि इन्स्ट्रुमेंटची कंपनी आहे. ही कंपनी इलेक्ट्रॉनिक सर्किट, ॲम्प्लिफायर या गोष्टी बनवते आणि नेटवर  जीएसटी नंबर टाकला तर एसजी4नावाचा कोड येतो. तो कोड जी कंपनी जे प्रॉडक्ट विकते त्याच्याशी संबंधित असतो आणि या कोड व्यतिरिक्त ती कंपनी दुसरे प्रॉडक्ट विकू शकत नाही.  हा कायद्याने गुन्हा आहे. जर ती कंपनी असं काही करत असेलतर कायद्याच्या कलमानुसार त्या कंपनीला 50 हजार रुपये दंड असतो. ती व्यक्ती मूर्ख नाही की हे करून स्वत:ला दंड बसवून घेईल. यावरून हे दिसण्यात येतं की त्यांनी  हे फेक कोटेशन टाकले आहे.

श्री राजेश कळके (सीडीएम):अध्यक्ष साहेब, वीस हजार सभासदांना फसवलं. आमचा विश्वासघात केला यांची चौकशी झाली पाहिजे.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):अध्यक्ष साहेब, या गोष्टीची गंभीरता लक्षात घेऊन सभागृहाचा आदर ठेवून आपण सुद्धा विचार करावा. या संचालक मंडळाने राजीनामा द्यावा. यांनी विश्वासघात केलेला आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: डायरी छापण्याचा उद्देश काय होता की सभासदांना ती मिळावी. मागच्या वेळेस पण असे कोटेशन आले होते. त्यामध्ये कुठची कंपनी L1,L2,L3 काय असेल त्या पद्धतीने कोटेशन आले होते.आमच्यावर झालेले आरोप मी खोडून काढतो.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : जर तुमच्याकडे फेक कोटेशन आलं होतं तर तुम्ही रिटेंडरिंग केलं पाहिजे होतं. म्हणजे तुमचं हे काम आधीपासून चालू आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मी टेंडर बद्दल माहिती सांगतोय जे टेंडर येतात त्यामध्ये L1 जर फुलफिल होतं  तर त्यांनाच आपण काम देतो.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):सेक्रेटरी, तुम्ही चुकीची माहिती देऊ नका. तीन व्हॅलिड टेंडर असल्याशिवाय पुढे प्रोसेस होतच नाही. तुम्ही प्रोसेस केली कशी. तुम्हाला जर माहित नसेल तर या सभागृहात ज्यांनी आठ वर्ष सचिव म्हणून काम केले त्यांच्याकडून माहिती घ्या की टेंडर कसे काढाले जाते,कशी प्रोसेस असते.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) :अध्यक्ष साहेब, सेक्रेटरी उत्तर देतील. प्रत्येक वेळी शिबु यांनी उत्तर देऊ नये.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी):अध्यक्ष साहेब, या संचालक मंडळाला या सभासदांनी भरघोस मताने निवडून दिले आहे. जर हे चुकीच्या पद्धतीने काम करत असतील, टेंडर नव्हतं ते आता वेबसाईटवर दाखवतात, चुकीचे मिनिट्स लिहितात. टेंडरप्रक्रिया कशी असते हे यांना माहित आहे तर व्हॅलिड निविदा नसतील तर पुन्हा रीटेंडरिंग केलं पाहिजे व ही यांची जबाबदारी आहे. हे न करता डायरेक्ट L1 ला टेंडर दिले. साहेब, आज यांनी 40 लाख खर्च केले. यांचा वचननामा नंतर बघू पण ज्या पद्धतीने हे चुकीचं काम करतात ते पूर्ण हाऊसचा विश्वासघात आहे. यावर एक कमिटी बसवा चांगली चौकशी होऊ द्या. हा पैशाचा विषय आहे साहेब. संचालक मंडळाने हे पैसे आपल्या खिशातून भरावेत. यांना दंड झालाच पाहिजे नाहीतर भविष्यात ही कामे अशीच चालत राहणार.

श्री राजेश कळके (सीडीएम): साहेब, यांच्याकडून ही रक्कम भरून घ्यावी नाहीतर हे सोसायटीला लुटतील. सहकार परिवर्तन पॅनेलने सांगितलं होतं झिरो करप्शन आणि 100% ट्रान्सपरन्सी. कुठे आहे ट्रान्सपरन्सी?

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): तुमच्या टेबलावर एक विषय असतो त्याला चार जण विरोध करतात तर तुमच्या मनमानी कारभाराने लोन निरस्त केलं की नाही तुम्ही?

श्री मनोज वाडेकर (आरईडी) :साहेब, हे टेंडर तुम्ही स्वतः हाताळा आणि बघा. हे टेंडर फेक आहेत की नाही हे तुम्हाला समजेल.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: तुम्ही म्हणता म्हणून मी आत्ता काहीच करणार नाही. बघायचं असेल तर श्रीराम साहेब आणि मी आम्ही दोघे बघू.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):साहेब, तुम्ही बघणार यात शंका नाही परंतु जर हे फेक ठरलंतर या संचालक मंडळाचे काय करायचं? हे एक माणूस बोलत नाही पूर्ण हाऊस बोलतआहे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: वैराळकर, ही सर्वसाधारण सभा आहे. सर्वसाधारण सभेमध्ये एक माणूस काय म्हणतो त्याप्रमाणे काहीच होत नसतं तुम्हाला पण समजलं पाहिजे. जे काही करायचं असतं ते सर्वानुमते होईल. मी पण दहा वर्ष को-ऑपरेटिव्ह सोसायटीचा सेक्रेटरी राहिलो आहे. मला माहिती आहे. अध्यक्ष एकटा कुठलाही निर्णय घेत नसतो. जे काही ठरेल ते सर्वानुमते ठरेल.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी): जर का हे फेक असेल तर याची जबाबदारी संचालक मंडळ घेईल असा ठराव घ्या. जे काही भविष्यामध्ये प्रश्न उदभवतील जो भुर्दंड झाला तोपण.

श्री राजेश कळके (सीडीएम): त्यांना दंडाप्रमाणे शिक्षा झाली पाहिजे कारण त्यांनी चीटिंग केलं आहे.

पदसिद्ध अध्यक्ष गिरीश शेणई: वैराळकर, ठरावासाठी एक सूचक असतो आणि एक अनुमोदक तुमच्याकडे सूचक आणि अनुमोदक द्या प्रश्न संपला. मी अध्यक्ष आहे मी ठराव मांडू शकत नाही.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी):आज या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी एक ठराव टाकतो तो संमत करण्यासाठी सर्वांनी हात वर करा.

सभागृहाने ठराव पुढील प्रमाणे संमत केला.

ठराव: ठराव करण्यात येत आहे की डायरी छपाईच्या टेंडरिंग प्रोसेसमध्ये चुकीच्या पद्धतीने टेंडरिंग झाले याची शहनिशा करून ज्या पद्धतीने कोर्टकचेरी शिक्षा होईल त्याला संचालक मंडळ पात्र असतील आणि जी रक्कम या डायरी छपाईकरिता लागली, ती या संचालक मंडळाने आपल्या खिशातून भरायची आहे असा ठराव या सभागृहातून पास करण्यातआला.

सूचक : श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी)

अनुमोदक : राजेश कळके (सीडीएम)

ठराव सभागृहाने सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : तुम्ही सभागृहाची दिशाभूल करू नका.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: अशा पद्धतीने ठराव घ्यायचा असेल तर प्रत्येक वेळी संचालक मंडळाला दंड भरावा लागेल, असं नाही.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): अध्यक्ष साहेब ठराव झालेला आहे. तुम्ही अशी चुकीची कामं करून सभासदांना फसवता, त्यांचा विश्वासघात करता. अजून भरपूर चुका आहेत तुमच्या. आज एक झालं, उद्या दुसरं झालं अजून आपल्याला भरपूर पुढे जायचं आहे. तुम्ही बघा अध्यक्ष साहेब, कशा पद्धतीने चुकीचे काम केले. हाऊसमध्ये आम्ही एक ठराव मांडला आहे. तुम्ही कशाला घाबरताय?

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):अध्यक्षसाहेब, आता एक ठराव झालेला आहे. या सभेचे अध्यक्ष यांनी सांगितलं ठराव टाका, तसा ठराव टाकला आणि तो सर्वानुमते ह्या सभागृहामध्ये संमत झाला. या ठरावाला तुम्ही सांगितल्याप्रमाणे सूचक अनुमोदक दिले. आजचा हा ठराव मिनिट्समध्ये यावा ही अपेक्षा. कारण हे जे ठराव आहेत ते मिनिट्स मध्ये येत नाहीत. पर्सनली जो कोण ठरव लिहीत असेल, मागे मोरे सर बसलेले आहेत लिहायला,मागचा पण ठराव करणार म्हणून तुम्ही मिनिट्स लिहिता पण बऱ्याच गोष्टी तुम्ही लिहीतनाही. आत्ताचा हा ठराव संमत झाला संपूर्ण सभागृहाने उभे राहून हा ठराव संमतकेला आहे. अध्यक्ष साहेब,हे चुका मान्य करून दुसऱ्या दिवशी पलटतात. हे संचालक मंडळ खोटारडे आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: योग्य पद्धतीने टेंडर काढले आहे.

श्रीराजेश कळके (सीडीएम):त्या टेंडरच्या संदर्भात लोकांचे फोटो दाखवा वाडेकर.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: सभागृहाच्या अडमिनिस्ट्रेशनचा फोन आला आहे, सभागृह सहा वाजेपर्यंत आहे. जे मुद्दे आहेत ते संपवायचे आहेत.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) :अध्यक्ष साहेब, तुम्ही याविषयी चौकशी करा. पुढची तारीख घ्या. आपण यावर चर्चा करू. सर, हा मोठा स्कॅम आहे. तुम्ही मागचे टेंडर पाहिलेततर फॅब्रिकेटर कोटेशन टाकतो अहवाल प्रिंटिंगसाठी. त्यावेळी पण ह्यांनी हेच केलं. गेले दीड ते दोन वर्ष यांनी खूप स्कॅम केलेत.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मी या गोष्टीचे खंडन करतो या संचालक मंडळाने कोणताही स्कॅम केलेला नाही.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): मागच्या वेळी पण अहवाल छापताना यांनी अशाच निविदा टाकल्या होत्या. त्यावेळी त्यांनी काम थांबायचं होतं. पण तेव्हा पण त्यांनी हेच काम केलं. हे दर वळेस असंच काम करतात. आज हा ठराव पास केला कशाला? अध्यक्षांनी पण सांगितलं. तुम्ही अध्यक्षांपेक्षा मोठे आहात का?

श्री अरुण कोळी (सीडीएम): शिबु, तुम्हाला एक प्रश्न आहे पान क्रमांक 49 मध्ये लिहिलं आहे हे बरोबर आहे ना? की मी चुकीचं बोलत आहे? तुम्ही डायरीसाठी कोटेशन मागवलं. तिथे प्रीमियम नोटबुक दिले आहे. तुम्हाला प्रीमियम नोटबुकचा खर्च कमी होत होता का? जी प्रोसेस तुम्ही कोटेशन मध्ये लिहिली आहे ती अहवालामध्ये लिहायला काय प्रॉब्लेम आहे? साहेब, यामध्ये लिहिले आहे डायरी आणि कोटेशनमध्ये लिहिले आहे प्रीमियम नोटबुक. तुम्हाला समजायला पाहिजे तुम्ही लिहिता एक आणि करता एक. म्हणून याची चौकशी झाली पाहिजे मी अध्यक्षांना विनंती करेन की तुम्ही आश्वासन द्या. आम्ही ठराव केलेला आहे. ठराव मंजूर झालेला आहे. जे काही होईल ते करायला लागणारच आहे. पण तुम्हीएक चौकशी समिती नेमा आणि चौकशीमध्ये ते दोषी आढळले तर काहीच प्रॉब्लेम नाही आणि जर दोषी आढळले नाही तरी तुम्ही बघा. आमची तीन वेळा चौकशी झाली होती मी सेक्रेटरी असताना. असं काही नाही की आमची चौकशी झाली नाही. तुम्ही पदसिद्धअध्यक्ष आहात तुम्ही चौकशी समिती नेमा, तुमच्या पद्धतीने नेमा, आमचं काहीच म्हणणं नाही. परंतु जो ठराव झाला त्याचा सन्मान करा आणि पुढे चला.

एक सभासद: तुम्हाला समिती नेमावीच लागणार आहे. हगवणे साहेब अशा परिस्थितीमध्ये वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करतात आणि आता पण एका कोपऱ्यात जाऊन ते चर्चा करत आहेत. यासाठी तुम्हाला स्पेशल एजीएम घ्यावीच लागणार आहे.

एक सभासद: अध्यक्ष साहेब, दरवेळी शिबु मधूनच बोलतात. आम्हाला सेक्रेटरींकडूनच उत्तर पाहिजे. तुमच्यामुळे हे सर्व उशीर होतोय तुम्हाला मीटिंग चालवता येत नाही सेक्रेटरी म्हणून.

श्री राजेश कळके (सीडीएम): शिबु सरांचा स्वभावच आहे सभेला गोल गोल फिरवायचा.

एक सभासद: पदसिद्ध अध्यक्ष बोलत असताना तुम्ही तिकडे जाऊन चर्चा करताय. ज्या गोष्टीची माहिती तुम्हाला नाही आहे, तर नाही आहे. पण जे आहे ते आहे, केलं तर केलं म्हणा, नाहीतर नाही म्हणा. उत्तर द्या आम्हाला. ठराव पास करा. मी थोड्याच दिवसांचा सभासद राहिलोय. पण सेक्रेटरी, तुम्ही या आधी सभासदांना रस्ता अडवून प्रश्न विचारलेले आहेत म्हणून मी तुम्हाला प्रश्न विचारलेला आहे. काय झालं आमच्या ठरावाचं? याचे उत्तर द्यायचं आहे तुम्ही. तुम्ही स्वतः उत्तर द्या, वेळोवेळी दुसऱ्या संचालकांना उभं करू नका उत्तर द्यायला.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी):साहेब, तुम्ही सांगितल्याप्रमाणे ठराव घेतला, तो मंजूर पण झाला. पण या संस्थेचे सचिव डायसवर सरळ सरळ ठराव नाही म्हणतात. ठराव झालेला त्यांना मान्य नाही. अध्यक्ष म्हणून आम्ही तुम्हाला उत्तर विचारत आहोत.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यावर मी उत्तर देतो. ज्या पद्धतीने टेंडर प्रोसेस झाली

श्री मनोज वाडेकर (आर इ डी): सेक्रेटरी, तुम्हाला समजायला पाहिजे होतं की तीन टेंडर चुकीचे आहेत तेव्हा तुम्हाला ते नामंजूर करायला हवे होते. नवीन टेंडरिंग करायला हवं होतं. तुम्ही जाणून-बजून केलं आहे. त्याची चौकशी होऊ द्या. तुम्ही चौकशी पासून का पळत आहात ?

श्री सुनील खाकसे (आर आर एम डी): सभासदांनी तुम्हाला सांगितलं आहे सेक्रेटरी, त्यामुळे कर नाही त्याला डर कशाला ? कुठल्याही भीतीला न घाबरता तुम्ही चौकशीला सामोरे जा. आणि सभागृहाने श्री कळके साहेब आणि वाडेकर या दोघांची त्या कमिटीमध्ये नियुक्ती केली आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: टेंडरिंगची जी प्रोसेस झाली ती व्हॅलीड पद्धतीने केली. त्यामध्ये एक गोष्ट सांगायची, त्यामध्ये मला कुठलाही कमीपणा वाटणार नाही, व्हेरिफिकेशन करायला पाहिजे होते ते संचालक मंडळाने केले नाही.जो L1 आला त्यानंतर त्याची इन्वेस्टीगेशन केली नाही आणि सभासदांनी त्याचं इन्वेस्टीगेशन केलं त्यांचं मला अभिनंदन करायचं आहे. भविष्यामध्ये यापुढे प्रत्येक टेंडरची चौकशी केली जाईल.

श्री मनोज वाडेकर (आर इ डी): ते पैसे तुम्हाला भरायचेच आहेत. पण या आधी तुम्ही जे पण टेंडर केलेत त्याची पण चौकशी करायची आहे. अध्यक्ष साहेब, तुमच्या समोर बोलले सेक्रेटरी की, या टेंडरमध्ये त्यांनी चूक केली आहे.

श्री प्रकाश पाटील (एस आय आर डी): अध्यक्ष साहेब, आता सेक्रेटरी साहेबांनी चूक मान्य केली आहे हे तर नक्की. यावर आता एक तास चर्चा सुरू आहे. आपली सिस्टीम आहे जी टेंडर मागवून ते व्हॅलीड आहे का ते तपासून L1 असेल त्याला आपण टेंडर देतो. यांनी कोणतीही शहनिशा न करता ते दिलं. 30 ते 40 लाखाचा व्यवहार केला. यांनी ते दोन कोटेशन इनव्हॅलिड असताना हे केलं. त्यांची चौकशी केली असती, रिटेंडरिंग केलं असतं तर आणखी स्वस्त झालं असतं. यांना स्वस्त टेंडर नको आहे त्यांना कमिशन नसतं भेटलं. मी स्पष्ट बोलतो कोणतीही गोष्ट करण्यामागे त्या कमिटीचा हेतू असतो. हे टेंडर घ्यायच्या आधीच आम्ही सह्या करून पत्र दिलं की

आम्हाला डायरी नको. पण सेक्रेटरी काय म्हणाले? हे बोलून तुम्ही सभागृहाचा वेळ वाया घालवू नका. मागचा जो ठराव झाला पास झाला तो झालाच पाहिजे. चूक तुमची आहे, त्यामध्ये कमिटी बसणार. त्यामध्ये कळके आणि वाडेकर असतील आणि त्या कमिटीमधून जो पण निर्णय निघेल त्याची जबाबदारी तुमच्या संचालक मंडळाची असेल.

श्री मनोज वाडकर (आर इ डी): ते दोन टेंडर फेक निघाले. जर तुम्ही त्या पदावर बसला आहात ते चेक करायची जबाबदारी तुमची आहे. तुम्ही नाकारू शकत नाही.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी): कळके साहेब , आता फोटो कशाला दाखवायचे? जेव्हा चौकशी होईल तेव्हा दाखवू. पुरावे आहेत, व्हिडिओ आहेत,जे काय असेल ते तेव्हा करू.अध्यक्षांनी आपल्याला सांगितलं आहे. चौकशी झाल्यानंतर बघू जे काय आहे ते. सभागृहाचा वेळ वाया जात आहे. तुम्ही निर्णय घ्या. या संचालक मंडळाने गेल्यावर्षी पण दोन दिवस सभा चालवली होती. सर, विषय भरपूर आहेत बॅलन्सशीटवर तर खूप बोलायचं आहे. आजचा दिवस ही सभा पूर्ण होणारच नाही. हा विषय संवेदनशीलआहे. कमिशन घेतलं असं आम्ही म्हणतच नाही आहे. परंतु सोसायटीचे झालेले नुकसान हे प्रत्येक सभासदाचे आहे आणि तुम्ही पण त्यामध्ये आहेत. ह्यावरच तुम्ही निर्णय घ्या. सभा पुन्हा घ्यायची की नाही घ्यायची की एवढ्यावरच संपवायची हे त्यांना विचारा. धन्यवाद.

श्री अनिल लांडगे (डीसीएसअँडईएम) : अध्यक्ष साहेब, मी असं ऐकलं की पाचशे लोकांच्या सह्या आहेत, की डायरी छापायची नाही म्हणून. तर ही सोसायटी 500 सभासद चालवतात का? 19,500 सभासदांनी डायरी घेतली त्याचं काय.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: 18,000 च्या वर सभासदांकडे डायरी पोचली आहे. पाटील साहेब, त्या सभासदांच्यावर का प्रेशर आणत आहात?

श्री मनोज वाडेकर (आर ई डी ): कारण ही डायरी लोकांच्या डोक्यावर थोपवताय तुम्ही. सर्वजण बोलू शकतात. तुम्ही पण बोलू शकता. अजून भरपूर बोलायचं आहे. सर, माझं उत्तर अजून दिलेलं नाही आणि माझं बोलणं पूर्ण झालेलं नाही.

श्री अनिल लांडगे (डीसीएसईएम): अध्यक्ष साहेब, माझा एकच प्रश्न आहे जर घोटाळा झाला असेल तर त्यांच्यावर आक्षेप घ्यायला पाहिजे, पण सोसायटी 500 जणांनी चालत नाही. लोकांनी तीन तीन तास लाईन लावून डायरी घेतली आहे. माझ्यामागे पुढे पाचशे लोक होते. मग जर डायरी नको होती तर कशाला घेतली लोकांनी डायरी.

श्री प्रवीण सावंत : साहेब, विषय पत्रिकेमध्ये जे विषय आहेत ते तसेच राहिले आहेत. वेळ वाया जातोय. ज्या पद्धतीने मीटिंग चालू आहे त्या पद्धतीने चालली तर रात्री बारा वाजले तरी मीटिंग संपणार नाही. तुम्ही जो काय निर्णय घ्यायचा आहे तो कठोरपणे निर्णय घ्या.

एक सभासद : इथे सर्व ग्रुप बाजी चालू आहे.  इथे सर्व सोसायटीचे सभासद आहेत सर्वांना बोलायचा अधिकार आहे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई:  सिक्युरिटीच्या आदेशानुसार हॉलची वेळ संपल्यामुळे मीटिंग संपली आहे. त्यामुळे  मीटिंग तहकूब होत आहे.

चेअरमन श्री हेमंत कोळी:  हे पहा तुम्ही जर असंच करणार असाल तर आम्ही सर्व संचालक मंडळ राजीनामा देतो आत्ताच्या आत्ता आणि हेच होत असेल तर तुम्हाला आता डिव्हिडंट पण मिळू शकणार नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे:  सर्व सभासदांना विनंती आहे की गणपतीच्या आधी सर्व सभासदांना डिव्हीडंट द्यायचा आहे. त्यामुळे नफा तोटा आणि अंदाजपत्रकाला मान्यता द्या अशी विनंती करतो.

श्री श्रीधरन (सीडीएम):  अध्यक्ष साहेब, पहिलं हे डिसाईड करायचं आहे की आजची मीटिंग तहकूब झाली आहे की नाही. अध्यक्ष साहेबांनी सांगितलं तसं की मीटिंग तहकूब झाली आणि कोणीही भावुक होऊन  फायदा नाही. चेअरमन तुम्ही भावूक झालात. कधी कधी गोष्टी समजण्यासाठी टाईम घेतील पण असं भावुक होऊन चालत नाही. एकदा तुम्ही जबाबदारी घेतली आहे तर त्यावर ठाम राहा. मी अध्यक्षांना विनंती करतो की डायरीडिस्ट्रीब्यूशनचा विषय हे पॉलिसी डिसिजन आहेत.  पण टेंडर कॉस्टचा इशू आला. तुम्ही सर्व डॉक्युमेंट तुमच्या कस्टडीमध्ये घ्या. त्यावर चर्चा करा आणि जो काही निर्णय होईल ते पुढच्या एजीएमला सांगा आणि मी विनंती करतो की जर सिक्युरिटी परवानगी देत असेल तर मीटिंग पुढे चालू ठेवा. आणि चेअरमन तुम्ही अपसेट झाल्यावर जी प्रतिक्रिया दिली ती बरोबर नाही.  अध्यक्ष साहेब,  तुम्ही तुमच्या अधिकाराने निर्णय घ्या एक तर मीटिंग तहकूब करा नाहीतर पुढे चालू ठेवा.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई : मीटिंग सुरू ठेवू, पण एक तासात मीटिंग संपणार नाही म्हणून ही मीटिंग तहकूब करणार आहोत. आणि तुम्ही एक सुजाव दिला आहे की एक कमिटी बनवायची पण आता पदसिद्ध उपाध्यक्ष श्रीराम साहेब नाही आहेत.  मी त्यांच्याशी बोलून ती कमिटी बसवायची आहे ते करू आणि यामध्ये जे काही होईल ते सर्व सभासदांपर्यंत पोहोचेल. हे सर्वांना मान्य आहे का?  त्याआधी डिव्हिडन्ट आपण देऊ शकतो का ते बघून घ्या.  मग आपण मीटिंग तहकूब करू.

श्री राजापुरे (डी आर एच आर):  बॅलन्सशीट मध्ये एवढ्या चुका आहेत की पुढच्या मीटिंगमध्ये पण बॅलन्स शीट पास होणार नाही. मग तुम्ही कोणत्या आधारावर डिव्हिडन्ट देणार? तुम्ही बॅलन्सशीटवर अभ्यास करा आणि नवीन बॅलन्सशीट बनवून आणा आणि चर्चा करा. बॅलन्सशीट पुढे पण पास होणार नाही एवढ्या चुका आहेत.  बॅलन्सशीटवर एक गोष्ट दुसऱ्या गोष्टीवर डिपेंड आहे. आपल्याला जो इंटरेस्ट मिळाला आहे तोच चुकीचा आहे. मग पुढे पण सर्व फिगर

बदलत जाणार. तुम्हाला करायचं तर करा पण बॅलन्सशीट पास नाही होणार. इंटरेस्ट द्यायला माझी काही हरकत नाही पण डिव्हीडंट नाही देता येणार.

श्री अरुण कोळी (सीडीएम): अध्यक्ष साहेब, संस्थेमध्ये अशीच परिस्थिती मागील एजीएममध्ये आली होती. तर संचालक मंडळाने व्याज देण्याचा निर्णय घेतला होता आणि त्याला ऑडिटरने पण मंजूर केले आहे म्हणून व्याज द्यायला काही हरकत नाही.परंतु लाभांश जोपर्यंत एजीएम पास करत नाही, नफा विभागणी जोपर्यंत मंजूर होत नाही तोपर्यंत मंजुरी मिळणार नाही. सब्स्क्रिप्शन वरील इंटरेस्ट द्यायला काहीच हरकत नाही.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: राजापूरे म्हणत होते की बॅलन्सशीट पुढच्या मीटिंगमध्ये पण पास होणार नाही. माझं असं म्हणणं होतं तुमच्या सर्वांचे जे काही मुद्दे आहेत ते तुम्ही लेखी स्वरूपात पाठवले तर त्यांची उत्तर मिळतील. इथे खूप वेळ जातो. सर्वांचे जे पण मुद्दे आहेत ते तुम्ही लेखी स्वरुपात द्यावेत. संचालक मंडळाला पण मी सांगितलं आहे की, या प्रश्नांची समर्पक उत्तरे तयार ठेवावीत. मगाशी कोणीतरी विचारलं की या रकमेचा आकडा किती? मग यावर वेळ गेला. असं व्हायला नको. मग हे जे आरोप होतात ते बरोबर नाही. मी सुरुवातीला सांगितलं की आपण एक प्रतिष्ठीत संस्थेचे कर्मचारी आहोत म्हणून या संस्थेचे सभासद आहोत. म्हणून आपली सर्वांची जी वागणूक आहे ती त्याचप्रमाणे असावी आणि म्हणून माझी सर्वांना विनंती आहे की तुम्ही सुद्धा या अजेंडावर जे प्रश्न आहेत ते प्रश्न द्यावेत. तुम्हाला उत्तर मिळण्याची संभावना वाढेल आणि आपला वेळ वाचेल.

श्री राजापुरे (डी आर एच आर): मी संस्थेला पत्र दिलं. त्यातील काही प्रश्नांची उत्तरं मोघम दिली, काही प्रश्नांची उत्तरे दिलीच नाही, काही डॉक्युमेंट मला दाखवायची ती दाखवलीच नाहीत आणि विशेष म्हणजे आम्ही दहा दहा लाख रुपये देऊन ऑडिटर आणि इंटरनल ऑडिटर घेतो, मग हे या बॅलन्सशीटला मान्यता देतात. हे संचालक मंडळाने बघायचं की हे आम्ही त्यांना दाखवायचं. आम्ही फी देऊन काम करून घेतो मग ह्या चुका व्हायचं काय कारण. जर अशा चुका आम्हीच दाखवल्या तर मग संचालक मंडळ आणि ऑडिटर कशाला पाहिजेत. संचालक मंडळ लाखो रुपये मीटिंग भत्ता आणि ऑडिटर फी दहा लाख तरी या चुका बॅलन्स शीटमध्ये कशा. बॅलन्सशीट मध्ये असलेल्या चुका पहायचं काम ऑडिटरचे आहे की आमचे आहे? मग ती चूक मीच सांगायची आणि मग मलाच म्हणायचं की राजापुरे तुम्ही बसा म्हणून, तुम्हाला माझं ऐकायचं नसेल तर नका ऐकू.

श्री प्रवीण सावंत: अध्यक्ष साहेब माझं म्हणणं आहे की जे इंटरनल ऑडिटर आणि स्टॅट्यूटरी ऑडिटर आहेत त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेला बोलावलं पाहिजे. म्हणजे ज्या काही चुका असतील त्या ते इथेच क्लिअर करतील.

श्री राजापुरे (डी आर एच आर): अध्यक्ष साहेब, याचं मी त्यांना पत्र दिलं होतं की ऑडिटर यांना एजीएमला बोलावून घ्या. त्यांनी सांगितलं ऑडिटरला पत्र दिलं आहे पण ते आले नाहीत. म्हणून पुढच्या मिटींगला त्यांना बोलवा.

श्री सारंग : अध्यक्ष साहेब आता सेक्रेटरी साहेबांनी सांगितलं की ऑडिटरमिटींगला येत नाही माझं एक सजेशन आहे की पुढच्या वर्षी आपण कोटेशन काढताना त्यामध्ये ही नोट टाका की ऑडिटरने वार्षिक सर्वसाधारण सभेत आलेच पाहिजे. तरच ते येतील. सर, सजेशन चांगला आहे पण हे केलं जात नाही. इथे फक्त मान डोलावली जाते पण केलं जात नाही. ही माझी शेवटची सभा आहे. जय हिंद! जय महाराष्ट्र!

श्री प्रवीण सावंत: साहेब, तहकूब सभा आता वर्किंग डे ला ठेवा.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: त्यासाठी मला श्रीराम साहेबांशी बोलावं लागेल.

श्री सचिन सोळसे (एचपीडी): अध्यक्ष साहेब, मला फक्त एक मिनिटाचा वेळ द्या. मी कुठल्याही ग्रुपच्या बाजूने नाही. 63 वर्षे आमच्या सोसायटीला झाली. 63 वर्षाचे ऑडिट रीपोर्ट आहेत. आरबीआयने सांगितले पैसे नाही आहेत द्यायला. त्यांनी सांगितलं की तीन वर्ष खूप सभासद रिटायर होणार आहेत. आप ले डिपॉझिट 521 करोड आहेत आणि आपण 1000 करोड वापरतोय. यासाठी आपले जुने संचालक आहेत नवीन येणारे सभासद आहेत त्यांना पण विचारा कारण को-ऑपरेटिव्ह मध्ये आरबीआयकडून काढून घेतात आपल्या सोसायटीमध्ये गेली 60 वर्ष कमाई सोसायटीमध्ये ठेवली आहे म्हणून आज लाखो रुपये मिळतात. सभासदांना तुम्ही एक करोड पण डिपॉझिट वाढवत नाही आणि 100 करोड लोन वाटताय. हे जर येणारे पाच वर्ष चालत राहिलं तर सोसायटी वाचू शकणार नाही. यासाठी जेवढे पण मेंबर असतील त्यांनी विचार करा आणि लेखी स्वरूपात सजेशन द्या.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई : मीटिंग स्थगित करण्यात आली आहे. याप्रमाणे

**ठराव : ठराव पास करण्यात आला की, गणपतीचा सण लक्षात घेऊन सभासद वर्गणी वरील व्याज 27 ऑगस्ट 2024 रोजी सभासदांना अदा करण्यात यावे व भागावरील लाभांश हा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने अदा करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**सूचक : श्री अरुण कोळी (सीडीएम)**
**अनुमोदक : श्री राम परब (युईडी)**
**ठराव बहुमतानेमंजूर करण्यात आला.**

**पुन्हा ठराव पास करण्यात आला की, सभागृहाचा वेळ संपल्यामुळे आणि उर्वरित विषयांवर सविस्तर चर्चा न झाल्यामुळे सभा पुढील सात दिवसासाठी तहकूब करण्यात आली. सात दिवसात आस्थापनेकडून ज्या प्रमाणे डीएई कॉन्व्हेंशन सेंटर उपलब्ध होईल त्या दिवशी याच वेळेत कोरम शिवाय सभेपूढील उर्वरित कामकाज पूर्ण करण्यासाठी घेण्यात येईल असा ठराव एकमताने आंसभेने मंजूर केला.**

**सूचक : श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी)**
**अनुमोदक : श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी)**
**ठराव बहुमताने मंजूर करण्यात आला.**

राष्ट्रगीत झाल्यानंतर अध्यक्षांनी सभा तहकूब झाल्याचे जाहीर केले.

## दि.25 ऑगस्ट 2024 रोजी तहकूब केलेल्या व

## दि.29 ऑगस्ट 2024 रोजी झालेल्या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

दि बीएआरसी एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मुंबईच्या अधिमंडळाची 63वी वार्षिक सर्वसाधारण सभा डी.ए.ई.कन्व्हेन्शन सेंटर, अणुशक्तीनगर येथे रविवार दि.25 ऑगस्ट 2024 रोजी दु.2.00 वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु वेळे अभावी सदर सभा तहकूब करण्यात आली व ही तहकूब केलेली 63वी वार्षिक सर्वसाधारण सभा डी.ए.ई.कन्व्हेन्शन सेंटर, अणुशक्तीनगर येथे गुरुवार दि.29.08.2024 रोजी सायंकाळी 5.00 ते 8.00 वाजेपर्यंत उर्वरित कामकाजासाठी आयोजित करण्यात आली. ही तहकूब झालेली सभा संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई यांचे अध्यक्षतेखाली पार पडली.

सदर सभेची उर्वरित विषयांची विषयपत्रिका :-

विषय क्र. 2. शासकीय — 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024 या कालावधीचा वार्षिक अहवाल, लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मान्यता देणे.

विषय क्र. 3. — सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

विषय क्र. 4. — सन 2023-24 या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे

विषय क्र. 5. — शासकीय लेखापरीक्षक यांच्या सन 2023-2024 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.

विषय क्र. 6. — सन 2024-2025 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नेमणुकीस मान्यता देणे.

विषय क्र. 7. — सन 2022-2023 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोषांचे वाचन करून त्यासंबंधीच्या दोष दुरुस्ती अहवालाची (compliance report) नोंद घेणे.

विषय क्र. 8. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस (परिशिष्ट ‘अ’ प्रमाणे ) मंजुरी देणे.

विषय क्र. 9. सभासदांना वर्गणी खात्यातील अंशत: रक्कम काढणेसाठी सुविधा देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. 10. विक्रम कर्ज संरक्षण निधी योजनेच्या धोरणातील नियमात अंतर्भूत करावयाच्या बदलाबाबत निर्णय घेणे.

विषय क्र.11. अधिमंडळाच्या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

विषय क्र. 12. माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: विषय क्रमांक दोन वाचून दाखवला.

**विषय क्र.2: 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मान्यता देणे.**

श्री राजापुरे (डी आर एच आर): वार्षिक अहवालात पान क्र.6 वर जे प्रिंट केले आहे ते मागच्या आर्थिक वर्षाचे आहे. पण ते इथे चुकून प्रिंट केले आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: चुकीची दुरुस्ती करून घेऊ.

श्री राजापुरे (डी आर एच आर): दुसरी चूक म्हणजे मागील अहवालापेक्षा या अहवालातील अक्षराचा फॉन्ट खूपच छोटा आहे ही नोंद करून पुढल्या वर्षी वार्षिक अहवाल व्यवस्थित छापला जाईल याची काळजी घ्यावी. पान क्र.45 वर 'टीडीएस फ्रॉम मेंबर्स' तिथे तुम्ही कोटी 83 लाख 86 हजार 968 दाखवले आहे आपण करंट वर्षाचा आणि मागच्या वर्षाचा काय होता ते छापतो. तुम्ही जर असेसमेंट इयर बोलता तर ते ठीक होतं पण तुम्ही फायनान्शिअल इयर प्रमाणे बोलत आहात ही चूक आहे. माझे प्रश्न आहेत ते -सॉल्व होतील अशी आशा आहे. कॉसमॉस बँक बांद्रा यांच्याकडून आपल्याला जो इंटरेस्ट मिळाला तो बॅलन्सशीटमध्ये दाखवला तो मॅच झालेला नाही. मी सोसायटीमध्ये जाऊन चेक केलं. जर शक्य असेल तर तुम्ही ऑडिटरकडून रेक्टिफाय करून घेऊ शकता. जो बॅलन्सशीटला टीडीएस दाखवला तो पण चुकीचा दाखवला आहे. जो टीडीएस कट केला तो पण जास्त कट केला आहे. पान क्र.45 आणि पान क्र.57 वर 4 कोटी 37 लाख 97 हजार 837 यावर 10% कट करायला पाहिजे पण यावर जो टीडीएस कट केला आहे तो 1 लाख 18 हजार

926 हा सुद्धा मॅच होत नाही. तो करेक्ट करून पुढच्या अहवालामध्ये याचं रिफ्लेक्शन झालं पाहिजे. तो बँकेने जास्त कट केलेला आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तुम्ही सोसायटीत आला होता त्यावेळी आपण कॅल्क्युलेशन केलं तेव्हा आपण बँकेकडे टीडीएस सर्टिफिकेट असं सांगितलं होतं.

श्री विलास घोरपडे (एएफडी): आपल्या अहवाल वर्षांमध्ये आपल्या सोसायटीच्या कर्मचाऱ्यांवर जास्त खर्च झालेला आहे. जोशी अहवालानुसार आपली सोसायटी पूर्णपणे संगणीकृत झालेली आहे. त्यामुळे फक्त 11 कर्मचाऱ्यांमध्ये सोसायटीचे काम झाले पाहिजे, असं मी नाही, तुम्ही म्हणाला होतात. मग आपल्या संस्थेमध्ये बघायला गेलो तर हंगामी कामगार भरपूर आहेत पर्मनंट स्टाफ खूप आहे. हंगामी कामगारांवर तुम्ही 38 लाखाचा खर्च केलेला आहे तुम्ही दोन वर्षात यावर काहीतरी निर्णय घ्यायला पाहिजे होता. तुम्ही म्हणाला होतात त्याप्रमाणे "जो 'जी बी जोशी अहवाल' आहे त्याप्रमाणे आम्ही करण्याचा प्रयत्न करू" त्याप्रमाणे तुम्ही केला आहे का? त्यामध्ये 38 लाखाचा भुर्दंड सोसायटीला झालेला आहे. त्यावर सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: जी बी जोशी यांचा जो अहवाल होता तो सन 2007-2008 चा होता. तो कुठल्याही संचालक मंडळाने तो स्वीकारला नाही. यानंतर सन 2011 ला स्पेशल एजीएम झाली. त्यामध्ये 24 कर्मचारी पदे मंजूर झाली. आता आपल्याकडे 20 कर्मचारी आहेत. सोबतच कर्मचाऱ्यांवरचा खर्च तर मागच्या दोन वर्षांमध्ये कर्मचाऱ्यांच्या पगारावर जवळजवळ 2 कोटी रुपये वाचवण्याचा प्रयत्न केला आहे. दोन वर्षांपूर्वी 2 कोटी 19 लाख रुपये खर्च होता. प्रत्येकाचा दर वर्षाला पगार 10% ने वाढतो. तर 2 कोटी 19 लाखावर 10% आणि आत्ताचा जर पकडला 2 कोटी 68 लाख खर्च व्हायला पाहिजे होता. पण गेल्या वर्षी 2 कोटी 7 लाख आणि यावर्षी 2 कोटी 2 लाख खर्च झाला आहे. हे बघितलं तर गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी सोसायटीच्या कर्मचाऱ्यांवरील 1 कोटी रुपये खर्च वाचला आहे. आता माझ्याकडे जीआर किंवा सहकार खात्याचे पत्रक नाही. ती माहिती मी करून घेतो आणि मी इथे एक स्टेटमेंट करतो की 15 कोटीच्या टर्न ओव्हरला एक कर्मचारी असं माझ्या ऐक्यामध्ये आलं आहे त्या रेशोप्रमाणे आता आपल्याकडे 70 कर्मचारी पाहिजेत.

श्री विलास घोरपडे (एएफडी): तुमचं उत्तर समजलं मला. म्हणजे तुम्ही खाली असताना जे स्टेटमेंट करत होतात ते चुकीचे स्टेटमेंट करत होतात, एवढेच मेन्शन करा. हेच उत्तर पाहिजे मला. फक्त चूक की बरोबर एवढंच उत्तर द्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तुम्ही डोक्यावर बंदूक ठेवून 'हो' किंवा 'नाही' हे उत्तर घेऊ शकत नाही. जे समर्पक उत्तर आहे ते सांगतो. इथे आल्यानंतर आमच्या नॉलेजमध्ये बरीच भर पडली आणि अजून पण भरपुर भर पडायची आहे.

श्री विलास घोरपडे (एएफडी): म्हणजे तुम्ही सभासदांना जे ओरडून बोलत होतात त्याचं तुम्हाला नॉलेज नव्हतं असा याचा अर्थ होतो.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: असं नाही. जी बी जोशी या अहवालावर मी बोललेलो नाही.

श्री विलास घोरपडे (एएफडी):तुम्ही आता खोटं बोलत आहात. अध्यक्ष साहेब, माझा मुद्दा असा आहे की यांनी सांगितलं आहे की 'आम्ही संस्था कमी कर्मचाऱ्यांमध्ये चालवू. संस्था संगणीकृत झालेली आहे, जो जी बी जोशी अहवाल होता त्याप्रमाणे आम्ही काम करू'. तुम्ही अजून हंगामी कामगार काढू शकत नाही. म्हणजे मग तुम्ही जे 12 कामगार भरती झाले त्यांना काढण्याच्या विषयापासून खूप लांब आहात.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: संस्थेचे टर्न ओव्हर 1000 कोटी पर्यंत गेले आहे. संस्थेमध्ये टीडीएसचे काम सुरू झाले आहे. 2020 पासून टीडीएसचा वर्क लोड वाढलेला आहे. आपण आतापर्यंत टीडीएस क्वार्टरवाईज करत होतो तो आता यावर्षी संचालक मंडळ आयकर कायद्यानुसार मंथली करण्याचं काम सुरू करेल.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : हा अहवाल आपल्यापर्यंत पोहोचतो, सहकार खात्याला पण जातो. यामध्ये 'व्यवस्थापक श्री आर के मोरे' लिहिलं आहे, जे सेवानिवृत्त आहेत. त्यांना ॲडहोक अस लिहिलं पाहिजे होतं. गेली दोन वर्ष सेवानिवृत्त मॅनेजरवर ही संस्था चालते. यांनी मॅनेजरची भरती आधी केली पाहिजे होती. माझा प्रश्न असा आहे की या ॲडहोक मॅनेजरना पगार किती देता?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: त्यांचा जो बेसिक त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळी रु.68,000/- होता तोच देतो. पूर्वीच्या संचालक मंडळाने ठरविल्यानुसार देतो.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : बीएआरसीचा जो नियम आहे की हाफ बेसिक पगार दिला जातो. आपण हे नियमबाह्य करतोय. आपण त्यांना हाफ बेसिक दिला पाहिजे होता. पूर्वीच्या ज्या चुका आहेत त्या तुम्हाला पण करायच्या आहेत का? त्यांना हाफ बेसिकवर ठेवा आणि जानेवारीला आपली मॅनेजर पोस्टची जी जाहिरात निघाली त्यावर किती वेळात अंमलबजावणी होईल ते सांगा.

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम: तुम्ही विचारले ते, 50% बेसिक हे आपण गव्हर्मेंट सर्वंट असतात त्यांना देतो कारण त्यांना पेन्शन असते म्हणून. ते असं कॅल्क्युलेशन असतं की 50% बेसिक प्लस पेन्शन. पण को-ऑपरेटिव्ह चे काय नियम आहेत ते माहिती नाही. त्यांना पेन्शन मिळत नाही म्हणून सेंट्रल गव्हर्मेंट आणि को-ऑपरेटिव्ह कम्पॅरिझन करणं चुकीचं आहे. मी त्या 50% बेसिकचे बॅकग्राऊंड सांगितले आहे याची नोंद घ्या.

श्री विलास घोरपडे (एएफडी): पान क्रमांक 56 वर किरकोळ खर्च गेल्या दोन वर्षाचा आणि या वर्षाचा यामध्ये वीस लाखाचा फरक दाखवतो. तसा यामध्ये 40 लाखाचा फरक आहे. कारण यामध्ये

फ्रँकिंग मशीन रिबन दहा लाखाचे आहे तो फरक समजला नाही. तुमची चाळीस लाखाची वाढ झाली आहे. तुम्ही उत्पन्न वाढते म्हणून खर्च वाढतोय असं स्टेटमेंट देऊ नका. सभासद कर्ज काढतो आणि खूप कष्टाने ते कर्ज भरतो. तुम्ही वाढीव खर्च केलाय याबद्दल मला सांगा की हा फंड एवढा का वाढतोय?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यामध्ये गेल्या वर्षीच्या सर्वसाधारण सभेमध्ये जे 200/- रुपयाचे कुपन वाटले गेले होते ते आणि विशेष सर्वसाधारण सभेमध्ये जे कुपन वाटले त्याचा खर्च वाढलेला आहे. तसंच पतसंस्थेवर इन्कम टॅक्सच्या केसेस आहेत, त्याचाही खर्च आहे. तो यावर्षी 15 ते 16 लाख रुपयांनी वाढला आहे.

श्री विलास घोरपडे (एएफडी): तुमच्याकडून हा खर्च 4 लाखावरून 20 लाख झालेला आहे. म्हणजे तुमचं या वर्षांमध्ये 16 लाख रुपये देणं आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: किरकोळ खर्चासाठी समजा एखाद्याची फी 10 लाख ठरली तर दहा लाख देणं बाकी असेल तर इकडे दहा लाख दिसून येतात. लायबिलिटी सहा लाख दिसले म्हणजे ते 16 लाख होत नाहीत. जी लायबिलिटी आहे ते आपण दिलेले नाही आणि इन्कम टॅक्सची अचानक पंतसंस्थेला नोटीस आली. सन 2012-13, 2013-14, 2014-15 या वर्षाच्या इन्कम टॅक्सच्या केसेस चालू आहेत. आतापर्यंत इन्कम टॅक्सच्या एटीआयटीमध्ये असलेल्या केसेस सीए बघतात पण आता या केसेस हाय कोर्टात गेल्या आहेत आणि पतसंस्थेवर 15 कोटीची डिमांड आहे. म्हणून यावर्षी हा खर्च आहे. आपण यावर्षी त्याचे 50% पेमेंट केलेले आहे. बाकी 50% लायबिलिटी राहिली तो डबल खर्च नाही. गेल्या वर्षी हायकोर्टाच्या केसेस नव्हत्या.

श्री विलास घोरपडे (एएफडी): म्हणजे तुम्ही आल्या आल्या हायकोर्टाच्या केसेस आल्या. म्हणजे तुम्ही संचालक म्हणून आल्यानंतर भूकंप का होतात?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: या केसेस स्टेपवाईज जातात. आधी कमिशनर मग एटीआयटीमध्ये संस्थेच्या बाजूने निकाल लागलेला आहे पण आता इन्कम टॅक्स स्वतः हाय कोर्टात गेले आहे. त्यामुळे हे संचालक मंडळ आलं म्हणून भूकंप झाला असं नाही. या केसेस 2012-13 तसेच 2013-14 च्या आहेत.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : सर मी फाईल चेक केल्या तेव्हा तारीख 5 डिसेंबर 2023, व्हाऊचर नंबर 222, बिल नंबर 3467 यामध्ये रु.36,000/- ड्रायफ्रूटचे बिल आहे ते 36,000 चे ड्रायफ्रूट का आणले गेले त्याची माहिती मिळावी.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: बाहेरच्या बऱ्याचश्या एजन्सी असतात त्यांच्याकडून पतसंस्थेला महत्त्वाची मदत होत असते त्यासाठी ड्रायफ्रूट आणले.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : बऱ्याचशा नका म्हणू. त्यांची नाव घ्या. सर्वांना समजू दे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सर्वांची नावे आपल्याकडे आहेत. 250 ग्रॅम ड्रायफ्रूटचे 72 बॉक्स होते प्रत्येकी रु.500/- प्रमाणे. हे आत्ताच नाही परंपरेने चालत आले आहे.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : तुम्ही सांगताय परंपरेने चालत आलंय, तर हे जे बिल आहे, ते बघितलं तर त्यावर फक्त तारीख आहे क्रॉस लाईन मारली आहे आणि रु.36,000.- असं लिहिलं आहे. असं बिल तुम्ही कसं घेतलं? त्यामध्ये किती किलो, किती किंमत हे नमूद केलेलं नाही. असं बिल तुम्ही कसं पास करू शकता? ऑडिट करताना तुमच्या लक्षात नाही आलं का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मी सांगत आहे की 72 बॉक्स होते प्रत्येकी 250 ग्रॅमचे एकाची किंमत पाचशे रुपये.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : हे बिल कसं मान्य करायचं आम्ही. आपण जर एखादी वस्तू घेतो त्यात नमूद केलेलं असतं की किती वस्तू येतील, प्रत्येकाची किंमत काय असेल डायरेक्ट रु.दहा हजार असं होत नाही. हे बिल चुकीचं आहे. ते तुम्ही पास करून घेतलं. ते बिल तुमच्या माहितीप्रमाणे योग्य आहे का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हो योग्य आहे.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : कसे योग्य आहे. आपण एखादी वस्तू घेतली तर त्या बिलामध्ये त्या वस्तू किती आहेत हे लिहिलेलं असतं आणि मग ते पास होतं. आता कोणाचंही नाव नका सांगू.

मानद सचिन श्री शिवाजी हगवणे: आपला निवडणुकीचा जो खर्च होता 67 लाख रुपये मला उत्तर सांगू द्या.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : तुम्ही विषयांतर करू नका. या बिलावर फक्त एक क्रॉस मारला आहे आणि रु.36,000 /- असं लिहिलं आहे आणि ते हे बिल मंजूर करतात. हे त्यांनी चुकीचं काम केलं आहे.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): थोडक्यात आणि स्पष्टपणे उत्तर द्या आणि तुम्ही हे किती किलो आणले त्याचा काहीतरी आकडा असेल ना 10 किलो असं काहीतरी. अहो बॉक्स नाही, किती किलो काजू आहेत, बदाम आहेत, काय आहे ते थोडक्यात सांगा.

श्री डी एस धोत्रे (सीडीएम) अध्यक्ष साहेब, मला बोलायचं आहे. सभागृहाचा प्रश्न योग्य आहे. तुम्ही सेक्रेटरी संक्षिप्त उत्तर द्या. आणि दुसरी गोष्ट, असे जे बिल असते त्याचे ताशेरे तुमच्या ऑडिट रिपोर्टमध्ये असतात. असं जर असेल तर त्यांना ते दाखवा आणि जर तसं नसेल तर अध्यक्ष साहेबांच्या परवानगीने त्यावर  कारवाई करा आणि पुढे जा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: 72 बॉक्स प्रत्येकी 250 ग्रॅमचे होते.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : साहेब त्या बिलावर काहीच  लिहिलं नाही. तेच मी तुम्हाला सांगतोय.  फक्त रु.36,000/- एवढेच लिहिलं आहे. तीन नंबरची फाईल बघा आता पण तुम्हाला ते दिसेल.

श्री श्रीधरन (सीडीएम): अध्यक्ष साहेब, बॅलन्सशीटचा विषय सुरू आहे. सभासदांनी एक सूचना दिली तुम्हाला की 36 हजार रुपयाचं बिल आहे ते बरोबर ट्रांजेक्शन मध्ये आहे का?  त्यावर योग्य निर्देश आहेत का? हे मी अध्यक्ष साहेबांना विनंती करतो की त्यांनी सिक्रेटरींना सांगावे.

श्री मनोज वाडेकर (आरईडी) : अध्यक्ष साहेब, माझा प्रश्न हा होता जर अशा चुकीच्या पद्धतीने काम होत असेल तर प्रत्येक वेळी आपण माफी देत राहायची का? चुकीच्या कामासाठी यांना रुपये 2000/- देत नाही आपण. एका मिटींगला हे पूर्ण संचालक मंडळ रु.30,000 भत्ता घेतात, तर हे असे कसे करतात? मग त्यांना कोणती शिक्षा नको का? हे क्रॉस मारलेलं रु.36,000 /- चं बिल चुकीचं काम आहे. रु. 36,000/-  त्यांनी भरावेत.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: हे फायनान्स रिलेटेड आहे म्हणून खजिनदार शिबू रॉय तुम्ही याचे थोडक्यात उत्तर द्या.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: वाडेकर तुम्ही सोसायटीमध्ये या. तुम्हाला सर्व तपशील देण्यात येईल. प्रत्येकी रु.500/- चे आणि 250/- ग्रॅमचे 72 बॉक्स अशी त्यांची पूर्ण लिस्ट आहे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: शिबु रॉय, तुम्ही एकदम क्लिअर उत्तर द्या. असं बिल कसं पास केलं तुम्ही. ते बिलाबद्दल बोलत आहेत तुम्ही पण त्यावरच बोला. ते बरोबर आहे की चूक आहे.  जे बिल तुमच्याकडे आलं ते तुम्ही कसं पास केलं  ?

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: मी त्या बिलावरच बोलत आहे. त्या बिलाच्या संदर्भात आम्ही ऑडिटरला  पण क्लेरिफिकेशन दिले आहे. तेच मी तुम्हाला देतो पण तुम्ही सोसायटीमध्ये या.

श्री मनोज वाडेकर (आर.ई.डी.): अध्यक्ष साहेब, आम्ही खूप वेळा सोसायटीमध्ये गेलो आहोत आम्हाला क्लॅरिफिकेशन नको. हे रु.36,000 पास करून घेतले हे चुकीचं काम झालं आहे हे मान्य करा. ते बिल खोटं असू शकतं, तुम्ही एका मिटींगचे 30,000/- घेऊन असे काम करत असाल तर यांना शिक्षा होणे पण जरुरीच आहे. अध्यक्ष साहेब, तुम्ही  यांच्याकडून 36 हजार रुपये वसुल करण्यात यावेत यांना वचक राहणे जरुरी आहे म्हणजे हे पुढे चांगलं काम करतील.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: आपण मागच्या मीटिंगमध्ये एक कमिटी स्थापन करणार हे बोललो आहोत. तीच कमिटी अशा ज्या काही गोष्टी असतील त्याबाबत चौकशी करेल. आम्हाला थोडा वेळ द्या.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): धन्यवाद अध्यक्ष साहेब. या डायरी प्रकरणावर तुम्ही एक कमिटी स्थापन करून हा सुद्धा विषय त्या कमिटीमध्ये सामील करणार त्याबद्दल आभारी आहे पण साहेब त्यासाठी काहीतरी टाईम लिमिट ठेवा. त्यामध्ये त्यावर कारवाई झाली पाहिजे.

श्री श्रीधरन (सीडीएम): पान क्र. 45 वर दोन हेड आहेत. टीडीएस ड्यूज फ्रॉम मेंबर असेसमेंट इयर 2020-21, 2021-22, 2022-23 तर हा जो टीडीएस आहे त्यावर तुमच्याकडून काय कारवाई झाली ते सांगा. त्याचबरोबर आपण मॉरेटोरियम आलाऊ केला होता ते पण 1 कोटी 37 हजारच्या पुढे आहे. ते 89,000/- ने खाली आले पण ते पूर्ण संपायला अजून किती वेळ लागेल? कोणतीही व्यक्ती रिटायर होते तेव्हा त्याचे मॉरेटोरियम आहे की नाही हे सोसायटी चेक करते का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हे जे टीडीएसचे आहे ते 2020-21, 2021-22, 2022-23 या पिरेडमधले होते. आता ते कमी झाले. जे रिटायर्ड सभासद आहेत त्यांना आम्ही नोटीस पाठवत आहोत. अशाप्रकारे टीडीएस रिकव्हरी चालू आहे. आम्ही आस्थापनाकडे विनंती केली आहे की रिटायर सभासदांचे लाईव्ह ॲड्रेस आम्हाला द्या. त्या ॲड्रेसवर आम्ही नोटीस सुद्धा पाठवणार आहोत.

श्री श्रीधरन (सीडीएम): जो टीडीएस येणे बॅलन्स आहे तो सर्व फक्त रिटायर्ड सभासदांचा आहे का ?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हो, रिटायर सभासदांचा आहे. कोरोना काळात सभासदांना मॉरेटोरियम फॅसिलिटी दिली होती, ती रक्कम 2 ते 3 कोटी होती. आता ती 89 लाख आहे. ती कमी कमी होत चालली आहे. संचालक मंडळाने जे नवीन कर्ज धोरण आणलं त्यानुसार नवीन कर्ज घेणारा सभासद आहे त्याचं मॉरेटोरिअम लॉग टर्म लोन मधून वसूल करून घेतलं जात आहे आणि खूप लवकरच हे मॉरेटोरिअम संपून जाईल.

श्री श्रीधरन (सीडीएम): हा खूप सिरीयस विषय आहे अशी कुठची केस आहे का की त्याचा मॉरेटोरिअम आहे आणि तो सभासद सेवानिवृत्त झाला. तुम्ही सभासदांचं रीझाईन घेता तेव्हा त्यांचे मॉरेटोरिअम तपासून बघा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हा विषय जो आला त्याबद्दल मला सभागृहाला एक माहिती द्यायची आहे की पूर्वी सभासद सेवानिवृत्त झाल्यानंतर आस्थापनाकडून त्याच्या ग्रॅच्युइटीमधून त्याचे उर्वरित कर्जाचे पैसे मिळायचे. परंतु 2023 नंतर आस्थापनाकडून एक परिपत्रक आलं डिसेंबर 2023 मध्ये, त्यात त्यांनी सांगितलं की ग्रॅच्युइट मधूनसोसायटीचे पैसे मिळणार नाहीत.

श्री श्रीधरन (सीडीएम):तो वेगळा विषय आहे. तुमच्याकडे सभासदांचं रेजिग्नेशन जेव्हा येते तेव्हा तुम्हाला समजायला पाहिजे की त्याचे मॉरेटोरिअम आहे की नाही.

श्री राजापुरे  (डी आर एच आर): तुम्ही मॉरेटोरियमचा उल्लेख केला. मगाशी मॅनेजमेंटच्या चुकीच्या कारभारामुळे संस्थेला जवळपास 20 ते 80 लाखाचे नुकसान झाले आहे. जे नुकसान झाले त्यामध्ये काही वसूल झालं, काही वसूल झालं नाही. त्यांनी टेंडर मागवून काही गोष्टी खरेदी केल्या, त्या आता  चालत नाहीत. याविषयी तुम्ही त्या कमिटीकडे ऑफिशिअली काही पत्र दिलं आहे का, की तुमच्या चुकीमुळे संस्थेला एवढा भुर्दंड पडला आहे. जर केला असेल तर सांगा आणि केला नसेल तर का केला नाही याचे उत्तर द्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हो, केला आहे. गो कॅशलेस, टीडीएसचा विषय याबाबत पत्रव्यवहार केला आहे.

श्री राजापुरे  (डी आर एच आर): पासबुक प्रिंटिंग बद्दल पत्रव्यवहार केला का? किऑस्क पासबुक प्रिंटिंग मशीनवर 500 लोकांनी पण पासबुक प्रिंट करून घेतलं नसेल. कारण त्या मशीन्स वर्किंग कंडिशनमध्ये नाही. मागच्या कमिटीने लॉकडाऊन मध्ये संस्थेला लुटण्याचा भरपूर फायदा घेतला.  त्यावेळेस ऑनलाइन एजीएम होती. त्यात कोणाला बोलू देत नव्हते. कोणी जात नव्हते कारण कोरोना होता याचा कमिटीने पुरेपूर फायदा घेतला. म्हणून संस्थेला एवढं नुकसान झालं आहे. सन 2020-21 ला मॉरेटोरिअम 3 कोटी 20 लाख होतं. फक्त एका वर्षात 3 कोटी 20 लाख म्हणजे 10% ने 32 लाख  नुकसान झालं? 32 लाख. असं दरवेळी जर 10% कॅल्क्युलेशन केलं तर संस्थेला किती नुकसान झालं ते बघा. 28 लाखाच्या प्रिंटिंग मशीन अधिक टीडीएस मध्ये वीस लाख येणार नाही असे आणि संस्थेने इन्कम टॅक्सला जवळपास 40 लाख फाईन भरला आहे. तुम्ही फक्त ओरली कॅल्क्युलेशन करा.  ही मॅनेजिंग कमिटी मागच्या मॅनेजिंग कमिटीला याबाबत को-ऑपरेटिव्ह ॲक्टनुसार संस्थेला झालेल्या नुकसानीबद्दल बांधील आहे . यासाठी तुम्ही काही लेखी स्वरुपात पत्रव्यवहार केला आहे का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मागच्या संचालक मंडळाला चर्चेला बोलावून त्यांच्याशी चर्चा करून माहिती घेतली आहे.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय यांनी  मागच्या संचालक मंडळाने दिलेले क्लेरिफिकेशन वाचून दाखवले.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे यांनी माजी सचिव श्री  गावंडे यांनी दिलेला रिप्लाय वाचून दाखवला. रिप्लायची तारीख आहे 8  जुलै 2024 आम्ही पाठवलेले पत्र होते 21 जून 2024 ला.

श्री राजापुरे (डीआरएचआर): यात दोनच विषय नमूद केले आहेत. तिसरा विषय आहे की आपले सेवानिवृत्त झालेले सभासद त्यांचा टीडीएस येणार नाही. तो येणे शक्य नाही. तुम्ही प्रयत्न केले गेल्या दोन वर्षात. पण 18 लाख तर नक्कीच येणार नाही. आणि 22 लाखाच्या प्रिंटिंग मशीन सन 2021 ला आल्या. त्याचा साडेचार लाख असेट राहिलं आहे त्या चालवून आउटपुट काही निघाल नाही. या ज्या मशीन आणल्या त्यावर त्यांना जबाबदार धरून त्याची करंट लायबिलिटी फिक्स करा. संस्थेला झालेले हे नुकसान आणि जर तुम्ही हे सर्व गमावणार असाल तर सभासदांना अर्धा टक्के व्याज कमी करा. संस्थेचे 70 ते 80 लाखाचे नुकसान झाले आहे. तुम्ही त्या संचालक मंडळावर काही ॲक्शन घेतली नाही मागे लॉकडाऊन होतं त्यामुळे हे मीटिंग पण घेऊ शकत नव्हते.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): अध्यक्ष साहेब, मागच्या दोन वर्षाच्या आधीच्या एजीएममध्ये याविषयावर खूप चर्चा झाली. टीडीएस जो आहे तो काही सभासदांवर थोपवला गेला आहे. इन्कम टॅक्स कडून नोटीस आल्यानंतर फक्त निवडणुकीला लक्षात ठेवून, आता जर का टीडीएस सभासदांना लावला तर ते आपली कमिटी निवडून देणार नाही, यासाठी तो टीडीएस थांबवण्यात आला. नंतर सभासदांकडून तो वसूल करण्यात आला. त्यात सेवानिवृत्त सभासदांकडून ते वसूल झालं नाही. अजूनही ते बाकी आहे. त्यासाठी पूर्णपणे त्यावेळचे संचालक मंडळ जबाबदार आहे. राजापुरे बरोबर बोलत आहेत. नाहीतर संस्थेमध्ये हा पायंडा बसेल की मी शेवटच्या वर्षी काहीही करून निघून जाईन आणि त्याला मी जबाबदार राहणार नाही. म्हणून याची पूर्ण जबाबदारी त्या संचालक मंडळावर टाकून त्यांच्याकडून वसूल करण्यात यावेत. धन्यवाद.

श्री राजापुरे (डी आर एच आर): टीडीएस वर असलेला 34 लाखाचा दंड आणि मुद्दल 18 लाख ही सर्व रक्कम त्यावेळच्या संचालक मंडळाकडून वसुल झाली पाहिजे असं माझं स्पष्ट मत आहे.कारण आम्ही कर्ज घेतो इंट्रेस्ट भरतो आणि यांनी मनमानी करायची आणि संस्थेचे फक्त नुकसान करायचे. तुम्हाला काही अडचण असेल तर हाऊसमध्ये ठराव पास करा. संचालक मंडळाला जर भीती वाटते तर आजच्या सभेमध्ये ठराव पास करून घ्या. सभागृह सर्वोच आहे ते तुम्हाला निर्णय देईल. सूचक अनुमोदक देतील तसा ठराव तुम्ही पास करा.

श्री वरळीकर (टीएमएस): वाडेकरांनी तुमच्याकडे प्रश्न आणले. प्रकाश पाटील यांनी पण सांगितलं की एक समिती गठन करावी. त्या समितीला एक टाईम लिमिट द्यावे. कारण मागे पण कमिटी बनवायला सांगितलं होतं पण ते झालं नाही. म्हणून एक टाईम लिमिट देण्यात यावे. फक्त संचालक मंडळावर हे येत नाही. संचालक मंडळाकडून राहिलेल्या त्रुटी बरोबर करून घेणे साठी तुमचीही त्यात जबाबदारी आहे. आम्ही सर्व ठराव करू आणि ते पारित पण होतील पण हे खरोखरच पैसे भरणार आहेत का? की हे आमच्या डोक्यावरच येणार. आम्ही चर्चा केली, आम्ही ठराव केला, दोन दिवस कुपन खाल्ले आणि विसरून गेलो. त्याचा पुढचा आढावा काय करणार, कायदेशीर कारवाई काय करणार जो कोणी असो मागचे संचालक असू द्या किंवा आजचे संचालक असू द्या, जर ते बरोबर वागले नाही तर ते कसे कायदेशीररित्या वागतील ते तुम्ही ठरवा. तुम्ही पुढच्या मिटींगला येणार,

तुम्ही आश्वासन देणार, मी येऊन पुन्हा बोलणार आणि यावर असंच पाणी पडणार. यावर तुमच्याकडे उत्तर आहे का? मला सेक्रेटरी, संचालक कोणाकडूनही उत्तर नको. मला अध्यक्षांकडून उत्तर पाहिजे. फक्त ठराव मांडा पास करा हे असंच चालणार. पण कधी होणार,?

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: तुम्ही जो प्रश्न विचारता की किती टाइम फ्रेम ठेवणार, कधी करणार, काय लिगल ॲक्शन घेणार यावर असं उत्तर आहे की, आम्ही दोघेही लीगल एक्सपर्ट नाही. हे तुम्ही समजून घ्यायला पाहिजे. आमची यावर चर्चा होईल. एक कमिटी नेमू, त्या कमिटीचा कालावधी ठरवू. पण आत्ता मी तुम्हाला काहीही सांगू शकत नाही. याचा आम्ही काहीही अभ्यास केलेला नाही. तुम्ही म्हणता दोन दिवसात यावर उत्तर द्या निर्णय द्या तर हे चुकीचे आहे. आधी आम्ही चर्चा करू आणि जी कमिटी असेल तिला एक लेटर देऊ. त्या लेटरमध्ये टाईम देऊ आणि त्यांच्याकडून निर्णय घेऊ. आत्ता या क्षणी मी काहीही करू शकत नाही.

श्री वरळीकर (टीएमएस): ठीक आहे. यावेळी सांगू शकत नाही. मागच्या मीटिंगमध्ये कमिटी स्थापन करू असे बोलले होतात आजपर्यंत कमिटी नेमली नाही तुम्ही योग्य शब्द वापरला आम्ही लीगल एक्सपर्ट नाही.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: येथे कोणीही लीगल एक्सपर्ट नाही. इथे कोणी एलएलबी आहे का? त्याला आम्ही लीगल एक्स्पर्ट म्हणतो. तेव्हा कमिटी स्थापन करू, त्यांना टाईम लिमिट असेल आणि आम्ही सर्वांना ते कळवू. आता यावर जास्त चर्चा नको.

श्री वरळीकर (टीएमएस): दुसरा प्रश्न आहे. त्यामध्ये तुम्ही कायदेशीर कारवाई कशी करणार हे सुद्धा तुमच्याकडून आश्वासन पाहिजे आहे. जर यामध्ये दोषी आढळले असतील तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई कशी केली जाईल त्याचाही आढावा घेण्यात येईल आणि त्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम: तुम्ही जे कमिटीबद्दल बोलत आहात मागच्या आठवड्यात वार्षिक सर्वसाधारण सभा झाली त्यावेळी डायरीचा विषय आणि आजचा 36 हजार रुपये बिलाचा जो विषय आहे तो विषय सामील करू आणि त्यासाठी एक कमिटी फॉर्म होईल. पण मागच्या कमिटीने जे पण लॉस केलं हा जो विषय आहे त्याबद्दल आम्हाला काहीच माहिती नाही आणि त्यावर काहीच चर्चा सुद्धा झाली नाही. मागच्या दोन वर्षांच्या आधी त्या कमिटीने काय केले ते आमच्या अधिकारात येत नाही. या विषयाबाबत सोसायटीचे सभासद जर लीगल मध्ये जाऊ इच्छिता तर ते जाऊ शकतात. आम्हाला काही अडचण नाही.

श्री राजेश कळके (सीडीएम): सर, त्या लीगल गोष्टीसाठी सभासद स्वतःचा पैसा खर्च का करणार? ते सोसायटीने केलं आहे मग सभासद खर्च का करणार? संचालक मंडळ चूक करणार आणि सभासद खर्च करणार हे कसं शक्य आहे?

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम एस: मग तुम्हाला नॉलेज असेल तर इथे या आणि आम्हाला सांगा.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): अध्यक्ष साहेब, मागील नोकर भरतीच्याबाबतीत पण संचालक मंडळाला पूर्ण अधिकार दिला होता. यांच्या जाहीरनाम्यामध्ये सुद्धा ते होतं. सभागृह हे सुप्रीम आहे ते तुम्हाला सांगत आहे की, तुम्ही याची सर्व माहिती द्या, चौकशी करा कारण सर्व दस्तऐवज संस्थेमध्ये आहेत. हे सर्व संस्थेत आहेत.कोणी कोणी काय केलं ते आमच्याकडे नाही म्हणून आम्ही हे सांगतो की ज्यांनी हे काम केलं त्यांना कुठेतरी शिक्षा झाली पाहिजे. हे सर्व अधिकार या संचालक मंडळाला दिले. म्हणून सर, एक कमिटीने नेमा आणि या कामाच्या मुळापर्यंत जा आणि शोधून काढा.

श्री राजेश कळके (सीडीएम): अध्यक्ष साहेब, ते सर्व कागदपत्र तुमच्या कस्टडीमध्ये घ्या कारण त्यामध्ये फेरफार करू शकतात.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): अध्यक्ष साहेब, शिबुनी वाचलेला रिपोर्ट सर्वांनी ऐकला असेल. त्यात महत्त्वाचे मुद्दे आहेत एक टीडीएस- जो रिटायर्ड सभासदांकडून रिकव्हर होत नाही. दुसरा मुद्दा नोकर भरती- यासंदर्भात त्यांनी काही मेन्शन केलेले नाही. मॅनेजर भरतीचा मुद्दा- याबाबत पण काही नाही. तिसरा मुद्दा- गो कॅशलेस यामध्ये संस्थेचे दीड कोटी अडकलेले आहेत. असे तीन मुद्दे पूर्णपणे निरसन व्हावे म्हणून एक कमिटी स्थापन करावी आणि त्यातून खरच काही आउटपुट आले तर मग लोकांकडे ऑप्शन असेल कारण सर्व कागदपत्र संस्थेमध्ये आहेत आणि आता जी कमिटी बहुमताने निवडून आली आहे त्यांनी स्वतःच्या अजेंडावर हे मांडलं होतं की आम्ही या नोकर भरतीबद्दल श्वेतपत्रिका काढू आणि जो काही घोटाळा झालाय तो उजेडामध्ये आणू. पण यांनी असं काहीच केलेलं नाही. म्हणून कमिटीचे गठन व्हावे.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): अध्यक्ष साहेब, तुम्ही एक नाही दोन कमिटी बनवा. समितीचा रिपोर्ट येईल त्यामध्ये कोणीतरी दोषी सापडेल. अध्यक्ष साहेब तुम्ही, संचालक मंडळ आणि आमच्या मधला दुवा आहात. मीटिंग बरोबर चालावी, संचालक मंडळावर वचक असावा, जर का यामध्ये दोषी सापडले तर तुमच्याकडून आश्वासन आलं पाहिजे की त्यांच्यावर कायदेशीर कारवाईसाठी योग्य ते प्रयत्न केले जातील.

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम एस.: सेक्रेटरी साहेब, जे कमिटीने उत्तर दिलं ते त्यांना सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कमिटी स्थापन करण्याचा प्रयत्न झाला परंतु त्यात अपयश आले. आता अध्यक्ष आणि उपाध्यक्ष साहेब आहेत त्यांच्या माध्यमातून कमिटी स्थापन करू.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): साहेब, मी टाईमफ्रेमबद्दल बोललो. मला मागचं काही काढायचं नाही. माझ्या मित्रांनी सर्व सांगितले आहे. मला फक्त तुमच्याकडून एवढेच आश्वासन पाहिजे की त्या चौकशीमध्ये जर कोणी दोष आढळलं तर त्यावर काय कायदेशीर कारवाई केली जाईल.

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम एस.: आमच्याकडे अशा प्रश्नांना उत्तर नाही. पहिल्यांदा कमिटी बसू दे, त्यांचा रिपोर्ट येऊ दे, मग पाहू.

श्री सारंग (एएफडी): अध्यक्ष साहेब, माझे असे निवेदन आहे की एक कमिटी बसवू जी कमिटी यांची चौकशी करेल आणि जर चौकशीमध्ये दोष आढळले तर रजिस्ट्रारकडे जाऊ. कारण आत्ताच्या कमिटीला ते अधिकार आहेत. मागे जे काही झालं ते त्यांना सांगा. कारण आपली फायनान्शिअल इन्स्टिट्यूट आहे. याचा हिशोब सर्वांना समजला पाहिजे आणि यामध्ये काही तफावत असेल तर ते कमिटीने शोधून काढावे आणि ते सर्वांसमोर आणावे. त्यावर लिगल ॲक्शन घेण्याचे सर्व अधिकार संचालक मंडळाकडे आहेत. हाऊस त्याला मान्यता देईल. समिती जो काही रिपोर्ट देईल त्या रिपोर्टमध्ये जे काही असेल पॉझिटिव्ह, निगेटिव्ह त्यावर कार्यवाही करण्याचा अधिकार संचालक मंडळाकडे असेल.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: आपला विषय बॅलन्सशीटचा आहे. ते सोडून दुसऱ्या विषयावर चर्चा होणार नाही.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): ठीक आहे. बॅलन्स शीटवर बोलायचं. या बॅलन्स शीटवर कमिटी नेमण्याबाबत तुम्ही बोललात आणि हाऊसने पण तुम्हाला मान्यता दिली. तुम्ही पण मान्य केलेत की कायदेशीर कारवाई व्हावी हे संचालक मंडळ जबाबदार असेल त्यांना पण अधिकार दिले आहेत.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: तुम्ही हे ‘मी बोललो’ असं बोलू नका. मागच्या एजीएममध्ये कमिटी बनवण्याचं ठरले आहे. पुन्हा त्या विषयावर चर्चा नको. तुमचा प्रश्न बॅलन्सशीट वरआहे का ?

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): जर बॅलन्सशीट वर काही फाइंडिंग आली तर त्यावर तुम्ही स्पेशल एजीएम ठेवावी. कमिटी नेमण्यावर तुमचा दुजाभाव का आहे?

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: बॅलन्सशीटवर काही प्रश्न आहे का तुमचा?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: वरळीकर साहेब, बॅलन्सशीटवर आपण चर्चा करत असताना आपण त्यावरच बोलू आणि इतर विषयांमध्ये बाकीच्या विषयावर बोलू. बॅलन्सशीट पास करून घ्या. कारण यानंतर अजेंडावर ‘विक्रम कर्ज संरक्षण योजना’, ‘पर्शीअल विड्रावल’ हे सुद्धा विषय आहेत.तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आपण कमिटी नेमू पण हे विषय होऊ द्या.

श्री प्रवीण सावंत (सीडीएम): अध्यक्ष साहेब, मागच्या मिटिंगमध्ये अजेंडा पूर्ण होऊ शकला नाही म्हणून आजची ही तहकूब मीटिंग आहे. तहकुब मीटिंग पुन्हा तहकूब होते का? म्हणून या मीटिंगमध्ये सर्व विषय पास करायचे आहेत. ज्या विषयांमध्ये जास्त चर्चा होते तिथे तुम्ही हस्तक्षेप करा आणि तो विषय इतर विषयांमध्ये कन्व्हर्ट करा म्हणजे आपला अजेंडा पूर्ण होईल.

श्री राजापुरे (डीआरएचआर): अध्यक्ष साहेब, तुम्ही सभागृहाला आश्वस्त करा की मगाशी बोलल्याप्रमाणे हा जो पैसा शिल्लक राहिला आहे म्हणून नुकसान सभासदांना आहे त्यावर तुम्ही कमिटी नेमून कायदेशीर कारवाई करणार का? तुम्ही स्वतः कमिटी नेमणार की सभागृहातून नेमणार?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हा मुद्दा बॅलन्सशीटचा नाही. बॅलन्सशीटमध्ये ज्या फिगर आहेत, जे नुकसान झालं ते इतर विषयांमध्ये घेऊन त्यावर एक कमिटी नेमू. कारण बॅलन्सशीट पास करायची आहे.

श्री राजापूरे (डी आर एच आर): मी फक्त आश्वासन मागतो की जे नुकसान झाले ते कसं भरून काढणार तुम्ही.

श्री श्रीधरन (सीडीएम): अध्यक्ष साहेब, हे फक्त बॅलन्स शीट नाही यामध्ये वर्किंग रीपोर्ट आणि बॅलन्सशीट या दोन्ही गोष्टी आहेत. आपला अहवाल आणि बॅलन्सशीट या दोन्ही विषयावर चर्चा झाली तर काहीच विषय नाही म्हणून तुम्ही दोन्ही गोष्टी बघा.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): अध्यक्ष महोदय, पान नंबर 42 बिल्डिंग फंड 9 कोटी हा कशामध्ये आहे?

मानद सचिव शिवाजी हगवणे: तो लिक्विडिटीमध्ये आहे.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): तो तसाच राहणार ना?

मानद सचिव शिवाजी हगवणे: तो तसाच राहणार पण त्यावर इन्स्ट्रक्शन्स आले आहेत. एमडीसीसी बँकेने आणि ऑडिटरने पण सांगितले आहे की या अशा प्रोव्हिजन आहेत त्याची गुंतवणूक झाली पाहिजे.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): ठीक आहे. मागच्या संचालक मंडळाने थंड हवेच्या ठिकाणी जागा घेण्याचे ठरवलं तसं तुमच्या डोक्यात काही नाही ना.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: पाटील साहेब, त्या नऊ कोटीच्या फंडाला हात लावायची हिमंत आहे का या संचालक मंडळामध्ये? हे होणारच नाही.

श्री प्रवीण सावंत (सीडीएम): अध्यक्ष साहेब, हा फंड दरवेळी बॅलन्स शीटला दिसतो जर हा रिनिव्ह कसा करता येईल यावर संचालक मंडळाने काही प्रोव्हिजन केली आहे का.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): हा फंड खूप आधी बनवला आहे. जर संस्थेला स्वतःचं ऑफिस बनवायची वेळ आली तर त्यासाठी हा निधी तयार झाला होता. पण आता संस्थेचे ऑफिस बीएआरसीमध्येआहे आणि त्यामुळे तशी कुठलीही गरज नाही.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): सेक्रेटरी, ही गुंतवणूक करताना ही विनंती आहे की ती राष्ट्रीयकृत बँकेत व्हावी.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आपली सहकारी संस्था आहे ती सहकारी क्षेत्रात आणि शेड्यूल बँक मध्ये गुंतवणूक करू शकते. राष्ट्रीयकृत बँकेत जर गुंतवणूक केली तर त्याचा टीडीएस डायरेक्ट इन्कम टॅक्स मध्ये धरला जातो. त्यामुळे आपली इन्व्हेस्टमेंट सहकारी बँकेत करायची असते. हा फंड युटीलाइज व्हायचं कारण झालं पाहिजे, आता हा फंड जर आपल्याला वर्किंग मध्ये आणायचा असेल तर मागील दोन वर्षात त्यावर 30% टीडीएस इन्कम टॅक्सला  दाखवावा लागेल. म्हणून त्यावर शहानिशा करू. मी सीए बरोबर बोलतो. आपण जर प्रोव्हिजनमधून हे काढले तर ते कसे करता येईल.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई:  सर्वांनी ऐका. ही तहकूब झालेली सभा आहे. माझ्या माहितीप्रमाणे एकदा तहकूब झालेली सभा पुन्हा तहकूब होत नाही. तुम्हाला सर्व माहित आहे. एक तास झाला अजूनही आपण मागच्याच विषयावर आहोत.  या विषयावर मी आता फक्त दोन-तीन प्रश्न घेईन आणि हा विषय बंद करेन.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): सेक्रेटरींनी सांगितलं की नॅशन्लाईज बँकेमध्ये होत नाही तर माझी विनंती आहे की को-ऑपरेटिव्ह बँकेत लवकरात लवकर फंड इन्व्हेस्ट करा. आमचे नुकसान होणार नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे : त्याची गुंतवणूक आपण सहकारी बँकेत करण्याचा प्रयत्न करू.

श्री डी एस धोत्रे (सीडीएम): अध्यक्ष साहेब, माझा एक प्रश्न आहे. आपल्याला अहवाल वर्षात 13 कोटी नफा झालेला आहे. त्याची वर्गवारी पण केलेली आहे. आपल्याला नफा-तोटा जो होतो तो आपला स्वनिधी ठेवीदार आणि कर्जदार यांच्यावर अवलंबून आहे. यातला महत्त्वाचा घटक कर्जदार आहे. आम्ही कर्ज घेण्यासाठी जेव्हा तुमच्याकडे जातो तेव्हा त्या फॉर्मची किंमत आहे 113 रुपये. तर ते पैसे तुम्ही सभासदांकडून न घेता तुम्ही ते फॉर्म फ्री करावेत. कारण ऑलरेडी तुम्हाला नफा जास्त होत आहे. ही आमची सभासदांची विनंती आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: धोत्रे साहेब, आपण फॉर्मचे  113 रुपये नाही तर 100 रुपये घेत आहोत आणि ते पण फक्त फ्रँकिंगचे.

श्री राजापुरे  (डी आर एच आर): अध्यक्ष साहेब, हे बोलतात की फ्रँकिंगचे पैसे घेतो पण इनकम साईडला ते कोणत्या हेड खाली दाखवता ते सांगा. मागच्या वर्षी किती फॉर्म गेले ते पैसे दाखवावे. प्रत्येक फॉर्मचे शंभर रुपये येतात तर ते कुठल्या हेड खाली इनकम दाखवता?

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: शेडूल नंबर 11 पान नंबर 55 वर 2 लाख 43 हजार 598 हे फ्रॅंकिंगचे दाखवले आहेत.

श्री राजापुरे (डी आर एच आर): तुम्ही नीट उत्तर द्या. तुम्ही फ्रेंकिंगला स्टॅम्पिंगचा चार्ज केला तो सांगू नका. तुम्ही फॉर्म विकून जे पैसे घेतले ते इन्कम साईडमध्ये कुठे दाखवले असं मी विचारत आहे. मला वाटायचं की फॉर्म फ्री आहेत. पण त्यांनीच सांगितलं की आम्ही फॉर्मच्या फ्रॅंकिंगचे शंभर रुपये घेतो. जर तुम्ही शंभर रुपये घेता तर ते इन्कम होत आहे त्यामुळे ते इन्कम हेडमध्ये आलं पाहिजे.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: हे इन्कम साईडला येत नाही. पान क्रमांक 55 शेडूल नंबर 11 मध्ये ते आहे.

श्री राजापुरे (डी आर एच आर): तुम्ही इनकम ॲड करू शकत नाही तुम्हाला त्याचे दोन हेड बनवावे लागतील दोन लेजर बनवावे लागतील.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन फॉर्मची फ्रॅंकिंगची फी आहे त्यावर आपण एक सकारात्मक विचार करू.

श्री महेंद्र मोरे (पूर्णिमा लॅब): अध्यक्ष साहेब, माझा प्रश्न आहे. 43 लाख 15 हजार 314 हा अनपेड डिव्हीडंट आहे. त्याचा आपण काय वापर करणार?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सहकार खात्याच्या निर्देशानुसार जो अनपेड डिव्हीडंट आहे तो तीन वर्ष सोसायटीकडे राहतो आणि मग तो गंगाजळीमध्ये जातो. वर्षाला सरासरी दहा ते पंधरा लाख अनफेड डिव्हिडंट राहतो. आता याचा ओघ पाहता संचालक मंडळाने निर्णय घेतलेला आहे की त्या सभासदांपर्यंत पोचून त्यांना ते पैसे देण्याचा प्रयत्न करणार आहे.

श्री महेंद्र मोरे (पूर्णिमा लॅब): सॉफ्टवेअरसाठी दरवर्षी 10 लाख लागतात यावर्षी 9 लाख 99 हजार 654 आहे दहा लाख रुपये तुम्ही पुढच्या वर्षी वाढवून वीस लाख करत आहात म्हणजे दहा लाख दरवर्षी वाढत जाणार का आणि त्या मध्ये कॉम्प्युटर मेंटेनन्ससाठी पाच लाख वेगळा खर्च आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आत्ताचे पीओसीटचे चार्जेस आहेत ते आपले सबस्क्रीप्शन चार्जेस आणि डेडिकेटेड सर्व्हरचे चार्जेस असे दोन प्रकारचे चार्जेस आहेत. यावर्षी नवीन पद्धतीचे कर्जधोरण आले. त्यासाठी 50% ते 60% बदल सॉफ्टवेअरमध्ये करण्यात आले.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: आत्ता आम्ही जे लोन स्ट्रक्चर चेंज केलं आहे त्यामध्ये सॉफ्टवेअरचे मेंटेनन्स चार्जेस वेगळे आहेत. नवीन कस्टमायजेशन म्हणजे सॉफ्टवेअरमध्ये बदल करायचा आहे. आता जे नवीन कर्जासाठी चेंज केलेलं आहे ते पुढच्या वर्षी करण्याची गरज नाही. काही काही चेंजेस अजूनही आपल्याला करायचे आहेत. आत्ता आम्ही ऑटोरिन्यूअल सुरू केले

आहे पण त्याचे  सॉफ्टवेअरमध्ये कस्टमाइझेशन झालेले नाही. ते डेली बेसिस वर मॅन्युअली काम होत आहे. जो कर्मचारी तिथे बसला आहे तो ते काम करत आहे. सॉफ्टवेअर कस्टमायजेशनचा वेगळा खर्च येणार आहे.  त्याची रक्कम मोठी आहे म्हणून ही प्रोव्हिजन केली आहे.

श्री महेंद्र मोरे (पूर्णिमा लॅब):  तुमचा दरवर्षी तीन लाख रुपये मोटर एक्सपेनसेस,  इन्शुरन्स आणि फ्युएलसाठी खर्च होत आहे. तुमचा फ्युएल खर्च एवढा आहे तर तुम्ही गाडी फक्त बीआरसीच्या आतच  वापरता की बाहेर पण वापरता? आणि त्याचे डिप्रिसिएशन पकडून 4 लाख 18 हजार आहे, त्यावर दर वर्षी खर्च होतो तसेच दोन लाख ड्रायव्हरची सॅलरी आहे. गाडीची कॉस्ट वीस लाख, तसेच तुम्ही सीए सुद्धा पुण्याचा निवडला आहे. सर्व डॉक्युमेंट ऑनलाइन होत नाही काही ऑफलाइन सुद्धा असतात. तुमचे को-ऑपरेटिव्ह कमिशनर सुद्धा पुण्याला असतात. मग त्या कामासाठी तुम्ही संस्थेची गाडी वापरता का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: गाडीचा वापर फक्त संस्थेच्या कामासाठी होतो. दुसरी गोष्ट सेक्रेटरी म्हणून सहकार आयुक्त पुणे यांच्याकडे जावे लागते तेव्हा मी माझी स्वतःची गाडी वापरतो. संस्थेची गाडी वापरत नाही. डेप्रिसिएशन येणारच आहे.  गाडीचा मेंटेनन्ससाठी आणि डिझेल. संस्थेची गाडी डिझेलवर आहे. संस्थेची गाडी रोज चालत असते. सभासदांच्या कर्जाची मागणी त्वरित पूर्ण करण्यासाठी दिवसातून चार चार वेळा आपण आरटीजीएस/ एनईएफटी करण्यासाठी मुंबई बँकेत जातो.

एक सभासद: सेक्रेटरी साहेब, तुम्ही म्हणता चार चार वेळेस जावं लागतं तर तुमची माणसं एकाच वेळी का जात नाही. मंदाकिनी ऑफिस मधून तुमचा माणूस एक फॉर्म एकावेळी घेऊन जातो. एक तास बसून 10 फॉर्म  घेऊन जाऊ शकत नाही का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हे सर्व सभासदांच्या सेवेसाठीच आहे. प्रत्येक सभासद येतो आणि मला दहा वाजेपर्यंत, बारा वाजेपर्यंत पैसे मिळाले पाहिजे असे सांगतो बँक सकाळी साडेअकरा वाजता उघडते.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: आपण बॅलन्सशीट वर बोलत आहोत. बाकी कुठच्याही विषयावर चर्चा होणार नाही. आत्ता साडेसहा वाजले आहेत. अजून पूर्ण अजेंडा बाकी आहे. आता मी कुठलाही प्रश्न घेणार नाही.

एक सभासद: मागच्या महिन्यात आम्ही मंदाकिनी ऑफिसमध्ये गेलो होतो. जे फॉर्म देतात त्याचे तुम्ही शंभर रुपये घेता त्यावेळी तिथे कोळी साहेब होते.त्यांच्याकडे फॉर्म मागायला आलेले त्याला कोळी साहेब काय बोलले? तुम्हाला लोनचं काय कळतं?  तुम्ही डीसीएसइएमवाले लोक,ही बोलायची काय पद्धत आहे का?

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: हा विषय बॅलन्सशीट वरचा नाही इतर विषयांमध्ये घ्या. आता नाही.

श्री राम परब (युईडी): अध्यक्ष साहेब, आता बिल्डिंग फंडचा जो विषय आहे, तो फंड मागच्या कमिटीने बनवला. आता तुम्हाला डिपार्टमेंटने सांगितलं का सोसायटीला बाहेर काढले जाईल हे तुम्ही क्लिअर करा.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): सर आधीचा विषय पूर्ण झाला नाही. आपण गाडीच्या विषयावर बोलत होतो. त्यांनी सांगितलं की आम्ही पर्सनल वापरासाठी गाडी वापरत नाही. मी तुम्हाला सांगू इच्छितो की 3 जानेवारी 2024 रोजी एका कर्मचाऱ्याच्या मुलाच्या लग्नासाठी गाडी बाहेर गेली होती. त्यात संचालक मंडळाचे सदस्य आणि कर्मचारी बसून गेले.हे कितपत योग्य आहे. आस्थापनेच्या कामाचा वेळ त्यांनी का वापरला? त्यांनी हाफ डे टाकला होता का? ते ओला, उबेर वापरून बाहेर जाऊ शकत होते. मग गाडीचा हा वापर पर्सनल नाही का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यावर आपली चर्चा झाली होती. तुम्हाला उत्तर दिलं होतं. आता हाऊसला पण उत्तर देतो. त्या दिवशी दादरला सोसायटीचं काम होतं, त्याच ठिकाणी कर्मचाऱ्याच्या मुलाचं लग्न होतं. स्टाफ कमी असल्यामुळे, कर्मचाऱ्यांच्या मुलाच्या लग्नाला जाण्यासाठी, कोणत्याही प्रकारची सुट्टी दिली नव्हती. कर्मचाऱ्यांनी लग्नाला जाण्यासाठी सुट्ट्या मागितल्या होत्या, पण आम्ही दिल्या नाहीत.

श्री महेंद्र मोरे (पूर्णिमा लॅब): दरवर्षी गाडीच्या मेंटेनन्सवर एवढा खर्च होणार का आणि फ्युएलवर पण एवढा खर्च होणार का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हा फक्त फ्युएलवर होणारा खर्च नाही आणि मेंटेनन्सचा खर्च मी आत्ता कसं सांगू शकणार?

श्री महेंद्र मोरे (पूर्णिमा लॅब): अध्यक्ष साहेब, गाडीवर मेंटेनन्स आणि फ्युएलसाठी एवढा खर्च व्हायला नाही पाहिजे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यामध्ये जो खर्च होईल तोच खर्च दाखवला जाईल.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेब, गाडीचा चुकीच्या ठिकाणी वापर केला आहे. दहा ते साडेचार गाडी बाहेर होती.

श्री यदुवीर सिंग (एच एल यु): अध्यक्ष साहेब. आपलं फायनान्शिअल इयर 31 मार्चला संपते पण आम्हाला अजून इंटरेस्ट मिळाला नाही. त्या इंटरेस्टवर जो इंटरेस्ट मिळतो तुम्हाला, तो तुम्ही कोणत्या हेड खाली दाखवता. तो इंटरेस्ट एप्रिलमध्ये मला मिळाला पाहिजे तुम्ही का देत नाही.

चेअरमन श्री हेमंत कोळी: गेल्या 63 वर्षात तुम्हाला मार्च एप्रिलमध्ये कधी व्याज मिळालं होतं का ?

श्री यदुवीर सिंग (एच एल यु): म्हणजे त्यांनी दिलं नाही म्हणून तुम्ही पण देणार नाही का?

श्री डी एन माने (ट्रान्सपोर्ट): अध्यक्ष साहेब, यदुवीर सिंग जो प्रश्न विचारतो तो अगदी बरोबर आहे. मार्च महिन्यापर्यंत जर आपलं फायनान्शियल इयर आहे तर मार्चपासून ऑगस्टपर्यंत सब्स्क्रिप्शनचे व्याज जर माझे 21हजार जमा आहेत तर त्या 21 हजारावर मला एप्रिल ते ऑगस्टचा इंटरेस्ट का देत नाही? त्यांचं  म्हणणं आहे गेली 63 वर्षे मिळाले नाही. मी असं म्हणतो की याच्यापुढे तुम्ही प्रयत्न करा की इंटरेस्ट एप्रिल महिन्यात देण्याचा.

चेअरमन श्री हेमंत कोळी: ठीक आहे. प्रयत्न करू.

श्री राजेश कळके (सीडीएम): अध्यक्ष साहेब, 31 मार्च 2024 ला तात्काळ बँकिंगमध्ये आपले 64 लाख 11 हजार आहेत आणि मी सोसायटीमध्ये गेलो 9 मे 2024 ला तेव्हा 1  कोटी 91 लाख 77 हजार 698 होते. तर ही तफावत कशी ते समजावून सांगा. मला वाटतं यावर श्री सुनील खाकसे चांगला प्रकाश टाकू शकतात.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आमच्या संचालक मंडळाने जेव्हा कारभार हातात घेतला तेव्हा  तात्काळ बँकिंग (गो कॅशलेस) यांच्याकडे ऑगस्ट 2022 च्या आसपास आपल्या संस्थेचे जवळजवळ पाच कोटी रुपये पडून होते.

श्री राजेश कळके (सीडीएम): तुम्हाला कोणत्या तारखेला लक्षात आलं की पाच कोटी बाकी आहेत म्हणून.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हे आम्हाला डिसेंबर 2022 च्या आसपास लक्षात आले.

श्री राजेश कळके (सीडीएम): तुमचं पहिलं पत्र गो कॅशलेसला कधी गेलं? 22 मार्च 2024 ला गेलं ना.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कळके साहेब, तुम्ही सर्व प्रश्न एकदाच विचारा.  नाहीतर मला उत्तर देऊ द्या.

श्री राजेश कळके (सीडीएम): ही तुमचीच पद्धत होती ना. तीच पद्धत माझी आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तात्काळ बँकिंग बरोबर बोलणं झालं, चर्चा झाली. ती चर्चा झाल्यानंतर एप्रिल महिन्यातच त्यांच्याकडून पाच कोटी रुपये संस्थेला परत मिळाले. त्यानंतर संस्थेने तात्काळ बँकिंगचे डे वन पासून रीकन्सिलेशनसुरू केलं. तात्काळ बँकिंगद्वारे लाखो ट्रांजेक्शन आहेत ते होण्यासाठी दीडवर्षाचा वेळ लागला. त्यामध्ये  रु.75 लाख आणि त्यांच्याकडे डिपॉझिट असलेले

रु.30 लाख असे त्यांच्याकडून येणे बाकी आहे. त्यासाठी संचालक मंडळाने त्यांच्याशी कम्युनिकेशन केलं. त्यांना लेटर पाठवलं. पण ते त्यांना रिसीव्ह झालं नाही मग त्यांचे नेटवर ऍ़ड्रेस शोधून त्या चार ठिकाणच्या ऍ़ड्रेसवर पुन्हा पत्र पाठवले. त्यापैकी दोन ठिकाणी ते रिसिव्ह झाले. त्यानंतर जुन्या संचालक मंडळाच्या कानावर घातलं.

श्री राजेश कळके (सीडीएम): सन 2022 ते 2024 पर्यंत व्याजाचं किती नुकसान झालं त्याबद्दल कोणाला काहीच नाही. भागडिया यांनी सांगितलं होतं लीगल ॲक्शन घ्या म्हणून. तेव्हा त्यांनी ती केली नाही. आणि आता त्या तात्काळ बॅंकेच्या मॅडम बोलतात 61 लाख 43 हजार अनट्रेसेबल आहेत. हा काय प्रकार आहे? डिजिटल युगात तुम्हाला एन्ट्री सापडत नाहीत ? हे ऑनलाईन ट्रांजेक्शन आहेत आणि हे कशासाठी केलं. यासाठी मडगावकरांनी एजीएमची परवानगी घेतली होती का? याची पूर्ण चौकशी झाली पाहिजे. खाकसे यांना पूर्ण माहिती आहे. त्यांनी सांगितलं होतं गो कॅशलेस असं काही करू नका कारण ही वन मॅन शो कंपनी आहे. जर त्यांची डेथ झाली तर प्रॉब्लेम होईल. आणि तसंच झालं त्यांची डेथ झाली. खाकसेचं बोलणं बरोबर होतं.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): अध्यक्ष महोदय, मी मगाशी पण या विषयावर बोललो. संस्थेचे गो कॅशलेसकडे जे काही पैसे आहेत ते पैसे रिकव्हर करणे हे खूप मोठे टास्क आहे. 1 कोटी 64 लाख त्यांच्याकडे आहेत. पाच कोटीची रिकव्हरी झालेली आहे. त्याबद्दल संचालक मंडळाचे अभिनंदन. परंतु लीगल टर्ममध्ये संस्थेचा एक रुपया जरी बुडाला तर कळके साहेबांची कळकळ सर्व सभासदांना समजायला हवी. कुठल्याही प्रकारची सभेची मान्यता न घेता अशा प्रकारचे काम केलेले आहे. त्यामुळे त्या पैशाची वसुली ही त्या संचालक मंडळाकडून व्हायला हवी.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): अध्यक्ष महोदय सभेच्या भावना लक्षात घेता मला वाटतं कमिटी वगैरे नको संचालक मंडळ, सभासद जे तुम्हाला योग्य वाटतात त्यामधून एक टास्कफोर्स गो कॅशलेस आणि टीडीएससाठी लवकरात लवकर बनवा. आणि ते तुम्ही सांगा मी लवकर बनवतो आणि सभासदांना आश्वासन द्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: टास्क फोर्स बनवायला सांगता पण मगाशी सांगितल्याप्रमाणे कमिटी बनवायची आहे.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): इथे श्रीराम सर आहेत. आमच्या सीएचएसएसचे reimbursementचे पैसे येत नव्हते तेव्हा टास्कफोर्स बनवल्या. त्या लोकांना सुट्टीमध्ये पण बोलवलं जायचं. त्यांनी आमच्या अडचणीचं निरसन केलं कारण लोकांना त्रास होत होता म्हणून माझी विनंती आहे की याच धरतीवर टास्क फोर्स बनवा आणि लवकरात लवकर त्यावर तोडगा काढा.

श्री प्रवीण सावंत: टीडीएसवर माझा एक प्रश्न आहे टीडीएस जे unrecovered पेमेंट आहे ते रिकव्हर होत नसतील तर त्यामधून हे काढून टाका पुढच्या बॅलन्सशीट मध्ये येता कामा नये.

श्री राजापुरे (डीआरएचआर): फक्त काढून टाका म्हणजे एक फिगर डिलीट करायचं का? संस्थेचं 18 लाखाचे नुकसान कोण भरणार?

श्री अरुण कोळी (सीडीएम): पान नंबर 45 वर 'इतर येणे' यामध्ये गेल्या वर्षीची फिगर यावर्षी कॅरी फॉरवर्ड झालेली दिसत आहे. गेल्या वर्षीची फिगर आणि यावर्षीची फिगर सेम आहे तर हे काय आहे ते सांगा आणि 'टीडीएस ऑन कॅश विड्रॉल' म्हणजे काय ते सांगा.

श्री आर के मोरे - व्यवस्थापक: पान क्रमांक 45 वर टीडीएस ऑन कॅश दाखवला आहे. आता इन्कम टॅक्सचा नियम बदलला आहे. कॅश विड्रावलसाठी आधी एक कोटीची परवानगी होती आता तीन कोटीची परवानगी आहे. यावर्षी आमची तीन कोटीच्या वर विड्रॉल गेलीच नाही म्हणून ती आधीच्या वर्षाची आहे. यावर्षी फिगर 14 लाख 64 हजार 52 अशीच कॅरी फॉरवर्ड झालेली आहे.

श्री अरुण कोळी (सीडीएम): मला हे समजत नाही बॅलन्सशीटवर ते येणं बाकी आहे, मग काय केलं त्याचं?

श्री आर के मोरे (व्यवस्थापक): हो, येणे बाकी आहे. या सर्व फिगरवर आम्ही सीए यांच्याशी चर्चा केली. ते म्हणाले जोपर्यंत आपल्या इन्कम टॅक्सच्या केसेस कोर्टात चालू आहेत तोपर्यंत आपण इन्कम टॅक्सला पेमेंट करणे लायबल आहोत.जोपर्यंत या केसेस बंद होत नाही तोपर्यंत क्लेम करण्यासाठी अलाऊ नाही.

श्री अरुण कोळी (सीडीएम): तुम्ही मागील काही काळामध्ये रोख रक्कम देत नव्हता, मग आता हे सुरू केल्यामुळे प्रॉब्लेम आला आहे का?

श्री आर के मोरे (व्यवस्थापक): हो, कॅश विड्रॉ झाली. त्यावर संस्थेला 2% टीडीएस लागला. यावर्षी कॅश विड्रॉलवर बराच कंट्रोल ठेवला. सभासदांनीही सहकार्य केलं आणि आपली कॅश विड्रॉवल तीन कोटीच्या वर गेलीच नाही त्यामुळे यावर्षी यावर टीडीएस लागला नाही.

श्री अरुण कोळी (सीडीएम): मागे तो 9 लाख 52 हजार होता तो वाढलेला आहे. त्यामुळे असं म्हणू नका टीडीएस लागला नाही.

श्री आर के मोरे- व्यवस्थापक: गेल्या वर्षात त्याची वाढ झाली.

श्री अरुण कोळी (सीडीएम): मोरे साहेब, तुमच्या काळात तुम्ही पूर्ण कॅश बंद केलीत. कोणालाही कॅश देत नव्हता. मग कॅश न देता तुम्ही एवढा टीडीएस कसा भरला? हा माझा प्रश्न आहे कॅश देणे बंद केल्यावर तुम्हाला एवढा टीडीएस लागला कसा?

श्री आर के मोरे (व्यवस्थापक): मागच्याच्या मागच्या वर्षी बॅलन्सशीट मध्ये टीडीएस लागला आहे.

श्री अरुण कोळी (सीडीएम): मागच्या वर्षात पण 9 लाख होता. मग तो कसा वाढला?

श्री आर के मोरे (व्यवस्थापक): गेल्या वर्षाच्या बॅलन्सशीटमध्ये 2022-23च्या ओपनिंगला 9 लाख 52 हजार आहेत. गेल्या वर्षी 14 लाख 64 हजार. त्या वर्षामध्ये कॅश विड्रॉअल जास्त झाली.

श्री अरुण कोळी (सीडीएम): तुम्ही असं म्हणा की, सभासदांना कॅश न देता जास्त कॅश विड्रॉ झाली हे सांगा.

श्री आर के मोरे (व्यवस्थापक): असं नाही साहेब. सभासदांना देण्यासाठी कॅश विड्रॉ केली.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कोळी साहेब, टीडीएस लागलेला आहे. कॅश पूर्ण वर्षभर बंद केली नव्हती. एक-दोन महिनेच फक्त बंद केली होती. त्यानंतर सभासदांचे एवढे प्रेशर आले म्हणून परत कॅश देणं चालू केलं. पण एक-दोन महिने कॅश देणे बंद केले होते.

श्री अरुण कोळी (सीडीएम): तुम्ही कॅश देणं काही महिने बंद केलं होतं तर तुम्हाला एवढा टीडीएस लागला कसा?

श्री महेंद्र मोरे (पूर्णिमा लॅब): अध्यक्ष साहेब, यावर्षी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी पाच लाखाची तरतूद केली आहे. यावेळी कुठलीही आपत्ती नाही मग ही प्रोव्हिजन कशासाठी केली आहे. मागच्या तीन वर्षात केली नव्हती.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: ती फक्त एक तरतूद करून ठेवली आहे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: आता हा बॅलन्सशीटवरचा शेवटचा प्रश्न आहे. जर असंच चालू राहिलं तर आजची मीटिंग आपल्याला तहकूब करता येणार नाही. अजून दहा विषय आपल्याला पूर्ण करायचे आहेत.

श्री राजेश कळके (सीडीएम): अध्यक्ष साहेब, माझा व्हेईकलवर प्रश्न आहे. पान क्रमांक 45 फ्युएल साठी15000 दाखवले आहेत.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आपण जे डिझेल भरतो त्याकरता आपण कॅश देतो. संचालक मंडळाने एक निर्णय घेतला होता की आपण एक कार्ड घेऊ आणि त्या कार्डमधून डिझेलचे पेमेंट करू. त्याप्रमाणे कार्ड घेतलं परंतु ते कार्ड चाललं नाही. त्याची ही रिटर्न एंट्री रु.15,000/- आहे.

श्री राजेश कळके (सीडीएम): स्कॉर्पिओ गाडीची जी टँक आहे ती 50 लिटरची असेल आणि डिझेलची किंमत शंभर रुपये प्रतिलिटर पकडले तर 5500 इतका खर्च येतो तर पंधरा हजार कसे खर्च केले?

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: कळके साहेब, सेक्रेटरीनी सांगितलं की आपण कॅशमध्ये डिझेल भरतो. आम्ही संचालक मंडळांनी निर्णय घेतला की डिझेलसाठी कॅश व्यवहार चांगला नाही. म्हणून गेटच्या बाहेर जो एचपीचा पेट्रोल पंप आहे ते एक कार्ड देतात. त्यामध्ये ती रक्कम होती. सेम अकाउंटमध्ये चुकीचे क्रेडिट झाले म्हणून ती यावर्षी रिटर्न आली. ते डिझेलचे पैसे नाहीत. डिझेलसाठी असलेला फंड पान क्र.45 वर दिलेला आहे.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी):अध्यक्ष साहेब, या अहवालाला अजून वेळ लागेल. विषयपत्रिकेवर अजून विषय आहेत, ते आम्ही तुम्हाला दहा मिनिटात पूर्ण करून देऊ.

श्री धेंडे (डीसीएसईएम): माझा प्रश्न आहे, आता धोत्रे जे बोलले, फॉर्मचे किंमतबाबत माझी एक विनंती आहे सभागृहाला फॉर्मचे पैसे घ्यायचे की नाही?

श्री राजापुरे (डीआरएचआर): तुम्ही कर्जावरील व्याज कमी करा. फुकट काही देऊ नका.

श्री विलास घोरपडे (एएफडी): आपण अहवालावर चर्चा करू बाकी विषय इतर विषयांमध्ये घेऊ.

श्री संतोष कांबळे (ईआरएमएस): अध्यक्ष साहेब, अहवालावर खूप चर्चा झाली. अहवाल पास करण्यासाठी मी याला सूचक देतो.

श्री विलास घोरपडे (एएफडी): अहो यावर अजून प्रश्न आहेत फक्त सूचक झाला आहे. अहवालावर अजून प्रश्न आहेत. जमा खर्च, उत्पन्न यावर चर्चा केल्यानंतर यांचा जो खर्च आहे त्यावर नियंत्रण आणण्यासाठी आपण चर्चा करावी आणि तुम्ही जर का अहवाल असाच पास करत असाल तर यावर्षी 70 लाखाचे बजेटआहे, पुढच्या वर्षी 90 लाखाचं याचा अर्थ तुम्ही याला अशीच मान्यता देत आहात. यावर्षी निव्वळ नफा 15 कोटी झाला. तुम्ही सभासदांच्या खिशातून हा पैसा काढत आहात. तुम्ही खर्च खूप करत आहात. तुम्ही खर्चाचे प्रमाण कमी करा आणि व्याजदर कमी करा. आज हा जो 75 कोटी, 100 कोटी असा जो फुगीर आकडा आहे हा कमी करण्याचा प्रयत्न करा असं माझं पूर्ण सभागृहातून तुम्हाला आवाहन आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: घोरपडे साहेब, हाच प्रयत्न सुरू आहे. पुढच्या वर्षी तुम्हाला कर्जावरील व्याजदर कमी झालेले दिसतील.

श्री विलास घोरपडे (एएफडी): आपल्या ज्या ठेवी आहेत त्या 12 कोटी 52 लाखने कमी झालेल्या आहेत. यावर तुम्ही विचार करा की ठेवी कशा वाढतील कारण तुम्ही म्हणत आहात की आपले सभासद सेवानिवृत्त होत आहेत.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: त्यासाठीच आपण अर्थवृद्धी ही स्कीम सुरू केली आहे.आपल्या बाकीच्या ज्या स्कीम आहे त्यामध्ये आपले इथले जे सभासद आहेत तेच फक्त या स्कीम घेत

होते. पण आता आऊट स्टेशनचे सभासद सुद्धा या स्कीममध्ये सहभागी होतील. म्हणून ही स्किम चालू केली आहे. पगारातून कपात होणारी स्कीम आहे.

श्री ढोबळे (डीसीएसईएम): तुमचा अजेंडा काय आहे, विषय काय आहेत ते आम्हाला काहीच माहित नाही. कारण आम्हाला डीसीएसईएम इथे अहवाल मिळाला नाही. मला विचारायचे आहे की तुम्ही अहवाल कधी वाटता हे आम्हाला माहीत नसतं. आम्ही मेंटेनन्सवाले आहोत साइटवर असतो. तुम्ही मत मागताना आमच्यापर्यंत येता. बाकीच्या कामासाठीपण येता. मग अहवाल आमच्यापर्यंत का येत नाहीत? चेंबूर, ओवायसी, टीआयएफआर या ठिकाणी अहवाल येत नाही. एजीएम झाल्यानंतर तुम्हाला येऊन प्रश्न विचारायचे का? तुम्ही काय केलं हे आमच्यापर्यंत पोहोचत नाही, मग आम्ही तुम्हाला प्रश्न काय विचारणार आणि काय लेटर देणार?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तुमची सूचना योग्य आहे. अहवाल डिजिटल फॉर्म मध्ये व्हाट्सअप ग्रुपवर पाठवला होता.

श्री ढोबळे (डीसीएसईएम): हे माझं व्हाट्सअप आहे यावर कुठे आहे अहवाल? सोसायटीकडे माझा व्हाट्सअप नंबर आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: व्हाट्सअप ग्रुपवर पाठवला आहे.

श्री ढोबळे (डीसीएसईएम): याचा अर्थ तुम्ही मला ग्रुपमध्ये ॲड केलेलं नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: संस्थेच्या वेबसाईटवर पण अहवाल उपलब्ध आहे.

श्री ढोबळे (डीसीएसईएम): मोबाईलवर, वेबसाईट पाहायला,आम्ही सर्व एम्प्लॉयी शिकलेले नाही आहोत. तुम्ही अहवाल का छापता? यांच्याकडे अहवाल आहेत, जर तुम्ही डिजिटल केले तर मग डिजिटलवरच का नाही आलं हे? तुम्ही म्हणणार की अहवाल सोसायटी ऑफिसमध्ये ठेवलेत; परंतु आम्ही साइटवरून तुमच्या ऑफिसमध्ये यायचं का अहवाल घेण्यासाठी? आम्ही काम करायचं की तुमच्या ऑफिसमध्ये यायचं?

चेअरमन श्री हेमंत कोळी: ठीक आहे. पुढच्या वर्षी आम्ही सर्वांपर्यंत अहवाल पोहोचवू. सर्वांना अहवाल मिळेल याची गॅरंटी मी देतो.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेब, सेक्रेटरी साहेबांनी सांगितलं की सर्व गोष्टी वेबसाईटवर आहेत. आपल्या अहवालाच्या छपाईसाठी जी निविदा निघाली ती आपल्या वेबसाईटवर दिसत नाही. याचेही टेंडर निघालं की नाही अशी मला शंका येत आहे. नंतर या गोष्टी बॅक डेटेट होतात. आणि हे अहवाल छपाईचे काम सुद्धा ह्यांनी त्याच व्यक्तीला दिले आहे ज्यांनी डायऱ्या छापल्या

आहेत. पुन्हा तीच तुम्ही आता इथे डिस्प्ले वर लावा. सभासदांना दिसू द्या की यांनी टेंडर वेबसाईटवर टाकलेलं आहे की नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हे टेंडर संस्थेच्या नोटीस बोर्डवर लागलं होतं.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): म्हणजे पुन्हा तुम्ही चुकीचं काम केलं आहे. कोणता वेंडर बीएआरच्या आतमध्ये टेंडर बघायला येतो? हे वेबसाईटवर टाकायचं होतं. त्याच डायरीवाल्या व्यक्तीला यांनी अहवाल प्रिंटिंगचंही काम दिलं. म्हणजे ही परत चुकीची गोष्ट केली.

श्री राजेश कळके (सीडीएम): क्युब पार्टनरची चौकशी करा. या गडबडीत त्यांनी 5000 कॉपी छापलेल्या होत्या आणि आत्ता 10,000 कॉपी छापलेल्या आहेत. तरीसुद्धा काही सभासदांकडे अहवाल पोहोचला नाही.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेब, तुम्ही वेबसाईट डिस्प्ले करा सभासदांना दिसायला पाहिजे. नाहीतर हे लोक पुन्हा तेच करणार. अध्यक्ष साहेब, हे खूप मोठे करप्शन आहे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: वाडेकर, हा विषय आपण इतर विषयांमध्ये चर्चेला घेऊ. आता आपण अजेंडाप्रमाणे जाऊया.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): माझी फक्त एकच रिक्वेस्ट आहे की एकदा सभासदांना कळूदे की हे टेंडर त्या वेबसाईटवर नव्हतं. म्हणून एकदा डिस्प्ले करा इथे. यामध्ये जो स्कॅम झाला आहे तो स्कॅम सर्व सभासदांना समजू द्या.

**विषय क्र. 4: सन 2023-24 या आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.**

श्री विलास घोरपडे (एएफडी): माझा नफा विभागणीवर प्रश्न आहे. तुमच्या जाहीरनाम्यामध्येहोतं की आम्ही मानधन घेणार नाही. मानधन झिरो करणार. बजेटमध्ये मीटिंग भत्ता आठ लाख दहा हजार आहे. आता मला तुम्ही सांगू नका की मानधन आणि अलाउन्समध्ये काय फरक आहे ते. 'आमचं संचालक मंडळ कोणतेही मानधन घेणार नाही' असं तुम्ही म्हणाला होतात, तर मग हे आठ लाख दहा हजार रुपये काय आहे? तुमचा जो जाहीरनामा आहे की आम्ही मानधन घेणार नाही त्याबद्दल सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आमचं संचालक मंडळ कोणत्याही प्रकारचे मानधन घेणार नाही आणि आमच्या संचालक मंडळाने ते मानधन सोडले आहे. मीटिंग भत्ता डे वन पासून सचालक

मंडळ घेत आहे. त्यानंतर जुलै 2024 मध्ये सहकार खात्याचे एक परिपत्रक आलं आणि त्याप्रमाणे संचालक मंडळाने रुपये दोन हजार मीटिंग भत्ता घ्यायला सुरू केली. कोणतेही मानधन घेतले नाही.

श्री विलास घोरपडे (एएफडी): कोणतेही मानधन म्हणजे काय ? त्यात मीटिंग भत्ता पण आला. मी तुम्हाला यावर पत्र दिलं की तुम्ही शासनाच्या कोणत्या पत्रकानुसार मानधन घेत आहात? त्या पत्रकाची मला छायांकित प्रत मिळावी. मला प्रत न देता त्या परिपत्रकाची फक्त तारीख तुम्ही मला दिली. ते परिपत्रक कुठे आहे ते परिपत्रक तुम्ही वाचून दाखवा.

श्री राजेश कळके (सीडीएम) : घोरपडे साहेबानी जो मुद्दा उचलला तो बरोबर आहे. सेक्रेटरीने जे उत्तर दिलं ते पण बरोबर आहे. पण असं काही गरजेचं नाही की चारशे रुपयांवरून तुम्ही एकदम दोन हजार रुपये मानधन करावे.

श्री विलास घोरपडे (एएफडी): परिपत्रकात काय लिहिले आहे तुम्ही वाचा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: राज्य क्षेत्रात असलेल्या किंवा 100 कोटी व त्यापेक्षा अधिक खेळते भाग भांडवल असलेल्या सर्व सहकारी संस्था.

श्री विलास घोरपडे (एएफडी): या तक्त्यामध्ये आपली पतसंस्था कोणत्या तक्त्यात बसते याचा विचार केला नाही. आता तुम्ही जे काही वाचून दाखवलं त्यात आपली संस्था बसत नाही. आपली संस्था राज्यक्षेत्रीय नाही. ते शंभर कोटी वगैरे सर्व मला मान्य आहे. पण पहिला जो शब्द आहे 'राज्यक्षेत्रात असलेल्या' त्यामध्ये आपली संस्था मोडत नाही.

श्री राजेश कळके (सीडीएम): एवढं करूनही तुमच्या चाणाक्ष नजरेतून कोटेशन गेलं कसं? तुम्ही दोन हजार भत्ता घेता आणि अशी कामे करता.

श्री अरुण कोळी (सीडीएम): तुम्ही आपल्या संस्थेचा उपविधी 5 अ वाचून दाखवा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: उपविधी 5 अ- रुपये 50 लाख व त्यावरील खेळते भाग भांडवलकरिता अशा सर्व इतर संस्था.

श्री अरुण कोळी (सीडीएम): यामध्ये आपली सोसायटी मोडते. तुम्ही राज्याचे नाही आहात. तुमचा उपविधी हा कोण sanction करतो.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सहकार आयुक्त पुणे.

श्री अरुण कोळी (सीडीएम): जर सहकार आयुक्त पुणे तुमचा उपविधी पास करतो जिल्हा उपनिबंधक पास करत नाही. मला सांगा तुम्ही उपविधी कधी मल्होत्रा हाऊसला पाठवला आहे का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: नाही पाठवला.

श्री अरुण कोळी (सीडीएम): नाही पाठवला. कधी उपविधी कोकण भवनला  पाठवला का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: नाही पाठवला.

श्री अरुण कोळी (सीडीएम): तुम्ही उपविधी पुण्याला का पाठवता ? कारण तुमची संस्थाही पूर्ण भारत देशात आहे ही राज्याची संस्था नाही हे लक्षात घ्या. तुम्हाला उपविधी पाच अ प्रमाने त्यात तुम्ही मानधन घ्यायला पाहिजे हे तुम्ही जास्त मानधन कसे घेतलं.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: या उपविधीमध्ये मीटिंग भत्ता रु.300/- लिहिला आहे आणि तुम्हालाही माहित असेल की 400 रुपये मीटिंग भत्ता मिळत होता.

श्री अरुण कोळी (सीडीएम): अहो या तक्त्यामध्ये मेंशन केला आहे दैनंदिन भत्ता (अ) महानगरपालिका क्षेत्रासाठी, मुंबई महानगर क्षेत्रासाठी मुंबई महानगरपालिका कशात येते उपविधी क्रमांक चार मध्ये काय आहे ते आम्हाला सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: रुपये 900/-

श्री अरुण कोळी (सीडीएम): हा जास्तीत जास्त रुपये 900/- आहे कमीत कमी नाही. पण तुम्ही संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे. माझं काहीच म्हणणं नाही. पण याउपविधी मध्ये काय आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कोळी साहेब हे जे कॅल्क्युलेशन तुम्ही दाखवलं ते आपण तज्ञांना किंवा सीएना विचारू.

श्री अरुण कोळी (सीडीएम): या गोष्टी करताना तुम्ही हाऊसची परवानगी का घेतली नाही?

श्री धोत्रे (सीडीएम): हा जो तुम्ही बैठक भत्ता घेतला जो रुपये 470/-  आहे तो तुम्ही 2000/- रुपये घेतला. यामध्ये काय सांगितलं की दोन हजार रुपये घेऊ शकता पण हे ऐच्छिक आहे. आपल्या अजेंडाप्रमाणे तुम्ही 470/-  ऐवजी 400/-  रुपये किंवा 500/- रुपये करा. पण एकदम 2000/- रुपये तुम्ही केला.  हे चुकीचं आहे.

श्री  धेंडे (डीसीएसईएम): तुम्ही जे 470 आहे त्यावर तुम्ही चारशे रुपये घ्या आणि बाकीचे तुम्ही जे स्वीकारले आहे ते रिफंड करा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कोळी साहेब, यावर आपण खुलासा मागवूया आणि ज्यामध्ये आपण बसतो त्याप्रमाणे बैठक भत्ता घेऊ.

श्री अरुण कोळी (सीडीएम): हे सर्व मीटिंग भत्ता  घेण्यापूर्वी विचार करायला हवा होता तुम्ही.

मानद सचिव शिवाजी हगवणे: संचालक मंडळाच्या मीटिंगमध्ये त्या परिपत्रकातील तक्त्याचा जो अर्थ निघाला त्यावर खुलासा मागवणे खूप महत्त्वाचे आहे.

श्री ढोबळे (डीसीएसईएम): तुम्ही बोलता हे सर्व बरोबर आहे. तुमच्या अजेंडाप्रमाणे तुम्ही काय बोलला आम्ही काही सुद्धा घेणार नाही. जर मानधन घेणार नाही असं तुम्ही मान्य केलंय तर तुम्ही 400 रुपयाचे पाच पट वाढवून तुम्ही भत्ता घेत आहात. तुम्ही आज हे मान्य करा की आम्ही एवढेच घेतो आणि बाकीचे परत करतो. संस्थेला परत करायला काय फरक पडतोय. आणि तुम्ही परत देणार तर ते व्याजासहित द्यायला पाहिजे. जसं तुम्ही आमच्याकडून दर महिन्याला व्याज घेता तसे तुम्हीही द्या.

श्री डी ए माने (ट्रान्सपोर्ट): अध्यक्ष साहेब मी विद्यमान कमिटीला एक विनंती करतो सभागृहाचा आदर ठेवून तुम्ही जो 470 रुपये मीटिंग भत्ता घेत होता तोच घेण्यात यावा.

श्री धेंडे (डीसीएसईएम): आणि असा ठराव करा की आम्ही फक्त 470/- रुपये घेऊ आणि बाकीचे घेतलेले पैसे रिफंड करू.

विषय क्रमांक दोनवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर खालील प्रमाणे ठराव पासकरण्यात आला

**ठराव क्र.2: ठराव पास करण्यात आला की, 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय वैधानिक लेखापरीक्षित ताळेबंद, नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

सूचक : श्री संतोष कांबळे (ई आर एम एस)

अनुमोदक : श्री दिगंबर पाटील (ई एम ई डी)

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

मानद सचिवांनी विषय क्रमांक तीन वाचून दाखवला.

**विषय क्र.3: सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.**

श्री विलास घोरपडे (एएफडी): माझा नफा विभागणीवर प्रश्न आहे. तुम्ही सभासद कल्याण निधीमध्ये जे पैसे वाढवले आहेत ते कमी करून विक्रम कर्ज संरक्षण योजनेमध्ये वर्ग करावेत. तुम्ही सभासद भविष्य सहाय्य निधीचा किती टक्के बोनस दिलेला आहे?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: 6% बोनस दिला आहे.

श्री विलास घोरपडे (एएफडी): आम्हाला असा 6% बोनस दिसत नाही आणि कॅल्क्युलेशन केल्यानंतर 5.8% एवढा येत आहे.

श्री आर के मोरे- व्यवस्थापक: जे सभासद या योजनेमध्ये सहभागी आहेत त्यांचे मंथली प्रोडक्टमध्ये बोनस कॅल्क्युलेशन केलेले आहे आणि ते बरोबर आहे त्यानुसार

**ठराव क्र.3: ठराव पास करण्यात आला संचालक मंडळाने खालील प्रमाणे सुचविलेल्या**

| | | |
|---|---|---|
| **नफा रु.4,98,76,524/-वर10% गंगाजळी** | **रु.** | **49,87,652.00** |
| **भाग रकमेवर 15% लाभांश** | **रु.** | **4,25,94,258.00** |
| **बोनस - सभासद भविष्य सहाय्य निधी** | **रु.** | **14,85,501.00** |
| **सहकारी प्रशिक्षण** | **रु.** | **5,00,000.00** |
| **शिल्लक नफा पुढील वर्षासाठी वर्ग केला** | **रु.** | **25,18,962.00** |
| | **रु.** | **5,20,86,373.00** |

**सन 2023-2024या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीस सभागृहाने सर्वानुमते मंजुरी दिली.**

सूचक : श्री विलास घोरपडे (ए एफ डी)

अनुमोदक : श्री अरुण कोळी (सी डी एम)

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

विषय क्रमांक 4 मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सन 2023-24 या वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन 2024-2025 या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने मांडलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

श्री अरूण कोळी (सीडीएम):आता तुम्ही मागील वर्षीच्या अहवालातील विषय क्रमांक 4 वाचून दाखवा या दोन विषयांमध्ये तफावत का आहे?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आजपर्यंत आपल्याकडे मागच्या रिपोर्ट प्रमाणेच अंदाजपत्रक मांडत होतो. पण आता नियमांमध्ये जो बदल झाला त्याप्रमाणे अंदाजपत्रकात कमी जास्त मंजुरी घेऊन ते कम्पॅरिटीव्ह पद्धतीने सभासदांपर्यंत गेले पाहिजे असं आहे.

श्री अरूण कोळी (सीडीएम): पण याचा अर्थ काय हे सभागृहाला समजावून सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आपण अंदाजपत्रकाचे जे कम्पॅरिटीव्ह स्टेटमेंट बनवलं त्यामुळे अंदाजपत्रकात सुस्पष्टता दिसून येते. गेल्या वर्षी जे बजेट मांडलं होतं त्यामध्ये आपले खर्च कमी झाले की जास्त झाले याची स्पष्टता येते त्यामुळे पुढल्या वर्षी खर्च करत असताना त्यामध्ये अचुकता येते.

श्री अरूण कोळी (सीडीएम): तुम्ही या वर्षाचे बजट दिलेलं आहे पण ते बनवताना तुम्ही जर उपविधी दुरूस्ती झाली तर त्यामुळे बजेटमध्ये किती बदल होईल याचा विचार केला का? तुम्ही दोन अमेंडमेंट आणल्या आहेत जर संचालक मंडळाचा मानस होता की या उपविधी मंजूर होतील तर बजेटमध्ये तुम्हाला तशी प्रोव्हीजन करायला हरकत नव्हती.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: या वर्षी आपण उपविधी दुरुस्तीमध्ये शेअर्सची रक्कम 30,000/- पर्यंत बनवली आहे. जर हे पास झालं तर या बजेटला अर्थ राहणार नाही, असा तुमचा प्रश्न आहे ना. याचे उत्तर मी देतो की यावर्षी जरी उपविधी पास झाली तर त्याची अंमलबजावणी 1 एप्रिल 2025 पासून लागू होईल. म्हणून हे पुढच्या वर्षाच्या अहवालामध्ये येणार. हाऊसने ही उपविधी मंजूर केली तर पुढल्या वर्षीच्या अंदाजपत्रकात ते येईल.

श्री अरुण कोळी (सीडीएम): पण उपविधी दुरुस्तीमुळे आणखी काही बदल होतील. तुम्ही सभासद वर्गणीवर व्याज देणार आहात.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आता असलेली अमेंडमेंट पास झाल्यानंतर यावर्षी जी सभासद वर्गणी आहे ती तशीच राहणार आहे पुढल्या वर्षी 1 एप्रिल 2025 नंतर हे पैसे शेअर्समध्ये ट्रान्सफर होणार. आता आपले 15,000/- शेअर्स आहे. 15,000/- वर डिव्हीडंट हे यावर्षीच्या बजेटमध्ये आहे. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये 1 एप्रिल 2025 ला आपले शेअर्स 30,000/- झाले असेल त्यावेळी ती बदलणार आहे. आपल्या 64 व्या वार्षिक अहवालामध्ये ते दिसणार आहे.

श्री अरुण कोळी (सीडीएम): पान क्रमांक 59 वर तुम्ही बजेटमध्ये प्रोफेशन फीची प्रोव्हिजन केली आहे दहा लाख आणि एक्सपेंडीचरमध्ये खर्च आहे 20 लाख 40 हजार. म्हणजे तुम्ही खर्च केल्यानंतर आमच्याकडून मंजुरी घेता. 20 लाख 40 हजार हे डबल आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: साहेब खर्च आणि लायबिलिटीमध्ये फरक आहे. आपण बजेटमध्ये मंजूर केलं होतं तेव्हा आपल्याला अंदाज नसतो की यावर्षी आपल्याला किती खर्च येईल.

श्री अरुण कोळी (सीडीएम): आता शेवटचा कॉलम बघा. त्यात लीगल एक्स्पेंडीचर काय प्रोव्हीजन केली 5 लाख रुपये. जर 5 लाख तुम्ही एजीएम एक्स्पेंन्सेस घेणार आहात तर त्यामध्ये कुठला खर्च टाकणार आहात?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यामध्ये ऑडिटरांचे सजेशन आले होते की एजीएम एक्स्पेंडीचर हा अतिशय मोठ्या प्रमाणात दिसतो म्हणून प्रत्यक्षात खर्च हा या मेंबर वेलफेअर फंड या ठिकाणी दाखवा.

श्री संतोष के. बी. (सीडीएम): अध्यक्ष साहेब, तुम्ही आता सांगितलं की एजीएम एक्स्पेंडीचर रुपये 5 लाख पुढच्या वर्षासाठी प्रोव्हिजन करता. तुम्ही मिस्लेनिअस एक्स्पेंडीचरमध्ये पण एजीएम

एक्स्पेंडीचर 5 लाख प्रोव्हीजन केली आहे. आता या दोन्ही ठिकाणी एकाच  हेडसाठी 10 लाख प्रोव्हिजन कशी केली?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: एका ठिकाणी प्रोव्हीजन आहे म्हणजे यावर्षी रुपये पाच लाख बाजूला काढून ठेवले आहेत. ते काढून ठेवलेले जे पाच लाख आहेत ते पुढल्या वर्षी खर्च करायचे आहेत.

श्री संतोष के बी (सीडीएम): मग हे बजेटमध्ये पास कशाला करता? तुम्ही जे मागत आहात ते काय आहे? ते एक्स्पेंडीचर नाही आहे. तुम्ही 5 लाख बजेट प्रोव्हिजन करत आहात

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे; मागच्या वर्षी पण तुमचा याच टाईपचा प्रश्न होता. त्यावर मी सांगितलं होतं आता पण तेच सांगतोय पाच लाख प्रोव्हीजन मध्ये काढले हे पुढल्या वर्षीची प्रोव्हिजन आहे.

श्री संतोष के बी (सीडीएम): तुम्ही प्रोविजन दोन ठिकाणी कसे करू शकता? तुम्ही हाऊसला मिस गाईड करू नका.

श्री राजापुरे (डीआरएचआर): सेक्रेटरी साहेब, तुम्ही चुकीचे उत्तर देत आहात. प्रोव्हिजन मिस्लेनिअसमध्ये असू द्या किंवा प्रोव्हीजनमध्ये असू द्या. ते फायनान्शिअल इयर 2024-25 करता आहे. तुम्ही  ते कुठेही दाखवा आणि ते पण चुकीची प्रोव्हीजन करत आहात कारण गेल्या वर्षी 25 ते 26 लाखाची प्रोव्हिजन करता आणि आता फक्त 5 लाखाची करता. खर्च कमी होणार नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: एजीएमचा खर्च हा यावेळी मेंबर वेलफेअर फंड खाली प्रोव्हीजन केली आहे आणि हे वैधानिक लेखपरीक्षणाच्या वेळी लेखपरीक्षकानी केलेल्या मार्गदर्शनानुसार केले आहे.

श्री राजापुरे (डीआरएआर): तुम्ही तशी प्रोविजन केली, सीएच्या मार्गदर्शनानुसार केले आहे.

मानद सचिव शिवाजी हगवणे: मेंबर वेलफेअर मध्ये प्रोव्हिजन केली आहे ती 2 कोटी 20 लाख आहे. त्यामध्ये ही प्रोव्हिजन आहे.

श्री राजापुरे (डीआरएचआर):आतापर्यंत आपला ऑडिटरचा खर्च 7 लाख पर्यंत होत होता यावेळी तुम्ही 13 लाखाची प्रोव्हिजन केली आहे. जवळजवळ 80% वाढ केली. गेल्या वर्षी दहा लाखाची प्रोव्हिजन केली परंतु खर्च सात लाख आला.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: वैधानिक लेखापरीक्षकांच्या फीची प्रोव्हिजन ही गव्हर्मेंटच्या परिपत्रकानुसार करावी लागते. पुढल्या वर्षी गव्हर्मेंटचे चार्जेस काय आहेत ते आपल्याला माहित नाही.

श्री राजापुरे (डीआरएचआर):गव्हर्नमेंटचा फी चा  रेट काय आहे ते सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: पहिल्या दहा कोटीसाठी पाच पैसे, वीस कोटी ते शंभर कोटीसाठी दोन पैसे आणि शंभर कोटीपेक्षा कितीही असेल तर त्यासाठी एक पैसा असा आहे. टर्न ओव्हर जसा वाढत जातो तशी ती वाढत जाते.

श्री राजापुरे (डीआरएचआर):त्याप्रमाणे हे कॅल्क्युलेशन बरोबर आहे का?  तुम्ही स्टाफ ग्रॅच्युईटीमध्ये गेल्या वर्षी 10 लाखाची प्रोव्हिजन केली आणि खर्च 13 लाख 5000 आला. यावर्षी तुम्ही 23 लाखाची प्रोव्हिजन केली म्हणजे दहा लाख जास्त. एवढी प्रोव्हीजन तुम्ही कोणत्या बेसवर केली. ग्रॅच्युइटी ही बेसिक प्लस डीए यावर असते. माझ्या माहितीप्रमाणे दरवर्षी 10 ते 13%  डीए वाढ होते,  जर 13% नी वाढ होऊ शकते तर मग 13 लाखावरून 23 लाख कसे झाले?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: राजापुरे साहेब, आपल्या पतसंस्थेचे कर्मचारी आहेत त्यांच्या पुढल्या वर्षी सेवानिवृत्ती आहेत आणि म्हणून ही प्रोव्हीजन केलेली आहे.

श्री राजापुरे (डीआरएचआर):हेच उत्तर तुम्ही मागच्या वर्षी सुद्धा दिलं. तेव्हा पण तुम्ही 9 लाखावरून 26 लाखाची प्रोव्हिजन केली होती.  त्यानुसार मी विचारलं त्यावर तुमचे उत्तर होतं की जुनी कमिटी चुकीच्या पद्धतीने ग्रॅच्युईटीचे कॅल्क्युलेशन करत होती. ऑडिटरने सांगितलं त्याप्रमाणे कॅल्क्युलेशन केलं म्हणून हा डिफरन्स आला हे आम्ही त्या वर्षी मान्य केलं.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: ही प्रोव्हीजन आहे. प्रत्यक्षात ग्रॅच्युटी फंड हा संस्थेकडेच आहे.

श्री राजापुरे (डीआरएचआर): प्रोव्हीजन करताना त्या फिगर या परफेक्ट पाहिजे असतात. प्रोव्हिजन अंदाजे नाही करू शकत. पुढल्या वर्षी ग्रॅज्युएटीची फिगर किती येणार हे तुम्हाला माहीत असते. त्यामध्ये जास्तीत जास्त 1 ते 2% मागेपुढे होऊ शकते , परंतु एवढा फरक होऊ शकत नाही. जे निवृत्त होतात म्हणून त्यासाठी प्रोव्हिजन करायची नसते, याची प्रोव्हिजन तुम्हाला दरवर्षी करायची असते. इथे श्रीराम साहेब आहेत ते पण सांगू शकतील.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: सर्वांना माहित आहे की कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युईटी संस्थेच्या भंडवलात आहे ती गव्हर्नमेंट रूलप्रमाणे ती एलआयसीमध्ये गुंतवणूक करायची  असते. आम्ही प्रयत्न करत आहोत की कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युईटी एलआयसी मध्ये जावी . एलआयसीच्या कॅल्क्युलेशन प्रमाणे जी रक्कम द्यावी लागेल त्याप्रमाणे प्रोव्हीजन केली आहे. एलआयसीने ग्रॅच्युईटीचे कॅल्क्युलेशन सांगितलं तर त्याप्रमाणे आपल्याला पैसे द्यावे लागणार म्हणून ही प्रोव्हिजन केली आहे.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): म्हणूनच आम्ही सांगतो की सर्व गोष्टी तुम्ही स्टडी करून घ्या आणि सभागृहाला सांगा. ठीक आहे या एकाच विषयावर जास्त वेळ जाऊ नये म्हणून विषय क्रमांक चार पूर्ण करण्यासाठी मी सूचक म्हणून माझे नाव सुचवतो.

सूचक : श्री दिगंबर पाटील (ईएमईडी)

अनुमोदक : श्री यदुवीर सिंग (एचएलयू)

ठराव सर्वानुमते मंजूर.

**ठराव क्र.4: ठराव पास करण्यात आला की सन 2023-24 आर्थिक वर्षाकरिता मंजूर केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली पुन्हा ठराव पास करण्यात आला की तसेच सन 2024-25 या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळांनी मांडलेल्या अंदाजपत्रकास सभागृहांनी सर्वानुमते मंजुरी दिली.**

**सुचक : श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी)**

**अनुमोदक : श्री मनोज वाडेकर (आरईडी)**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सभागृहाचा मान ठेवून मानधनाबाबत काय झालं ते सांगा प्लीज.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई : त्याबाबत आपण शेवटी तो विषय घेऊ.

मानद सचिवांनी विषय क्रमांक पाच वाचून दाखवला.

**विषय क्रमांक 5: शासकीय लेखापरीक्षक यांच्या सन 2023-2024 या आर्थिक वर्षाच्या हिशोबतपासणी अहवालाची नोंद घेणे.**

श्री अरुण कोळी (सीडीएम): तुम्हाला वैधानिक लेखापरीक्षकांनी तुमच्या काय चुका झाल्या आहेत ते सांगा किंवा नसतील झाल्या तर तसं सांगा ते वाचून दाखवा.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: रिपोर्ट मध्ये ऑडीटरचा रिमार्क दिलेला आहे. वैधानिक लेखापरीक्षणाचा 60 ते 70 पानाचा रिपोर्ट आहे. त्यातील 'पार्ट- बी' मी वाचून दाखवतो.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: तुमच्याकडे फायनल रिमार्क आहे तेच फक्त थोडक्यात वाचा.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय यांनी वार्षिक अहवालातील पान क्रमांक 61 व 62 वरील वैधानिक लेखापरीक्षकांनी दिलेला रीपोर्ट ओपिनियन वाचून दाखवले.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई:  अहवालामध्ये जो वैधानिक लेखापरीक्षकांचा रिपोर्ट आहे त्यावर कोणाची काही कंप्लेंट आहे का ? असेल तर बोला.

**ठराव क्र.5: ठराव पास करण्यात आला की, शासकीय लेखापरीक्षक जगदीश रणदिवे, सीए –साज एन्ड असोसिएटस यांनी सादर केलेला  सन 2023-24 या आर्थिक वर्षाच्या वैधानिक हिशोब तपासणी अहवाल स्विकारून त्यात नमूद केलेल्या तपासणी शेऱ्याची नोंद घेऊन सभागृहाने ठराव सर्वानुमते मंजूर केला.**

सूचक : श्री दिगंबर पाटील (ईएमईडी)

अनुमोदक : श्री यदुवीर सिंग (एचएलयू)

ठराव सर्वानुमते मंजूर.

मानद सचिवांनी विषय क्रमांक सहा वाजून दाखवला.

**विषय क्र.6:  सन 2024-2025 याआर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नेमणुकीस मान्यता देणे.**

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): किती निविदा आल्या आणि कोण आहेत ते सांगा.

श्री बाहुबली चौगुले: होय हेच आपल्याकडे एकूण पाच टेंडर आले.

एक सभासद: अध्यक्ष साहेब जे टेंडर आले आहेत ते डिस्प्ले करा सर्वांना समजेल. मागच्या वेळी डिस्प्ले केले होते. आताही करा.

श्री बाहुबली चौगुले:  हे आलेल्या पाच टेंडरचे सीएसटी स्टेटमेंट आहे.

| S.R.NO. | NAME OF AUDITOR / FIRM | AMT. QUOTED IN QUOTATION |
|---|---|---|
| 1 | SAAJ & ASSOCIATES | 95% of GOVT. FEES + GST |
| 2 | SATHEESHA SHETTY & CO., PUNE | 100% of GOVT.FEES + GST |
| 3 | D G. KANGO & ASSOCIATES | 100% of GOVT.FEES + GST |
| 4 | NIKITA JADHAV & ASSOCIATES | 12,00,000/- + GST |
| 5 | CAS & ASSOCIATES | 13,00,000/- + GST |

श्री प्रकाश पाटील: यामध्ये तुमच्या संस्थेच्या कारभारासाठी जे आधी होते ते मेसर्स साज अँड असोसिएट हे तेच आहेत का ?

श्री बाहुबली चौगुले: होय, हेच आहेत त्यांची फी 95% ऑफ गव्हर्नमेंट सर्कुलर.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): त्यांची फी तुम्ही कॅल्क्युलेशन करून तिथे द्यायला हवी होती.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: अंदाजे 10 लाखाच्या आसपास रक्कम येते.

श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी): ठीक आहे. यावर्षीचे लेखापरीक्षणासाठी त्यांनाच काम द्या.

**ठराव क्र.6:** ठराव पास करण्यात आला की दि.29.08.2024 रोजी झालेल्या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने सन 2024-25 या कालावधीच्या वैधानिक लेखापरीक्षणासाठी आलेल्या एकूण 5 प्रस्तावांपैकी एक M/S SAAJ & Associates यांच्या गतवर्षाचा लेखापरीक्षणातील अनुभव व त्यांनी प्रस्तावात सहकार विभागाच्या परिपत्रकानुसार 95% इतकी लेखापरीक्षण फी नमूद केल्यानुसार त्यांची लेखापरीक्षण फी सन 2023-24 च्या ताळेबंदाच्या टर्नओव्हरशी विचारात घेऊन सर्वसाधारण सभेने M/S SAAJ & Associates यांची सन 2024-25 या कालावधीसाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती केली व पुढील कार्यवाहीसाठी संचालक मंडळास अधिकार देण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

सूचक : श्री प्रकाश पाटील (एसआयआरडी)

अनुमोदक : श्री मनोज वाडेकर (आरईडी)

ठराव सर्वानुमते मंजूर

मानद सचिवांनी विषय क्रमांक सहा वाजून दाखवला.

**विषय क्र.7: सन 2022-2023 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोषांचे वाचन करून त्यासंबंधीच्या दोषदुरुस्ती अहवालाची (compliance report) नोंद घेणे.**

श्री अरुण कोळी (सीडीएम): काय दोष दाखवले ते वाचून दाखवा. लवकर करा. उगाच वेळ वाया जात आहे. सर्व तयार ठेवायचं तुम्ही. ऑडिटरने कमी दोष काढून दाखवले असतील तर ते वाचून दाखवा आणि तुम्ही काय सूचना सुचविल्या असतील तर ते पण सांगा.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय यांनी ऑडिट रेक्टीफिकेशन रिपोर्ट वाचून दाखवला.

श्री दिगंबर पाटील (सीडीएम): यामध्ये तुम्हाला एसएलएफमध्ये काही इन्व्हेस्टमेंट करायची असेल तर करून टाका.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: यामध्ये एक रिमार्क दरवर्षी येतो तो म्हणजे स्टाफ ग्रॅच्युईटीचा आम्ही प्रयत्न करत आहोत एलआयसी मध्ये तो गुंतविण्याचा आणि स्टाफ प्रॉव्हिडंट फंड आहे तो सुद्धा पीएफ ऑफिसला जाईल यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत त्याप्रमाणे

**ठराव क्र.7: ठराव प्रास करण्यात आला की, सन 2022-2023** या **आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणातील दोषांचे वाचन करून व त्यासंबंधीचा सहकार विभागाकडे सादर केलेला दोषदुरुस्ती अहवाल सभेत सादर केला असता सभागृहाने या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेऊन सर्वानुमते मंजूर केला.**

सूचक : श्री राजापुरे (डीआरएचआर):

अनुमोदक : श्री दिगंबर पाटील (ईएमईडी)

ठराव सर्वानुमते मंजूर

पुन्हा ठराव पास करण्यात आला की, ऑडीट रिपोर्टमध्ये दरवर्षी येणारा स्टाफ ग्रॅच्युईटी आणि स्टाफ प्रॉव्हिडंट फंड बाबतचा रिमार्क काढून टाकण्यास्ठी स्टाफ ग्रॅच्युईटी एलआयसी मध्ये तो टाकण्याचा आणि स्टाफ प्रॉव्हिडंट फंड पीएफ ऑफिसला जमा करण्यात यावा याचा निर्णय घेऊन ठराव सर्वानुमते मंजूर केला.

सूचक : श्री दिगंबर पाटील (ईएमईडी)

अनुमोदक : श्री ढोबळे (डीसीअँडएसीएम)

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.8: संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस मंजुरी देणे.**

मानद सचिव यांनी उपविधी दुरुस्ती वाचून दाखवली.

उपविधी क्रमांक क 1.3 वाचून दाखविला.

| अस्तित्वात असलेल्या उपविधीची शब्दरचना | प्रस्तावित उपविधी दुरुस्तीची शब्दरचना |
|---|---|
| <u>अधिकृत भागभांडवल</u><br><br>संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये **50,00,00,000/-** (अक्षरी रुपये पन्नास कोटी फक्त) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु.500/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) राहील. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 28 मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता येतील.<br><br>सहकार वर्षात वर्गणीच्या रुपाने सभासदाकडून जमा केलेली रक्कम पुढील सहकारी वर्षाच्या पहिल्या दिवसाला म्हणजे 1 एप्रिलला सभासदाच्या भागभांडवलात जमा केली जाईल. भाग वाटपाच्या नोंदी भाग रजिस्टरला तसेच सभासदाच्या पासबुकमध्ये केल्या जातील. ही पध्दत सभासदाच्या भागभांडवलाची रक्कम रु.**15,000/-** (**रुपये पंधरा हजार**) **होईपर्यंत चालू राहील (500 रुपयाचे 30 भाग**). वरील रकमेपेक्षा जास्त स्विकारण्यात आलेली रक्कम सभासदाच्या सभासद वर्गणीच्या खात्यात जमा करण्यात येईल व मंजुरीने सदर व्याज दिले जाईल. व्याजाचा दर सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पाहिजे. | <u>अधिकृत भागभांडवल</u><br><br>संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये **100,00,00,000/-** (अक्षरी रुपये शंभर कोटी फक्त) असेल. प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु.500/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) राहील. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 कलम 28 मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास जास्तीत जास्त भाग धारण करता येतील.<br><br>सहकार वर्षात वर्गणीच्या रुपाने सभासदाकडून जमा केलेली रक्कम पुढील सहकारी वर्षाच्या पहिल्या दिवसाला म्हणजे 1 एप्रिलला सभासदाच्या भागभांडवलात जमा केली जाईल. भाग वाटपाच्या नोंदी भाग रजिस्टरला तसेच सभासदाच्या पासबुकमध्ये केल्या जातील. ही पध्दत सभासदाच्या भागभांडवलाची रक्कम **रु.30,000/-** (**रुपये तीस हजार**) **होईपर्यंत चालू राहील (500 रुपयाचे 60भाग**). वरील रकमेपेक्षा जास्त स्विकारण्यात आलेली रक्कम सभासदाच्या सभासद वर्गणीच्या खात्यात जमा करण्यात येईल व मंजुरीने सदर व्याज दिले जाईल. व्याजाचा दर सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पाहिजे. |

श्री अरुण कोळी (सीडीएम): या उपविधी दुरुस्तीचा अर्थ सभागृहाला सांगा .

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यामध्ये आपण अमेंडमेंट घेऊन येतोय संस्थेचे अधिकृत भाग भांडवल 50 कोटी आहे ते 100 कोटी करायचं आहे आणि सभासदाची स्वतःची भाग धारण क्षमता जी आहे ती 30,000/- करणेची आहे.

श्री राजापुरे (डी आर एच आर): कोळी सरांचा हा प्रश्न नाही. उपविधीमध्ये शेवटच्या चार ओळी आहेत की 'वरील रकमेपेक्षा जास्त स्वीकारण्यात आलेली रक्कम सभासदाच्या सभासद वर्गणीच्या खात्यात जमा करण्यात येईल'. आणि खाली लिहिलं आहे की 'व्याजाचा दर सभासद कर्ज व्याजाच्या दरापेक्षा कमी असला पाहिजे' याबद्दल कोळी साहेबांनी तुम्हाला प्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर द्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: आपल्या सभासदांची रु.30,000/- वरची रक्कम सभासद वर्गणी खात्यामध्ये जाईल. सभासद वर्गणीवरील व्याजाचा जो दर देतो तो आपल्या कर्जाच्या व्याजदरापेक्षा कमी असेल.

श्री अरुण कोळी (सीडीएम): मुंबई बँकेचा व्याजदर किती आहे?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कोळी साहेब, ते इथे येत नाही आपण ज्यानुसार कर्जाला व्याजदर देतो त्यानुसार

श्री अरुण कोळी (सीडीएम): मी तेच विचारलं, सभासदांना जे कर्ज देता ते मुंबई बँकेकडून घेता त्यापेक्षा अर्धा टक्के जास्त घेता ना?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सभासदांना आपण जो व्याजदर देतो, 9.85%, त्याच्यापेक्षा तो कमी असेल.

श्री अरूण कोळी (सीडीएम): बरोबर आहे ना? मग आता तुम्ही सभासद वर्गणीवर व्याज 10% देत आहात. भविष्यात आम्हाला तो तुम्ही कमी करणार. त्यामुळे तुम्ही हे सुद्धा सभागृहाला सांगा की ही उपविधी मंजूर झाली तर हा परिणाम आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: कोळी साहेब, तुम्ही ही उपविधी मंजूर नाही केली तरी पण तू क्लॉज आहे. मला सभासदांना सांगायचं आहे की सभासद कर्ज घेतो त्यावर आपण व्याज घेतो त्या व्याजापेक्षा सभासद वर्गणीवरील व्याज हे कमी द्यायला पाहिजे. उदाहरणार्थ पुढल्या वर्षी कर्जाचा व्याजाचा दर 9.5% झाला तर आपल्याला सभासद वर्गणीवर व्याज 9.5% असेल, व्याजदर 9% झाला सभासद वर्गणीचा व्याजदर 9% असेल.

श्री राजापुरे (डीआरएचआर): या विषयावर चर्चा करताना सभागृहाची माफी मागतो की ही उपविधी जर मंजूर झाली तर सभासद वर्गणीवर व्याज हे कमी मिळेल. संस्थेचा साधारण 3 कोटी 60 लाख

खर्च वाढेल म्हणून याला स्पष्ट विरोध आहे. आपले अधिकृत भाग भांडवल 50 कोटी आहे त्यापेक्षा जास्त नेता कामा नये.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: राजापुरे साहेब, तुम्ही या उपविधीवर ऑब्जेक्शन घेतलं कारण व्याजाचे दर कमी झाले तर सभासद वर्गणी वरील व्याजाचे दर सुद्धा कमी होतील असं तुम्हाला वाटत आहे परंतु ही उपविधी मंजूर झाली नाही तरी आपण कर्जावर जे व्याज घेतोय त्याच्यापेक्षा कमीच व्याजदराने सभासद वर्गणीवर व्याज  द्यायचं आहे. यामध्ये शब्दरचना तशीच आलेली आहे आपण फक्त शेअर्सची रक्कम वाढविण्याचा प्रयत्न करत आहोत रु.15,000/-  ऐवजी रु.30000.

श्री राजापुरे (डीआरएचआर): यालाच माझं ऑब्जेक्शन आहे त्यामुळे आपलं 3 कोटी 60 लाखाचे नुकसान होणार आहे. आपले अधिकृत भाग भांडवल आहे 50 कोटी, वसूल भाग भांडवल आहे 27 कोटी.

श्री श्रीधरन  (सीडीएम): सेक्रेटरी ही अमेंडमेंट हाऊस एकमताने रिजेक्ट करत आहे. ही उपविधी दुरुस्ती  नामंजूर आहे त्याप्रमाणे

**ठराव क्र. 8.1 : ठराव पास करण्यात आला की उपविधी दुरुस्ती क्रमांक क 1.3  ला सभागृहाने नामंजूर सर्वानुमते नामंजूर केली.**

**सूचक : श्री राजापुरे (डीआरएचआर)**

**अनुमोदक : श्री श्रीधरन  (सीडीएम)**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

मानद सचिव यांनी दुसरी उपविधी दुरुस्ती वाचून दाखवली.

**उपविधी क्रमांक फ 1.10**

| **अस्तित्वात असलेल्या उपविधीची शब्दरचना** | **प्रस्तावित उपविधी दुरुस्तीची शब्दरचना** |
|---|---|
| एकूण सर्व मिळून असणारे साधारण कर्ज देय पगाराच्या **25** पटीपेक्षा जास्त रकमेचे असणार नाही**.** जर कर्ज कमाल मर्यादेपर्यंत मंजूर केले तर वसूल करण्यात येणाऱ्या कर्जाचा हप्ता**,** व्याज व वेतनातून एकूण | एकूण सर्व मिळून असणारे दीर्घकालीन कर्ज देय पगाराच्या **30** पटीपेक्षा जास्त रकमेचे असणार नाही**.** जर कर्ज कमाल मर्यादेपर्यंत मंजूर केले तर वसूल करण्यात येणाऱ्या कर्जाचा हप्ता**,** व्याज व वेतनातून |

| | |
|---|---|
| करावयाची कपात ही पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टप्रमाणे त्याच्या वेतनाच्या 2/3 पेक्षा जास्त असणार नाही अशी खात्री करुनच कर्ज द्यावे. मंजूर कर्जाच्या 4% रक्कम मुदत कर्जासाठी शेअर्स व सभासद वर्गणी खात्यात जमा करावी लागेल व 15% रक्कम दीर्घ मुदत कर्जासाठी शेअर्स व सभासद वर्गणी खात्यात जमा करावी लागेल. | एकूण करावयाची कपात ही पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टप्रमाणे त्याच्या वेतनाच्या 2/3 पेक्षा जास्त असणार नाही अशी खात्री करुनच कर्ज द्यावे. दीर्घकालीन कर्जाच्या मंजुरीसाठी शेअर्स व सभासद वर्गणीच्या 25% रक्कम जमा करावी लागेल. |

या उपविधी दुरुस्तीनुसार आपण दीर्घकालीन कर्ज देय पगाराच्या 25 पट देत होतो ते आता आपण 30 पट करत आहोत.

श्री राजापुरे (डीआरएचआर): ठीक आहे. हे तुम्ही वाढवू शकता या उपविधीला मंजुरी आहे.

**ठराव क्र.8.2: ठराव पास करण्यात आला की, दि.25.08.2024 रोजी वेळेअभावी दि.29.08.2024 पर्यंत तहकूब झालेल्या व या दि.29.08.2024 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 1. एकूण सर्व मिळून असणारे दीर्घकालीन कर्ज देय पगाराच्या 30 पटीपेक्षा जास्त रकमेचे असणार नाही. जर कर्ज कमाल मर्यादेपर्यंत मंजूर केले तर वसूल करण्यात येणाऱ्या कर्जाचा हप्ता, व्याज व वेतनातून एकूण करावयाची कपात ही पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टप्रमाणे त्याच्या वेतनाच्या 2/3 पेक्षा जास्त असणार नाही अशी खात्री करुनच कर्ज द्यावे. दीर्घकालीन कर्जाच्या मंजुरीसाठी शेअर्स व सभासद वर्गणीच्या 25 पट रक्कम जमा करावी लागेल.**

**या उपविधी दुरुस्तीस सभागृहाने एकमताने मंजुरी दिली व सदर उपविधी दुरुस्ती मा. सहकार आयुक्त पुणे यांचे मंजुरीसाठी लवकरात लवकर पाठविण्यात यावी असा ठराव सभागृहाने एकमताने मंजूर केला.**

**सूचक : श्री डी एस राजापुरे (डीआरएचआर)**

**अनुमोदक : श्री श्रीधरन (सीडीएम)**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

मानद सचिव यांनी तिसरी उपविधी दुरुस्ती वाचून दाखवली.

**उपविधी क्रमांक फ 1.10 4.**

| **अस्तित्वात असलेल्या उपविधीची शब्दरचना** | **प्रस्तावित उपविधी दुरुस्तीची शब्दरचना** |
|---|---|
| कमीत कमी दोन सभासदांच्या वैयक्तिक जामिनकीवर मुदत कर्ज दिले पाहिजे आणि दीर्घ मुदत कर्ज रु.1,25,000/- पर्यंत कमीत कमी दोन वैयक्तिक जामिनकीवर व त्यापुढील कर्ज रकमेस कमीत कमी तीन वैयक्तिक जामिनकीवर कर्ज दिले पाहिजे. मात्र एका सभासदास तीनपेक्षा मुदत कर्जदारास व तीन पेक्षा दीर्घ मुदत कर्जास जामिन राहता येणार नाही. | रु.35 लाखापर्यंत दीर्घकालीन कर्ज कमीत कमी दोन वैयक्तिक जामिनकीवर व त्यापुढील रु.50 लाखापर्यंत दीर्घकालीन कर्ज कमीत कमी तीन वैयक्तिक जामिनकीवर दिले पाहिजे. मात्र एका सभासदास तीनपेक्षा जास्त दीर्घकालीन कर्जास जामिन राहता येणार नाही. |

श्री श्रीधरन (सीडीएम): आता 50 लाखाचे जे कर्ज आहे त्यासाठी जामीनदार मिळणं मुश्किल झाला आहे. तुम्ही रक्कम वाढवली पण जामीनसाठी सभासद मिळत नाही. एका साईडला तुम्ही लोन वाढवता, डेथ केसेस सोडून सर्विस मधून रिमूव झाला, गायब झाला अशा कर्जदाराच्या जामीनदारांची स्थिती खराब झाली आहे पण हे सभागृहाला समजलं पाहिजे. म्हणून यावर हाऊस मध्ये चर्चा झाली पाहिजे की या जामीनदारांना पण वाचवण्यात यावं. ठीक आहे आपण यावर विचार करू ही उपविधी मंजूर आहे.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): उपविधी मंजूर आहे. मी यास अनुमोदन देत आहे.

**ठराव क्र.8.3: ठराव पास करण्यात आला की, दि.25.08.2024 रोजी वेळेअभावी दि.29.08.2024 पर्यंत तहकूब झालेल्या व या दि.29.08.2024 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 4. रु.35 लाखापर्यंत दीर्घकालीन कर्ज कमीत कमी दोन वैयक्तिक जामिनदारकीवर व त्यापुढील रु. 50 लाखापर्यंत दीर्घकालीन कर्ज कमीत कमी तीन वैयक्तिक जामिनदारकीवर दिले पाहिजे. मात्र एका सभासदास तीनपेक्षा जास्त दीर्घकालीन कर्जास जामिन राहता येणार नाही. या**

**उपविधी दुरुस्तीस सभागृहाने एकमताने मंजुरी दिली व सदर उपविधी दुरुस्ती मा. सहकार आयुक्त पुणे यांचे मंजुरीसाठी लवकरात लवकर पाठविण्यात यावी असा ठराव सभागृहाने एकमताने मंजूर केला.**

**सूचक श्री महेंद्र मोरे (पूर्णिमा लॅब)**

**अनुमोदक श्री डी एस राजापुरे (डीआरएचआर)**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

मानद सचिव यांनी चौथी उपविधी दुरुस्ती वाचून दाखवली.

**उपविधी क्रमांक फ 1.10 6.**

| **अस्तित्वात असलेल्या उपविधीची शब्दरचना** | **प्रस्तावित उपविधी दुरुस्तीची शब्दरचना** |
| --- | --- |
| मुदत कर्जाचा व्याजाचा दर 9% इतका राहील व तो 66 समान हप्त्यात सरासरी व्याजदर आकारणी करुन पगारातून कपात केला जाईल. | रद्द करणे. |
| आकस्मिक कर्जाचा व्याजदर **12%** इतका राहील व तो 12 समान हप्त्यात **सरासरी व्याजदर आकारणी करुन** पगारातून कपात केला जाईल. | **आकस्मिक कर्जाचा व्याजदर 10.5% इतका राहील** व तो 12 समान हप्त्यात **दैनंदिन पद्धतीने उतरत्या क्रमाने शिल्लक रकमेवर व्याजदर आकारणी करुन पगारातून कपात केला जाईल**. |
| दीर्घ मुदत कर्जावरील व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. मात्र हा व्याजाचा दर दरसाल दर शेकडा 6 ते 12% राहील. जिल्हा बँकेचे कर्ज घेतल्यास बँक ज्या व्याजाचे दराने कर्ज देते त्या दरापेक्षा 0.5 ते 3 टक्केपर्यंत ज्यादा | **दीर्घकालीन कर्जावरील** व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. मात्र हा व्याजाचा दर द.सा.द.शे.6 ते 12% राहील. जिल्हा बँकेचे कर्ज |

| | |
|---|---|
| व्याजदर ठेवता येईल. | घेतल्यास बँक ज्या व्याजाचे दराने कर्ज देते त्या दरापेक्षा 0.5 ते 3% पर्यंत ज्यादा व्याजदर ठेवता येईल. |

श्री श्रीधरन (सीडीएम): तुम्ही तर ऑर्डीनरी लोन बंद केले. सेक्रेटरी आमच्या बोलण्याचा अर्थ तुम्ही नवीन कर्ज मंजूर करण्याच्या वेळी सांगितलं होतं ते पाच लाखाचं ऑर्डीनरी लोन त्याचा इंटरेस्ट रेट कमी होणार. उपविधीप्रमाणे तुम्ही ते करू शकत नाही. तुम्ही बोलला होतात की कसं उपविधीचे उल्लंघन न करता ऑर्डीनरी लोन 8.5% प्रमाणे व्याजदार पहिल्या 5 लाखाला देऊ शकता फक्त 'हो' की 'नाही' हे उत्तर द्या.

श्री राजापुरे (डीआरएचआर): आपल्याला जे लोन मिळत आहे त्यामध्ये पहिले 5 लाख हे 8.5% ने मिळत आहे.

श्री श्रीधरन (सीडीएम): मिळत आहे हे माहिती आहे. पण उपविधी मंजूर झाली की ऑर्डीनरी लोन वर तुम्ही इन्शुरड करा की 5 लाख हे कोणत्याही कंडीशन मध्ये 8.5% नेच मिळणार.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): या हाउसने तुम्हाला दीर्घकालीन कर्ज मंजूर करताना सांगितलं होतं की पहिले पाच 8.5% ने आणि ही हाऊसची मागणी होती आणि तुम्ही ते ऐकलं होतं. तुम्ही ते कंटिन्यू करा कोणतीच अडचण नाही. जर तुम्हाला टेक्निकल प्रॉब्लेम होतो तर हे 5 लाख वेगळे करा आणि बाकीच्या कर्जाला इंटरेस्ट फिक्स करू शकता उपविधीचे उल्लंघन होणार नाही.

ठराव क्र.8.4 : ठराव पास करण्यात आला की, दि.25.08.2024 रोजी वेळेअभावी दि.29.08.2024 पर्यंत तहकूब झालेल्या व या दि.29.08.2024 रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने सुचविलेल्या संस्थेच्या उपविधी क्र. फ 1.10 6. मुदत कर्ज अस्तित्वात न राहिल्यामुळे 'मुदत कर्जाचा व्याजाचा दर 9% इतका राहील व तो 66 समान हप्त्यात सरासरी व्याजदर आकारणी करुन पगारातून कपात केला जाईल’ हे उपविधीतून रद्द करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर केला.

आकस्मिक कर्जाचा व्याजदर 10.5% इतका राहील व तो 12 समान हप्त्यात दैनंदिन पद्धतीने उतरत्या क्रमाने शिल्लक रकमेवर व्याजदर आकारणी करुन पगारातून कपात केला जाईल.

दीर्घकालीन कर्जावरील व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. मात्र हा व्याजाचा दर द.सा.द.शे. 6 ते 12% राहील. जिल्हा बँकेचे कर्ज घेतल्यास बँक ज्या व्याजाचे दराने कर्ज देते त्या दरापेक्षा 0.5 ते 3 टक्केपर्यंत ज्यादा व्याजदर ठेवता येईल.

या उपविधी दुरुस्तीस सभागृहाने एकमताने मंजुरी दिली व सदर उपविधी दुरुस्ती मा. सहकार आयुक्त पुणे यांचे मंजुरीसाठी लवकरात लवकर पाठविण्यात यावी असा ठराव सभागृहाने एकमताने मंजूर केला.

सूचक : श्री महेंद्र मोरे (पूर्णिमा लॅब)

अनुमोदक : श्री राजापूरे (डीआरएचआर)

ठराव सर्वानुमते मंजूर

मानद सचिवांनी विषय क्र.9 वाचून दाखविला.

**विषय क्र.9: सभासदांना वर्गणी खात्यातील अंशत: रक्कम काढणेसाठी सुविधा देणेबाबत विचार करणे.**

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): माझी विनंती आहे की संचालक मंडळाने जी अमेंडमेंट आणली आहे त्यावर एक प्रेझेंटेशन करायला पाहिजे होतं. कारण सभासदांना याबाबतीत अनेक प्रश्न असतात. तुम्ही पार्शिअल विड्रोवल घेऊन येताय, तुम्ही 15,000/- शेअर्सचे 30,000/- करायला अमेंडमेंट घेऊन येताय तर तुम्ही यावर एक प्रेझेंटेशन तयार करून आणायला पाहिजे होतं. तसं केलं असतं तर सभासदांचे 90% प्रश्न सुटले असते. आता तुम्ही एकस्प्लेन करा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सभासदांना सभासद वर्गणीच्या व्याजावर टीडीएस लागत आहे. त्यामुळे ज्या सभासदांची सभासद वर्गणी दोन लाखाच्या वर आहे त्यांना कमीत कमी दोन लाख ठेवून त्याच्यावरची रक्कम हे पार्शियल विड्रावल करण्याची परवानगी मिळावी.

श्री श्रीधरन (सीडीएम): सेक्रेटरी साहेब, हे पार्शियल विड्रावल आपल्या संस्थेसाठी हानिकारक आहे. कारण 240 कोटीची आपली सभासद वर्गणी आहे. तुम्ही इन्व्हेस्टमेंट करण्यासाठी सभासदांना डिस्करेज करत आहात. यामध्ये एखादा सभासद रिझाईन करून सर्व फंड परत घेईल. मला वाटतं हे संस्थेच्या हिताचे नाही. हा अजेंडा पुढच्या एजीएमपर्यंत स्थगित करा .

श्री राजापुरे (डी आर एच आर): नाही. माझ्यामते आपण सभासदांना 10% व्याज देतो आणि तोच फंड जर आपण बाहेरून घेतला एफडीच्या रूपाने –8% बँकेच्या रूपाने तर आपल्याला 9.8% मिळतोय सभासदांना टीडीएस लागतो. तो जर अंशतः काढला तर सभासदांचाही फायदा होईल आणि संस्थेचाही फायदा होईल. माझ्या माहितीनुसार अंशतः काढायला परवानगी दिली तर जास्तीत जास्त 30 ते 40 कोटीचा फंड बाहेर जाईल. त्यापेक्षा जास्त जाणार नाही. संस्थेचा या 30 ते 40 कोटीचा 10% ने इंटरेस्ट वाचेल. ओव्हर एक्सपेंडिचर होणार नाही आणि जो सभासद 30% टक्के टीडीएस भरतो त्याला पण भरावा लागणार नाही जिथे संस्थेला नुकसान होत होतं तिथे आम्ही डीफर

केले जसे की शेअर्स वाढवण्यासाठी आम्ही डीफर केलं. संस्था जर डबघाईला आली तर पुढे कसं करणार म्हणून अंशतः सभासद वर्गणी काढण्यासाठी माझी परवानगी आहे.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): पार्शिअल विड्रोवल हे प्रपोजल तुम्ही मांडलं आहे. राजापुरे यांनी पण सांगितलं. पण मला एक सांगा खरोखर याला रजिस्टरकडून मान्यता मिळेल का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सभागृहाची मान्यता मिळाली तर हे प्रपोजल आपण पुढे रजिस्ट्रारकडे घेऊन जाऊ आणि तिथे मंजुरी मिळाली तरच त्याची अंमलबजावणी करायची आहे.

श्री सारंग (एएफडी): अध्यक्ष साहेब, ज्या सभासदांना टीडीएस लागला त्यांचा आपण विचार करत आहोत पण ज्यांना जास्त व्याज भरावे लागते अशा कर्जदारांचाही विचार करण्यात यावा. कर्जाचा व्याजदर कमी करा त्याबद्दल तुम्ही काहीच बोलत नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: याबद्दल मी सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की येणाऱ्या काळामध्ये कर्जावरील व्याजदर नक्कीच आपल्याला कमी झालेले दिसतील त्याप्रमाणे

**ठराव क्र.9: ठराव पास करण्यात आला की सभासदांची आर्थिक बाब क संस्थेवरील व्याजाचा बोजा लक्षात घेऊन सभासदांना संचित ठेव (सभासद वर्गणी) खात्यातून उपविधीच्या नियम व अटीस अधिन राहून व सहकार आयुक्त पुणे यांच्या मंजूरी नंतर अंशत: रक्कम काढून घेणे बाबत चा ठराव बहुमताने पारित केला.**

**सूचक : श्री राजापुरे (डीआरएचआर):**

**अनुमोदक : श्री आनंद गव्हाणकर (एचपीडी)**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

मानद सचिवांनी विषय क्रमांक 10 वाचून दाखवला.

**विषय क्र.10: विक्रम कर्ज संरक्षण निधी योजनेच्या धोरणातील नियमात अंतर्भूत करावयाच्या बदलाबाबत निर्णय घेणे.**

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे:- **"विक्रम कर्ज संरक्षण योजना" (VKSY)**

दि.25.01.2024 पासून रु.50 लाख दीर्घकालीन कर्ज मंजुरीची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे दि.25.01.2024 पूर्वी पर्यंत घेतलेले सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज किंवा दि. 25.01.2024 नंतर घेतलेले दीर्घकालीन कर्ज यापैकी कोणतेही कर्ज घेतलेले सभासद हे विक्रम कर्ज

संरक्षण योजनेचे सभासद असतील. ही योजना सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज तसेच दीर्घकालीन कर्जासाठी लागू असेल. सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज व दीर्घकालीन कर्जाच्या प्रत्येक महिन्याच्या उर्वरित शिल्लक कर्ज रकमेवर (outstanding loan) **अतिरिक्त** द.सा.द.शे.0.5% (रु.41.67 प्रती माह प्रती लाख) प्रमाणे दरमहाच्या वेतनातून विक्रम कर्ज संरक्षण योजनेची वर्गणी कपात करण्यात येऊन सदर वर्गणी 'विक्रम कर्ज संरक्षण' योजनेत वर्ग करण्यात येईल.

सभासदाचे दुर्दैवी निधन झाल्यास / स्थायी अपंगत्व आल्यास 'विक्रम कर्ज संरक्षण योजने' अंतर्गत सभासदाचे तत्कालीन तारखेस सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज व दीर्घकालीन कर्ज यापैकी जे कर्ज देय असेल त्या कर्जाची शिल्लक रक्कम 'विक्रम कर्ज संरक्षण योजनेतून' पात्र मयत सभासदाच्या / स्थायी अपंगत्व आलेल्या सभासदाच्या कर्ज खात्यात वर्ग करण्यात येऊन, अशा पात्र सभासदाची सर्वसाधारण कर्जाची, विशेष कर्जाची अथवा दीर्घकालीन कर्जाची देय असलेली शिल्लक रक्कम निरस्त केली जाईल.

'विक्रम कर्ज संरक्षण योजने' अंतर्गत लाभ घेण्यासाठी पात्र असलेले सभासद:-

1. कर्ज मंजूर दिनांकापासून प्रत्येक कर्जदार सभासद या योजनेसाठी पात्र असेल.

2. अ- सभासदाने कर्ज घेतल्यानंतर तीन महिन्याच्या आत सभासदाचा मृत्यु झाल्यास, मृत्यू झालेल्या दिनांकापर्यंत विक्रम कर्ज संरक्षण योजनेचे सलग हप्ते भरलेले असावेत.

   ब- सभासदाने कर्ज घेऊन तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला असेल व सभासदाचा मृत्यु झाल्यास, मृत्यू झालेल्या दिनांकापासून मागील सलग तीन महिन्यांचे हप्ते आलेले असावेत.

   उदा.जर एखाद्या सभासदाचा मृत्यु डिसेंबर महिन्यामध्ये झाला असेल तर त्याचे सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर या तीन महिन्यांचे सलग हप्ते आलेले असावेत.

   क- एखादा कर्जदार सभासद कर्ज घेतल्यानंतर प्रदीर्घ आजाराने ग्रस्त झाल्यास त्याच्या तीन महिन्याच्या वेतनकपाती मधून कर्ज हप्ता आला नसेल आणि दुर्दैवाने त्याचे निधन झाल्यास अशा संदर्भात विशेष बाब समजून आजारासंबंधित आधारभूत कागदपत्र सादर केल्यास तो सभासद या योजनेस पात्र असेल. अशा बाबतीत दिशाभूल करण्यात आली असे निदर्शनास आल्यास सदर सभासदाच्या उर्वरीत कर्जफेडीची जबाबदारी हि त्या जामीनदारांची असेल.

   ड - थकबाकीदार सभासद सदर योजनेस पात्र राहणार नाही.

3. आत्महत्या – जर मयत सभासदाच्या मृत्यू दाखल्यावर मृत्यूचे कारण 'आत्महत्या' असे नमूद केले असेल तर मृत्यूचा दिनांक हा कर्ज काढलेल्या तारखेपासून बारा महिने किंवा बारा महिन्यापेक्षा जास्त असल्यास सदर सभासद या योजनेस पात्र ठरेल.

4. सभासदाने कर्ज उपभोगल्यानंतर स्थायी अपंगत्व (permanent disability) आल्यास– याबाबत आस्थापनेच्या प्राधिकृत वैद्यकीय समितीने (स्थायी अपंगत्वाच्या  केसबाबत निर्णय घेणारी समिती) घोषित करून कामावरून कमी केल्यास त्याबाबतची कागदपत्रे संस्थेकडे सादर केल्यानंतर संचालक मंडळाच्या सभेमध्ये निर्णय घेऊन उर्वरित देय असलेले कर्ज निरस्त करण्यात येईल.

5. काही तांत्रिक अडचणी असलेली सर्व कर्ज प्रकरणे संचालक मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मांडून यावर चर्चा करून कर्ज निरस्त करण्यासाठी मार्ग काढला जाईल.

**निधन पावलेल्या / कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्या पात्र सभासदांचे सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज व दीर्घकालीन कर्ज निरस्त करण्यासाठी विक्रम कर्ज संरक्षण योजनेअंतर्गत जमा झालेली रक्कम कर्ज खात्याकडे वर्ग करण्याबाबतच्या धोरणाबाबतची नियमावली**

1. सदर 'विक्रम कर्ज संरक्षण योजना' अधिमंडळाच्या विशेष सर्वसाधारण सभेने आणि सहकार विभागाच्या मंजुरीनंतर दि.1 मे 2023 पासून कार्यान्वित होईल. ज्या सभासदांनी सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज किंवा दीर्घकालीन कर्ज घेतले असेल अशा सर्व सभासदांना त्यांच्या सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज आणि दीर्घकालीन कर्ज अशा शिल्लक असलेल्या कर्जास बंधनकारक असेल.
2. सदर योजना ही ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालवली जाईल.
3. सदर योजनेसाठी प्रत्येक महिन्यात सभासदाच्या उर्वरित (सर्वसाधारण कर्ज, विशेष कर्ज व दीर्घकालीन कर्ज) कर्ज शिल्लक रकमेवर अतिरिक्त द.सा.द.शे.0.5% दराने रक्कम दरमहाच्या वेतनातून कपात करून 'विक्रम कर्ज संरक्षण योजने' अंतर्गत वर्ग करण्यात येईल.
4. सदर योजना दि.1 मे  2023 पासून अंमलात आणली जाईल व त्यानंतर निधन पावलेल्या किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्या पात्र सभासदाचे 'विक्रम कर्ज संरक्षण योजने' अंतर्गत संपूर्ण कर्ज निरस्त करण्यात येईल.
5. जर एखाद्या महिन्यात कर्ज निरस्त करण्याची रक्कम ही 'विक्रम कर्ज संरक्षण योजने'तील निधीपेक्षा जास्त असेल तेव्हा मयत सभासदांच्या मृत्यु दिनांकाच्या प्राधान्य क्रमाने कर्ज निरस्त करण्यात येईल व शिल्लक राहिलेली कर्ज रक्कम पुढील महिन्यात वर्ग करून निरस्त करण्यात येईल.
6. नैसर्गिक व अनैसर्गिक आपत्तीमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाल्यास अशा प्रसंगी उपलब्ध निधीतून समप्रमाणात एकूण सभासदांचे कर्ज निरस्त करण्यात येईल.

7. या योजनेचा फेर-आढावा व नवीन नियम किंवा नियमात बदल हे वार्षिक सर्वसाधारण / विशेष सर्वसाधारण सभेकडून मंजूर करून अंतर्भूत करण्यात येईल.
8. सदरच्या योजनेत नफ्यातील काही रक्कम वर्ग करता येईल.

श्री श्रीधरन (सीडीएम): सेक्रेटरी, मी तुम्हाला थोड्या वेळापूर्वी सूचना केली की बारा लाखाचे लोन प्रोटेक्शन होते . तुम्ही जे 1.93 कोटी आऊटस्टँडिंग लोन आहे ते आपण डेथ केससाठी वापर केला. डेथ केस सोडून एक दोन केसेस आहेत त्यांचेही जामीनदार त्याच स्थितीत आहेत. ज्यांची डेथ नाही झाली म्हणून त्यांच्या जामीनदारांना अडचण झाली. कुठल्या तरी डेथ केसचा डिस्प्युट आहे ते तुम्हाला माहित आहे. तसेच जे सभासद गायब झाले त्यांच्याही जामीनदारांची स्थिती खराब आहे. जो कर्जदार सभासद डीस्मीस झाला किंवा त्याची एनटीपी झाली अशा केसेसमध्ये सुद्धा जामीनदारांची स्थिती खराब आहे, तर विक्रम कर्ज संरक्षण योजनेच्या क्र.5 च्या मुद्दयामध्ये तुम्ही प्रोव्हिजन दिली आहे. यात तुम्ही लिहिलं आहे की 'काही तांत्रिक अडचण असलेली सर्व कर्ज प्रकरणे संचालक मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मांडून त्यावर चर्चा करून कर्ज निरस्त करण्यासाठी मार्ग काढला जाईल' याचे स्पष्टीकरण द्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: विक्रम कर्ज संरक्षण योजनेमध्ये, या आधीच्या नियमांमध्ये न बसणाऱ्या ज्या केसेस आहेत त्या सर्व समाविष्ट होतील. यानंतर जी काही तांत्रिक अडचणीमध्ये अडकलेली प्रकरणे असतील त्यासाठी आपण सभासदामधून एक कमिटी बनवून व ही प्रकरणे त्यांच्याकडून वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे मांडू. जर वार्षिक सर्वसाधारण सभेने त्याला मंजुरी दिली तर ती कर्ज प्रकरणे आपण निरस्त करू हा त्याचा अर्थ आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेने जर मंजुरी दिली नाही तर ते कर्ज प्रकरण आपल्याला निरस्त करता येणार नाही.

श्री श्रीधरन (सीडीएम): मी तीन केसेस पुन्हा रिपीट करतो. 1-डेथ केसेस आहे त्यामध्ये नॉमिनींचे डिस्ट्प्युट आहे, 2- जो सभासद गायब आहे, 3- जो सभासद सर्विस मधून टर्मिनेट आहे किंवा रिमूव्ह केला आहे किंवा त्याचे एनटीपी आहे. या तीन केसेसमध्ये तुम्ही म्हणालात की आपल्या डाऊटफुल डेप्टस मध्ये ऑलरेडी 1.98 करोड आहेत. तुम्ही जामिनदार सभासदांना प्रोटेक्ट करण्यासाठी म्हणून पण हा फंड आहे काही एक दोन सभासदांचा विषय नाही. हा पूर्ण सभागृहाला, प्रेसिडेंट, व्हाईस प्रेसिडेंट यांना पण समजला पाहिजे की यामध्ये काही loofquls आहेत का? म्हणून योग्य डिसिजन घ्या. तुमचं प्रपोजल चांगलं आहे. पण त्यावर प्रेसिडेंट, व्हाईस प्रेसिडेंट यांचे पण सुपरवीजन पाहिजे. एवढी काळजी घ्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: श्रीधरन साहेब, मी धन्यवाद देतो संचालक मंडळाच्या वतीने की,अजुन पर्यंत डाऊटफुल डेप्टस आहे तो युटिलाइज झाला नाही परंतु विचाराधीनतेसाठी असावा अशी जी प्रकरणे अडकलेली असतील त्यामध्ये जामीनदार भरडला जातो. तर अशा पद्धतीने चांगलं

डिसिजन घेऊन कमिटी निवडून त्या कमिटीच्या स्क्रुटीमधून जी प्रकरणे पुढे येतील ती वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पुढे मांडली जातील. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अनुमतीने त्यांचे कर्ज निरस्त करण्यात येईल.

श्री डी एस धोत्रे (सीडीएम): सेक्रेटरी सर, पान क्रमांक 64 वर मुद्दा क्र.3: आत्महत्या केल्यास -------

या ठिकाणी बारा महिने आहेत त्या ऐवजी सहा महिने केले तर? कारण त्या कर्जदार सभासदाचा मृत्यू झालेला आहे. कोण आत्महत्या करेल ते सांगता येत नाही म्हणून सहा महिन्यापर्यंत आणावा ही माझी विनंती आहे. सभागृहाने पण यावर विचार करावा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: धोत्रे साहेब, पॉईंट क्र.5 त्यासाठीच आहे की जर एखाद्या व्यक्तीने पाच ते सहा महिन्यात आत्महत्या केली तर ते प्रकरण  तांत्रिक अडचणीत येते आणि असे प्रकरण स्क्रुटीनी कमिटीमधून येऊन ते मग पॉईंट नंबर तीनचे प्रकरण पॉईंट नंबर पाचमध्ये येईल.

श्री सुनील खाकसे (आरआरएमडी): विक्रम कर्ज संरक्षण योजनेप्रमाणे येथून पुढे कुठल्याही व्यक्तींचे कर्ज  क्षमापित करायचे असेल, मी नॅचरल डेथचं बोलत नाही अपार्ट फ्रॉम दॅट, तर वार्षिक सर्वसाधारण सभेच्या समोर या आणि त्यानंतर ते करा.

**ठराव क्र.10: ठराव पास करण्यात आला की विक्रम कर्ज संरक्षण योजनेच्या धोरणातील नियमात संचालक मंडळाने सुचविलेल्या बदलासह  'विक्रम कर्ज संरक्षण योजना' साधारण कर्ज, विशेष कर्ज व दीर्घकालीन कर्जास लागू करण्याबाबतचा निर्णय सर्वसाधारण सभेने एकमताने पारित केला.**

**पुन्हा ठराव पास करण्यात आला की, जी  काही कर्ज प्रकरणे तांत्रिक अडचणीत सापडली आहेत त्यांच्यानंतर विचार करण्यासाठी सभासदांमधून एक कमिटी नेमून ती प्रकरणे ती कमिटी सर्वसाधारण सभेत मांडेल व डाउट फूल डेप्स खत्यामधून सर्व साधारण सभेच्या मंजुरीने निरस्त करण्यात येतील असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.**

**सूचक : श्री श्रीधरन (सीडीएम)**

**अनुमोदक : श्री राजापुरे  (डीआरएचआर):**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

मानद सचिवांनी विषय क्रमांक 11 वाचून दाखवला.

**विषय क्र.11: अधिमंडळाच्या 63व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

सचिव श्री शिवाजी हगवणे-  जे सभासद आज वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहू शकले नाहीत त्यांची उपस्थिती आपण क्षमापित करतो. चर्चेअंती विषय क्र.11पास करण्यात आला.

**ठराव क्र.11:ठराव पास करण्यात आला अधिमंडळाच्या 63 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

**सूचक : श्री मनोज वाडेकर**

**अनुमोदक : श्री राजेश कळके**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

सचिवांनी विषय क्रमांक 12 वाचून दाखवला.

**विषय क्र.12: माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.**

श्री राजेश कळके:  अध्यक्ष महोदय, सीडीएममध्ये काही जामीनदार आहेत ते आपलं मनोगत व्यक्त करू इच्छित आहेत त्यांच्यावर खूप अन्याय झालेला आहे.

श्री जयवंत जाधव (सीडीएम): अध्यक्ष साहेब, मी प्रदीप सूर्यवंशी या कर्जदाराचा जामीनदार आहे, त्यांनी पाच वर्षांपूर्वी कर्ज घेतलं होतं. सोसायटीने रिटायर केली. त्याचे पैसे कापून घेतले नाहीत. आता आम्ही जामीनदार आहोत ते आम्हाला जबाबदार धरतात. त्याला आम्ही काय करायचं? पाच वर्ष त्यांनी काहीच रिकवरी केली नाही अशा बाबतीत जामीनदारांनी काय करायचं ते सांगा. पाच वर्षानंतर आम्हाला तीन रिमाइंडर दिले. तो कर्जदार 2022 ला रिटायर झाला त्यानंतर 2023 ला यांनी आम्हाला रिमाइंडर पाठवले. याला आम्ही जबाबदार की संस्था जबाबदार आहे?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: श्री पी पी सूर्यवंशी हे दि.30.11.2022 ला सेवानिवृत्त झाले. सोसायटीने वेळोवेळी Dues Certificate पाठविले परंतु त्यांच्या final settlement मधून रिकवरी मिळाली नाही व ते पूर्वी सतत गैरहजर राहिल्यामुळे पगारातून वसूली आली नाही.

श्री जयवंत जाधव (सीडीएम): पाच वर्षांमध्ये त्यांचे किती कटिंग झाले ती रक्कम सांगा.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय:  पी पी सुर्यवंशी यांची रक्कम 18 लाख 28 हजार होती आणि आजपर्यंतचा बॅलन्स 12 लाख 24 हजार 345 आहे.

श्री जयवंत जाधव (सीडीएम): तुम्ही पाच वर्षात रिकव्हरी का केली नाही? तुमचा सोसायटीचा रूल काय आहे? जर कर्जदार लोन भरत नाही त्यावेळी त्यांना रिमाइंडर पाठवता. तुम्ही आतापर्यंत कर्जदाराला रिमाइंडर पाठवलं का?

पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम: हा विषय तुमच्या पर्सनल कामाकरिताचा विषय नाही. एनी अदर मॅटर म्हणजे रिलेटेड टू पॉलिसी मॅटर.

श्री राजेश कळके (सीडीएम): साहेब, यांनी संचालक मंडळाला पत्र दिलं पण त्यांच्याकडून काहीच उत्तर आलं नाही. हा सोसायटीचा भोंगळ कारभार आहे. यांच्याकडून काहीच उत्तर आले नाही. वसूली बाबत ही मागच्या कमिटीची चूक झाली आहे. तशीच चूक ही कमिटी पण करत आहे. हे संचालक जामीनदारांकडून कसे वसूल करतात? हा सर्वसाधारण सभेच्या विषय आहे सभासदाचा पर्सनल नाही.

खजिनदार श्री शिबु प्रशाद सिंघा रॉय: जाधव साहेब तुमची रिकव्हरी संचालक मंडळाने बंद केली आहे. हे लोन 2017 मधील आहे आणि याविषयी आम्हाला पण बोलायचं आहे.

श्री राजेश कळके (सीडीएम):तुम्ही त्यांना रिमाइंडर पाठवले हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. तुम्ही कर्जदाराला तर काहीच पत्र पाठवलं नाही. जामीनदारांनी कर्ज अर्जाची झेरॉक्स कॉपी मागितली होती ती पण तुम्ही दिली नाही.

श्री जयवंत जाधव (सीडीएम): शिबु तुम्ही बोलू नका. सेक्रेटरींना बोलू द्या.

श्री राजेश कळके (सीडीएम):शिबू, जेव्हा हे सोसायटीत तुमच्याशी बोलायला आले तेव्हा तुम्ही त्यांना बोललात की तुम्हाला लोन भरावं लागेल.

श्री अमोल घाडगे: शिबू, तुम्ही बोलायचं नाही. सेक्रेटरींना बोलू द्या. मागच्या कमिटीने रिकव्हरी का केली नाही? हे सॉफ्ट टार्गट आहेत म्हणून यांच्यावर अन्याय होत आहे. ही माणसं जास्त शिकलेली नाहीत. ही टेक्निशियन नाहीत वर्क असिस्टंट आहेत. म्हणून कळके साहेब यांची बाजू घेऊन बोलत आहेत. सर्वांना पत्र लिहून हे थकलेत. अध्यक्ष, उपाध्यक्ष यांना सुद्धा पत्र दिले. म्हणून, सेक्रेटरी, हा मॅटर तुम्ही क्लिअर करा.

श्री राजेश कळके (सीडीएम): तरुण कुमार श्रीवास्तवासाठी वेगळा न्याय आणि इथे वेगळा न्याय.अस का?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: यांची पार्श्वभूमी सांगतो. श्री पी पी सुर्यवंशी हे सेवानिवृत्त झाले त्यानंतर आपल्याला आपल्या कर्जाची शिल्लक राहिलेली रक्कम आस्थापनेकडून त्यांच्या ग्रॅच्युईटीतून मिळते. सूर्यवंशी यांची अजून पर्यंत आस्थापनाची सेटलमेंट झालेली नाही.

जामीनदाराकडून रिकव्हरी होत नाही. या ठिकाणी 'विक्रम कर्ज संरक्षण योजना' घेऊन आलेलो आहोत आहे यामध्ये पॉईंट क्र.पाच यासाठीच आणलेला आहे. याप्रकारच्या काही तांत्रिक अडचणीमध्ये आलेल्या गोष्टी आहेत त्या गोष्टी त्या कमिटीकडे घेऊन ज्या पद्धतीने कर्ज निरस्त करायचं असेल तर त्या ठिकाणी ती कमिटी तसं ठरवेल.

श्री राजेश कळके (सीडीएम): मग तुम्ही त्यांना दिलेले रिमाइंडर मागे घ्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: हा प्रोसेस चा भाग आहे.

श्री राजेश कळके (सीडीएम): त्यांना आधी नोटीस दिली का? लगेच कसे रिमाइंडर देता? आधी नोटीस पाठवतात.

श्री जयवंत जाधव (सीडीएम): कर्जदाराला नोटीस पाठवली का तुम्ही? नाही पाठवली, मी सांगितल्यानंतर तुम्ही पाठवली. त्यांचा एड्रेस पण मीच तुम्हाला आणून दिला. त्यानंतर तुम्ही ते केलं.

श्री राजेश कळके (सीडीएम): कर्जदाराला नंतर नोटीस पाठवली आणि जामीनदाराला रिमाइंडर पाठवलं. दोन वर्ष तुम्ही तशीच घालवली.

अमोल घाडगे: हे जामीनदार आता सेवानिवृत्त होणार. तुम्ही हे प्रकरण कधीपर्यंत निरस्त करणार ते सांगा. यासाठी जी व्यक्ती जबाबदार आहे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करा. त्या व्यक्तीवर कायदेशीर कारवाई न करता तुम्ही जामीनदारांना का पकडता? कर्जदाराला तुम्ही 101 ची नोटीस पाठवू शकता ना?

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तुम्ही मला बोलू द्या. जाधव साहेब, तुमच्याशी माझी प्रत्येक वेळी चर्चा झाली तेव्हा तुम्ही मला सांगायचे की त्यांची सेटलमेंट व्हायला जवळ जवळ आलीच आहे. त्याचवेळी आपण आस्थापनाला ड्यूज सर्टिफिकेट पाठवायचो आणि दोन-तीन महिन्यापूर्वीच आस्थापनेला पुन्हा डयुज सर्टिफिकेट पाठवले. म्हणूनच अशी अडकलेली जी प्रकरणे आहेत त्यांच्यासाठी 'विक्रम कर्ज संरक्षण योजने'मध्ये हा मुद्दा घेऊन आलेलो आहोत.

श्री राजापुरे (डीआरएचआर): समजा, बाय डिफॉल्ट आस्थापनाने त्यांचे पैसे त्यांना सर्व देऊन टाकले तर हे कुणाच्या चुकीमुळे झाले आहे? संस्थेच्या. त्यांनी चुकीचा कारभार केला, चुकीचे लोन दिले, चुकीच्या कारभाराची फळ तुम्हाला आणि यांना भोगायला लागत आहेत. तुम्ही मागील सर्व संचालक मंडळाला स्वतंत्रपणे पत्र किंवा नोटीस पाठवली का? 'हो' किंवा 'नाही' ते सांगा.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: सर्वांना लेटर पाठवले. त्या सर्वांना संस्थेमध्ये मीटिंगला बोलावले होते.

श्री मुकुंद वैराळकर (ए अँड एसीडी): अध्यक्ष साहेब, आज मी मीटिंगमध्ये येऊन फक्त तुमच्या सर्वांच्या विनंतीला मान देऊन बसलो होतो. एनी अदर मॅटर आहे गेल्या दोन मीटिंग पासून आपण या संचालक मंडळाचा कारभार बघत आहोत. तुम्ही या संचालक मंडळाच्या कारभारावर समाधानी आहात का? हे सभागृह समाधानी आहे का? हे संचालक मंडळ दोन वर्षात पूर्णपणे अपयशी ठरले आहे. या संचालक मंडळाच्या कार्यप्रणालीमध्ये आणि आता पर्यंतच्या एजीएमच्या केलेल्या संभाषणामध्ये खूप तफावत आहे. यांनी दिलेल्या अजेंडाप्रमाणे आमचा विषय हा अध्यक्षांच्या परवानगी येणारा विषय आहे.

या अजेंडामध्ये प्रश्न क्रमांक एक-यांनी सोसायटीला मॅनेजर आणला का?

मॅनेजरच्या संदर्भामध्ये आपण काय केलं? हा दुसरा प्रश्न.

या संचालक मंडळामध्ये अनुभवाचा फार मोठा अभाव आहे. माझी या सभागृहातर्फे यांना एक विनंती आहे की यामध्ये कोणीतरी एक अनुभवी व्यक्ति जो त्यांच्या उपविधीप्रमाणे 'तज्ञ संचालक' म्हणून काम करेल. तर तो यांनी या दोन वर्षांमध्ये भरलेला आहे का? तज्ञ संचालकाची नेमणूक करणे, निवड करणे हा संपूर्णपणे संचालक मंडळाचा अधिकार आहे. आणि या अधिकारामध्ये त्यांना हे पद भरायचं आहे. यांच्या पॅनलचं नाव आहे सहकार परिवर्तन पॅनल. 'तज्ञ संचालक' म्हणून हे जे कोणी अपोइन्ट  करतील किंवा करणार नाहीत, करायचा असेल तर यांची मानसिक स्थिती असेल, यांना जर यांचा पुढे गोंधळ होऊ द्यायचा नसेल, यांना व्यवस्थितपणे एजीएमला सामोरे जायचे असेल तर यांनी तज्ञ संचालकाची नियुक्ती करावी. आणि तो  तज्ञ संचालक पूर्णपणे या पॅनलच्या कुठल्याही सभासदाच्या किंवा या पॅनलशी रिलेटेड नसावा. पूर्णपणे विरोधी असावा. कारण हे गरजेचे झाले आहे की कोणीतरी एक विरोधी व्यक्ती यांच्यामध्ये बसत नाही तोपर्यंत असेच हे चालत राहणार. सभागृहाच्या माध्यमातून एक विनंती आहे यांनी लवकरात लवकर 'तज्ञ संचालक' पद भरावे कारण यामध्ये फक्त एकच विषय नाही बरेच विषय आहेत फार मोठ्या मोठ्या चुका आहेत त्यामधली एक मोठी चूक आहे ती मी समजावून सांगितली आहे.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: मॅनेजर भरती बद्दलची प्रक्रिया चालू आहे. ‘तज्ञ संचालकच्या’ बाबतीत आपल्या उपविधीमध्ये ज्या पद्धतीने लिहिले आहे की तज्ञ संचालक कोण असावा तर तो सहकार तज्ञ असावा.

श्री जयवंत जाधव (सीडीएम): सेक्रेटरी साहेब, तुम्ही माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: तुमच्या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे 101 ची कारवाई आपण करणार आहोत त्यासोबतच कर्ज निरस्त करण्यासाठी जी कमिटी येणार आहे त्या कमिटीकडे तुमचे प्रकरण देण्यात येईल.

श्री राजेश कळके: तुम्ही रिमाइंडर परत घ्या. त्यांच्या मानेवर टांगती तलवार का ठेवत आहात? तुम्ही त्यांना रिमाइंडर पाठवलं हे बेकायदेशीर आहे. तुम्ही कर्जदाराला पाठवलं पाहिजे. तुम्ही रिमाइंडर कोणाच्या परवानगीने पाठवले. हे जामीनदार आजारी आहेत त्यांच्या घरी खूप अडचणी आहेत त्यांच्या जीवाचं काही बरं वाईट झालं तर त्याला कोण जबाबदार? हे सतत टेन्शनमध्ये असतात म्हणून मला त्यांची बाजू घ्यावी लागते.

श्री आनंद गव्हाणकर (एच पी डी): अध्यक्ष साहेब, राजापुरे साहेब हे अणुशक्तीनगर येथील ए आर सी मध्ये पाच वर्षापासून संचालक आहेत त्यांना तुम्ही तज्ञ संचालक म्हणून घ्यावं.

श्री प्रशांत वरळीकर (टीएमएस): अध्यक्ष साहेब, आता जे सीडीएमचे प्रकरण आले आहे सूर्यवंशीचे जामीनदार यांना नोटीस पाठविली आहे. कर्ज निरस्त होईल किंवा यांची ग्रॅज्युटी मिळेल. आपल्या कायद्याप्रमाणे जे लवकर असेल ते करा आणि यांना जे बेकायदेशीर रिमाइंडर गेले आहेत ते रिमाइंडर बाजूला करून जे कर्जदार आहेत त्यांच्याकडून रिकव्हरी करा. जामीनदारांकडून रिकव्हरी झाली नाही पाहिजे.

श्री राजेश कळके (सीडीएम): त्यांची ग्रॅच्युइटी होल्ड केली आहे. हे जामीनदार आहेत. यांच्यावर अन्याय झाला आहे.

श्री सुरेश शेळके (सीडीएम): अध्यक्ष साहेब, आज यांनी मला रिमाइंडर पाठवले. मला एवढा मानसिक त्रास झाला. त्याचं काय? रिमाइंडर परत घ्या.

चेअरमन श्री हेमंत कोळी: तुमची रिकव्हरी केली का आम्ही? अजून नाही केली. सोसायटीमध्ये रिमाइंडर परत घेऊन या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: दि. 30.11.2022 रोजी श्री पी पी सूर्यवंशी सेवानिवृत्त झाले. त्यानंतर आतापर्यंत तुमची रिकव्हरी झाली का,?

श्री राजेश कळके (सीडीएम): तुम्ही रिमाइंडर का पाठवले? तुम्ही रिमाइंडर मागे घ्या. तुम्ही पाठवलेले रिमाइंडर बेकायदेशीर आहेत. तुम्ही कधीही पैसे कट करू शकता त्यासाठीच तुम्ही रिमाइंडर पाठवलेले आहेत.

श्री अमोल घाडगे: सेक्रेटरी, तुम्ही त्यांना रिमाइंडर पाठवले. यांचा दोष नाही. तुम्ही पुन्हा एक रिमाइंडर द्या की आम्ही रिमाइंडर दिलं ते तुम्ही परत आणून द्या.

श्री राजेश कळके (सीडीएम): तुमच्याकडून त्या तीनही जामीनदारांना 'आम्ही रिमाइंडर मागे घेतो' असं पत्र द्या.

मानद सचिव श्री शिवाजी हगवणे: ठीक आहे रिमाइंडर मागे घेतो.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेब, तुम्ही बोलल्याप्रमाणे, एनी आदर मॅटर मध्ये तुम्ही बोलू शकता. तर आता वेळ फार कमी उरला आहे म्हणून मी माझे फक्त दोन प्रश्न विचारतो.

एक- वेबसाईटवर निविदा टाकल्या नव्हत्या आणि त्याचे टेंडरिंग कसे झाले हे सर्व ईलीगल पद्धतीने झाले. तर त्याबद्दल कार्यवाही व्हावी. कारण त्याच्यामध्ये मंदाकिनी शेड असेल, ट्रॉफी असतील. जे तुम्ही नोटीस बोर्डवर लावलं असं सांगत आहात ते वेबसाईटवर नाही आहे, तर मग पुण्याच्या व्यक्तीला कसं कळलं की इथे ट्रॉफीचे टेंडर चालू आहे. तर हा खूप मोठा स्कॅम आहे. म्हणून यावर कमिटी बसली पाहिजे हे गरजेचं आहे. शेड बनवण्यासाठी पंचवीस हजारचे मटेरियल लागले. त्यावर तेवढाच मजुरीचा खर्च पकडला तर पन्नास हजारात काम होणार होतं. यांनी त्यासाठी दोन लाख खर्च केले. या व्यतिरिक्त त्यांनी मंदाकिनी ऑफिसमध्ये मेन डोर लावण्यासाठी रुपये पन्नास हजार खर्च केले. तो डोर 15000 इतक्या खर्चाचा आहे यावर चौकशी ही बसवलीच पाहिजे.

तर माझं तुम्हाला एक निवेदन आहे की तुम्ही आत्तापर्यंत यांच्या काळात झालेले सर्व टेंडर सील करून तुमच्या कस्टडीत घ्या आणि त्यांची चौकशी करा.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: डायरीच्या विषयावर 25 ऑगस्ट 2024 च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपण बोललो होतो की एक कमिटी बनवली जाईल. तीच कमिटी या विषयांवर सुद्धा काम करेल. प्रत्येक टेंडरवर काम करणं त्या कमिटीला सुद्धा अवघड आहे. जे मेजर आहेत ते करूया. तुम्ही समजून घ्या की हे सभासद सुद्धा डिपार्टमेंटल आहेत. ते त्यांचे काम संभाळून हे काम करणार आहेत. आपण बाहेरून कोणाला घेणार नाही. तुम्ही बोललात सर्व टेंडर करू तर तुम्ही एक प्रॅक्टिकल एप्रोच घ्या.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): साहेब पण ते सरळ सरळ खोटं बोलत आहेत की टेंडर वेबसाईटवर टाकलं. हाच विषय आहे.

श्री विशाल निकम: हाऊसची मागणी आहे संचालक मंडळाच्या मानधनाचे तुम्ही काय केलं ते सांगा. मानधन काय ते फायनल करा.

श्री ढोबळे (डीसीएसईएम): याला तुम्ही मानधन म्हणा, भत्ता म्हणा, काहीही असेल, जे तुम्ही नाव देत असाल ते, ते तुम्ही ते घेणार नाही,असं सभासदांना तुम्ही आश्वासन दिलं. हे तुमच्या जाहीरनाम्यात होतं. ठीक आहे पण तुमच्या नियमाप्रमाणे असेल ते घ्या. त्याला आम्ही नाही म्हणत नाही. पण तुम्ही त्याच्या चारपट. पाचपट वाढवून घेत आहात. हा कोणता न्याय आहे? आणि जर तुम्ही घेत असाल तर मग सभासदांना 10% आणि 12% हे का?

चेअरमन श्री हेमंत कोळी: आम्ही मीटिंग भत्ता नियमाप्रमाणे घेऊ.

श्री प्रवीण सावंत: तो जो भत्ता घेत आहात ते ठीक आहे. हा संचालक मंडळाचा अधिकार आहे. मला सुचवायचं आहे या संपूर्ण भारतात जेवढे पण आपले सभासद आहेत, आपण इथे बीएआरसी मध्ये आहोत, आपण एजीएमला येऊ शकतो पण इतर बाहेरचे सभासद इथे एजीएमला येऊ शकत नाहीत. तर त्या सभासदांसाठी आपण कोणत्याही प्रकारची भेटवस्तू पार्सलने देऊ शकलात, जर प्रयत्न केलात, तर मी त्याचं स्वागत करीन. संपूर्ण भारतात जेवढे आपले सभासद आहेत त्या सभासदांसाठी मी बोलत आहे.

श्री मनोज वाडेकर (आरईडी): अध्यक्ष साहेब, माझा दुसरा प्रश्न आहे आपल्या सोसायटीमध्ये ज्या दोन मुली हंगामी कर्मचारी होत्या त्यांनी राजीनामा दिला. तो कुठल्या कारणासाठी दिला त्याबद्दल काही चौकशी करता येईल का? हा एक प्रश्न आहे. आणि याच्याशीच रिलेटेड माझा दुसरा उपप्रश्न आहे की सोसायटीत ती जी व्यक्ती आहे त्या व्यक्तीची नियुक्ती ही कॉन्ट्रॅक्ट बेसवर झाली होती. त्यानंतर तो एलडीसी झाला नंतर त्याला युडीसी, कॅशिअर, सुपरवायजर ही सर्व पदे गाळून त्याला 'अकौंटंट' हे पद देण्यात आलं. ही तीन पदं गाळून असं डायरेक्ट वरच्या पोस्टला जाता येतं का? हे नियमाच्या बाहेर आहे. तर याची चौकशी व्हावी. याबाबत संचालक मंडळाला विनंती केली होती. मला त्यांनी सांगितलं की, हे तुमच्या अखत्यारीत येत नाही. म्हणजे आपण त्या व्यक्तीला पाठीशी घालतोय आणि या ज्या भगिनी आहेत आपल्या सोसायटीमध्ये काम करतात त्यांच्यासाठी एखादी 'महिला सुरक्षा' कमिटी स्थापन करावी की भविष्यामध्ये अशा कुठल्याही घटना घडू नयेत. माझी तुम्हाला विनंती आहे की महादेव लोंढे हा जो कर्मचारी आहे आज मी नाव घेतो, तीन प्रमोशन स्किप करून डायरेक्ट त्याला 'अकौंटंट' पद बहाल करण्यात आलं. तर हे चुकीचं काम आहे. तर त्याचे डिमोशन करण्यात यावे.

पदसिद्ध अध्यक्ष श्री गिरीश शेणई: ही गोष्ट संचालक मंडळाने करावयाची आहे. जे काही कामकाज आहे, ज्या काही कामकाजाच्या गोष्टी आहेत त्या संचालक मंडळाच्या आणि सभागृहाच्या अखत्यारीत येतात. आम्ही डिपार्टमेंटचे रिप्रेझेंटेटिव्ह आहोत. प्रत्येक गोष्टीची चौकशी करायला सांगितलं तर ते आम्हाला शक्य नाही. आम्ही दोघेही फार बिझी असतो. तुम्ही समजून घ्या. आमचे पण लिमिटेशन्स आहेत. तुम्ही लक्षात घ्या. तुम्ही आमच्यावर ओझं टाकलं ते योग्य नाही. सर्वांनी समजून काम केलं तर सर्वजण एकत्र काम करू नाहीतर हे शक्य नाही. तिथे येऊन मी पण ओरडू शकतो, मी पण सोसायटीचा सभासद आहे, माझा पण तो हक्क आहे. पण इथे या पदावर बसा आणि काम करून दाखवा. माझा कोणत्याही पॅनलशी काहीही संबंध नाही. आमच्या दोघांचं काम आहे जे आमच्याकडून बेस्ट पॉसिबल आहे ते करू. मी बेस्ट म्हणत नाही जगातला कोणताही माणूस बेस्ट देऊ शकत नाही. बेस्ट पॉसिबल देऊ शकतो. सर्वांनी आमच्या लिमिटेशन्स लक्षात घ्या आणि आजच्या सभेपुढील कामकाज संपले असे मी जाहीर करतो.

यानंतर राष्ट्रगीत झाले.

सचिव श्री शिवाजी हगवणे : दि.30.08.2024 रोजी डिव्हिडंड वाटप केले जाईल याची सभासदांनी नोंद घ्यावी.

अध्यक्ष  हेमंत कोळी: संस्थेच्या वतीने मी सर्व सभासदांचे, आस्थापनाचे अधिकारी व कर्मचारी, डीएई   कन्व्हेंशन सेंटरचे अधिकारी व सुरक्षा विभाग यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल तसेच पदसिद्ध अध्यक्ष श्री शेणई साहेब  व पदसिद्ध उपाध्यक्ष श्री श्रीराम साहेब यांचेही त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी संचालक मंडळाच्या वतीने आभार मानतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !